CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

आजचा सामना




सनरायजर्स हैद्राबाद वि. गुजरात टायटन्स
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : हैद्राबाद

सोलापूर | रविवार, ६ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १४८ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



वैदिक काळापासून आजतागायत आपल्याला प्रेरणा देणारी राष्ट्रीय प्रतीके, शतकानुशतके उदय आणि अस्ताच्या रोमांचक क्षणांच्या कथा ज्याने विणल्या आहेत, ज्याने त्यागी तपस्वी, शूर, जग जिंकणारे, ऋषी, सम्राट, सेनापती, कवी, साहित्यिक, तपस्वी आणि असंख्य कर्मयोगी यांचे चरित्र कोरले आहे, जिथे तात्त्विक कामगिरीसह स्वतःच्या जीवनाचे बलिदान देण्याची असंख्य उदाहरणे आपल्या स्मृतीत वास करतात, हा सर्वांत पवित्र भगवा ध्वज आपल्या अखंड राष्ट्रीय परंपरेच्या प्रतीकाच्या रूपात आपल्यासमोर येतो.

**पंडित दीनदयाल उपाध्याय,**
भारतीय जनसंघाचे दहावे अध्यक्ष

# शहरात दूषित पाण्याने घेतला दोन मुलींचा बळी

- बाबू जगजीवन राम वस्तीतील दुर्दैवी घटना
- खा. प्रणिती शिंदे, आ. देवेंद्र कोठे यांनी दिली भेट
- ठिय्या मांडत कार्यकर्त्यांनी केला महापालिकेचा धिक्कार
- मुलींना मेंदूज्वर, डेंग्यू झाल्याचे प्राथमिक निदान : आयुक्त
- महापालिका आयुक्तांसह अतिरिक्त आयुक्तांनी केली वस्तीची पाहणी





जिया म्हेत्रे



ममता म्हेत्रे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

मोदी भागातील बाबू जगजीवन राम वस्तीतील दोन मुलींचा सोलापूर शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झालां. दरम्यान, दूषित पाण्यामुळे दोन मुलींचा बळी गेला असल्याचा आरोप येथील रहिवाशांनी केला आहे. या घटनेमुळे वस्तीवर शोककाळा पसरली आहे. तातडीने कारवाई करून नुकसान भरपाई द्यावी, या मागणीसाठी येथील कार्यकर्त्यांनी कैलास रथा समोरच ठिय्या मांडला.

खा. प्रणिती शिंदे, आ. देवेंद्र कोठे यांनी या ठिकाणी भेट देऊन विचारपूस केली. दरम्यान, या मुलींना मेंदूज्वर, डेंग्यू झाल्याचे प्राथमिक निदान झाले असल्याची माहिती पुढे आली आहे. जिया महादेव म्हेत्रे (वय १५, रा. मोदी खाना), ममता अशोक म्हेत्रे (वय १३, रा. मोदी खाना) अशी मयत मुलींची नावे आहेत. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात या मुलींना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. यातील जिया म्हेत्रे हिला शुक्रवारी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

दरम्यान आज शनिवारी सकाळी ९.४५ वाजता तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर ममता म्हेत्रे हिचा शुक्रवारी रात्री मृत्यू झाला. शवविच्छेदनानंतर नेमके कारण स्पष्ट होणार आहे.जयश्री महादेव म्हेत्रे हिच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे जगजीवन राम वस्तीवर शोककळा पसरली आहे. या ठिकाणी गेल्या काही महिन्यापासून दूषित पाणीपुरवठा होत आहे.

संदर्भात महापालिका प्रशासनाकडे तक्रार करूनही कार्यवाही झाली नाही. दूषित पाण्यामुळे या मुलींचा बळी गेला आहे. तक्रार केल्यानंतर तत्काळ कार्यवाही झाली असती तर हा प्रकार घडला नसता. महापालिकेच्या निष्काळजीपणामुळे हे घडले. महापालिका याला जबाबदार आहे. दोन जीव गेले असा आरोप करत यानंतर तरी महापालिका प्रशासनाने कार्यवाही करावी, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे. घटनेची माहिती मिळताच आ. देवेंद्र कोठे यांनी बाबू जगजीवन राम वस्तीला भेट दिली. संबंधित कुटुंब यांची विचारपूस केली.

त्याचबरोबर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त आरोपी पवार यांनीही अधिकाऱ्यांसमवेत या ठिकाणी भेट देऊन परिसराची पाहणी केली. पाण्याची तपासणी करण्यात आली. ड्रेनेज लाईन, चेंबर इतर बाबी संदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश दिले. यावेळी परिसरातील नागरिकांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. ड्रेनेज लाईन चेंबर मधून पाण्याची पाईपलाईन गेली असल्याने पाणीपुरवठा दूषित होतो. या संदर्भात कार्यवाही केली जात नाही. तक्रार करूनही महापालिका अधिकारी दखल घेत नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

## 'त्या' मुलींचा मृत्यू डेंग्यू सदृश्य आजारानेच

**डॉक्टरांनी केला खुलासा**

मोदी खाना परिसरात राहणाऱ्या १५ वर्षीय मुलीस तीन दिवसापासून थंडी व ताप येत असल्याने सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. शनिवारी पावणे दहाच्या सुमारास उपचारादरम्यान त्या मुलीचा मृत्यू झाला आहे. तिचा मृत्यू डेंग्यू सदृश्य व मेंदूज्वर आजाराने झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

जिया महादेव म्हेत्रे (वय १५ रा. मोदी खाना सोलापूर)असे मयत झालेल्या मुलीचे नाव आहे. तीन दहावीची परीक्षा दिली होती. जिया हीस ४ एप्रिल रोजी शुक्रवारी सायंकाळी साडे सहाच्या सुमारास उपचारासाठी सिव्हिल रुग्णालयामध्ये दाखल केले होते. तीस तीन दिवसापासून थंडी व तापाचा त्रास होता, नातेवाईकांनी सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. तापाबरोबर तीला, झटके ही येत होते. सिव्हिलच्या डॉक्टरांनी तात्काळ उपचार सुरु केला. आवश्यक त्या तपासण्या ह्या केल्या. तीस डेंग्यू झाल्याचे निष्पन्न झाले. तसेच विषाणूमुळे मेंदूज्वर झाला असल्याचे निदान झाले होते. तिच्यावर उपचार सुरु होते. उपचारादरम्यान शनिवारी सकाळी तिचा मृत्यू झाला. याची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी नेण्यात आला. मात्र पीएमचा रिपोर्ट ही राखून ठेवला आहे.

'त्या' मुलीचा मृत्यू डेंग्यू सदृश्य व मेंदू ज्वर आजाराने निधन झाले आहे. मयत मुलींच्या अंगावर पुरळ होते. शरिरातील प्लेटलेटचे प्रमाण कमी कमी होत गेल्या होत्या. त्याच्यावर उपचार सुरु होते. प्रतिसाद देत नव्हत्या.

**- डॉ. राखी माने, आरोग्याधिकारी, मनपा.**

## आज श्रीरामनवमी



## महत्त्वाचे

### भारतीय स्टेट बँकेने बंद केली अमृत कलश योजना

**मुंबई** : देशातील सर्वांत मोठी सार्वजनिक क्षेत्रातील भारतीय स्टेट बँकेने आपल्या कोट्यवधी ग्राहकांना मोठा धक्का दिला आहे. स्टेट बँकेने ४०० दिवसांची एफडी योजना अमृत कलश बंद केली आहे. अमृत कलश योजनेत गुंतवणूक करण्याची शेवटची तारीख ३१ मार्च होती. एसबीआय बँकेच्या संकेतस्थळानुसार, बँकेने १ एप्रिलपासून अमृत कलश योजना बंद केली आहे. ज्या गुंतवणूकदारांनी ३१ मार्चपर्यंत अमृत कलश योजनेत गुंतवणूक केली, त्यांना मुदतपूर्तीनंतर व्याज आणि मुद्दलासह पैसे मिळतील. अमृत कलश योजनेच्या गुंतवणूकदारांनी काळजी करण्याची गरज नाही. त्यांचे पैसे आणि व्याज पूर्णपणे सुरक्षित आहे.

### न्या. वर्मा यांनी घेतली गोपनीयतेची शपथ

**प्रयागराज** : कथित अवैध रोख सापल्याप्रकरणी चर्चेत आलेले न्या. यशवंत वर्मा यांनी शनिवारी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणन गोपनीयतेची शपथ घेतली. तथापि त्यांची चौकशी सुरू असल्याने ती पूर्ण होईपर्यंत त्यांच्याकडे कुठलाही खटला सुनावणीसाठी दिला जाणार नाही. न्यायमूर्तींच्या शपथविधीसाठी सार्वजनिक समारंभ आयोजित केला जातो, परंतु न्या. वर्मा यांचा शपथविधी एका खासगी कक्षात पार पडला.

### जेईई, नीट उमेदवारांसाठी पेगासस कोर्सचा विस्तार

**मुंबई** : फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) या शिक्षण कंपनीने पेगासस कोर्स सुरू केला आहे. हा गतीशील अध्ययन प्रोग्राम जेईई ॲडवान्स्ड व नीट परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आला. नागपूरसह विविध निवडक शहरामध्ये उपलब्ध असलेला हा संरचित ऑफलाईन प्रोग्राम विविध वैशिष्ट्यांसह ऑलिम्पियाड प्रशिक्षण आणि समर्पित सराव तसेच चाचणी टप्प्याच्या माध्यमातून लवकर तयारी करण्याची सुविधा देण्याचा प्रयत्न करतो. पेगासस कोर्स विद्यार्थ्यांना स्पर्धेत मदत करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. विद्यमान अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्यासोबत पुढील इयत्तेच्या अभ्यासक्रमाचा मोठा भाग समाविष्ट करीत हा प्रोग्राम शैक्षणिक पाया घडवण्याचा प्रयत्न करतो. या कोर्समध्ये शैक्षणिक प्रगतीवर देखरेख ठेवण्यासाठी द्विसाप्ताहिक मूल्यांकन व ऑल इंडिया टेस्ट सिरीजचा देखील समावेश आहे.

### पापुआ न्यू गिनीत ६.९ तीव्रतेचा भूकंप

**वेलिंग्टन** : पापुआ न्यू गिनीमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. अमेकिरन भूगर्भीय सर्वेक्षणानुसार ६.९ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप आला. त्यानंतर पापुआ न्यू गिनीला त्सुनामीचा इशारा देण्यात आला. दरम्यान काही काळातच तो रद्द करण्यात आला. शनिवारी सकाळी स्थानिक वेळेनुसार पॅसिफिक बेट राष्ट्राला भूकंपाचा धक्का बसल्याचे वृत्त आहे. याचे केंद्र न्यू ब्रिटन बेटावरील किम्बे शहरापासून १९४ किलोमीटर पूर्वेस, १० किलोमीटर खोलीवर होते.

## भारत-श्रीलंकेत संरक्षण करार

### मोदी-दिसानायके चर्चेचे मोठे यश ● ४० वर्षांनंतर करार

**कोलम्बो, ५ एप्रिल**

भारत आणि श्रीलंकेने शनिवारी प्रथमच महत्त्वाकांक्षी संरक्षण सहकार्य करारावर स्वाक्षरी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी दोन्ही देशांची सुरक्षा परस्परांशी जुळलेली आणि परस्परांवर अवलंबून असल्याचे स्पष्ट करीत सखोल द्विपक्षीय संबंधांची विस्तृत रूपरेषा सादर केली.

नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुराकुमारा दिसानायके यांच्यात झालेल्या तपशीलवार चर्चेनंतर झालेल्या सात करारांमध्ये या संरक्षण कराराचा समावेश आहे. भारतीय शांती सैन्याने श्रीलंकेत केलेल्या हस्तक्षेपानंतर जवळपास ४० वर्षांनी दोन्ही देशांमध्ये संरक्षण करार करण्यात आला आहे.

दोन्ही देशांचे सुरक्षा हित समान आहे. दोन्ही देशांची सुरक्षा परस्परांशी जुळलेली तसेच परस्परांवर अवलंबून आहे, असे नरेंद्र मोदी यांनी निवेदनात म्हटले. भारताच्या हितासाठी संवेदनशीलता दाखवल्याबद्दल मी दिसानायके यांचे आभार मानतो. संरक्षण सहकार्यात झालेल्या महत्त्वाच्या करारांचे आम्ही स्वागत करतो, असेही मोदी म्हणाले.



सामंजस्य करारांचे आदानप्रदान करताना भारत आणि श्रीलंकेचे प्रतिनिधी

### ऊर्जाकेंद्र म्हणून विकसित करणार त्रिंकोमाली

त्रिंकोमालीला ऊर्जाकेंद्र म्हणून विकसित करण्यासाठीही दोन्ही देशांमध्ये करार झाला. यावेळी नरेंद्र मोदी आणि दिसानायके यांच्यात सामपूर सौरऊर्जा प्रकल्पाचे आभासी पद्धतीने लोकार्पण केले. सामपूर सौरऊर्जा प्रकल्प श्रीलंकेच्या ऊर्जा सुरक्षेत मदत करेल. बहुउत्पादन पाईपलाईन बांधण्यासाठी आणि त्रिंकोमालीला ऊर्जाकेंद्र म्हणून विकसित करण्यासाठी स्वाक्षरी केलेल्या करारांचा श्रीलंकेतील सर्व लोकांना फायदा होईल असे मोदी म्हणाले.

मोदींनी श्रीलंकेला दिलेल्या मदतीनमुळे आणि सातत्याने टिकवून ठेवलेले ऐक्य आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही नरेंद्र मोदींना सांगितले, अशी माहिती दिसानायके यांनी दिली. श्रीलंकेचे विशेष स्थान असल्याचे मोदी म्हणाले. राष्ट्राध्यक्ष दिसानायके यांच्या भारत भेटीपासून मागील चार महिन्यांत आमच्या कार्यात लक्षणीय प्रगती झाली आहे, असे ते म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

## शस्त्रे ठेवून विकासाच्या प्रवासात सहभागी व्हा


### अमित शाह यांचे नक्षलवाद्यांना आवाहन

**दंतेवाडा, ५ एप्रिल**

छत्तीसगडच्या बस्तर भागातील आदिवासींचा विकास नक्षलवादी रोखू शकणार नाहीत, असे ठाम प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी केले. चकमकींमध्ये तुम्ही मृत्युमुखी पडता, ते कुणालाही आवडत नाही. त्यामुळे शस्त्रे ठेवून विकासाच्या प्रवाहात सहभागी व्हा, असे आवाहन त्यांनी नक्षलवाद्यांना केले.

मार्च २०२६ पर्यंत नक्षलवादाचा नायनाट करण्यास केंद्र सरकार कटिबद्ध आहे. जे नक्षलवादी शरण येतील त्यांना मुख्य प्रवाहात सहभागी करून घेण्यात येईल आणि उरलेल्यांचा समाचार सुरक्षा दले घेतील, असे अमित शाह यांनी ठामपणे राज्य सरकारने आयोजित केलेल्या 'बस्तर पांडूम' उत्सवाच्या समारोपीय सत्राला संबोधित करताना सांगितले.

बस्तरमधील गोळीबाराच्या वर्षावाचे आणि बॉम्बस्फोटाचे दिवस आता गेले आहेत. शस्त्रे खाली ठेवून मुख्य प्रवाहात सहभागी व्हा, असे आव्हान मी नक्षलवादी बांधवांना करतो. तुम्ही आपलेच आहात. नक्षलवादी ठार होतो, ती वार्ता ऐकून कुणालाही आनंद होत नाही. शस्त्रे ठेवून तुम्ही मुख्य प्रवाहात सहभागी व्हा. शस्त्रे उचलून तुम्ही तुमच्या आदिवासी बांधव-भगिनींचा विकास रोखू शकत नाहीत, असे अमित शाह यांनी सांगितले. शरण येऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी झालेल्या नक्षलवाद्यांना केंद्र आणि राज्य सरकारकडून संपूर्ण संरक्षण दिले जाईल. या क्षेत्राला विकासाची गरज आहे. पाच वर्षांत बस्तरला सर्व काही द्यावे, अशी नरेंद्र मोदी यांची इच्छा आहे. ५० वर्षांत बस्तरने विकासाची फळे चाखली नाहीत. मात्र, तुमची मुले शाळेत गेली, तहसीलमध्ये आरोग्य सुविधा असल्यास हे शक्य होईल. प्रत्येकाकडे आधार कार्ड, रेशन कार्ड आणि आरोग्य विमा असल्याचे अमित शाह यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*



#### स्वतःची घरे नक्षलमुक्त केल्यास विकास

स्वतःची घरे आणि गावे नक्षलमुक्त केल्यास बस्तरचा विकास होईल, असे अमित शाह यांनी सांगितले. नक्षलवाद्यांना शरण आणण्यात मदत करून गाव माओवाद मुक्त करणाऱ्या गावांना एक कोटी रुपये दिले जातील, अशी घोषणा मुख्यमंत्री विष्णूदेव साय आणि उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी केली आहे, याकडे अमित शाह यांनी यावेळी लक्ष वेधले.

## रामनवमीसाठी सजली अयोध्यानगरी

**अयोध्या** : भगवान श्रीराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त अयोध्यानगरी सजली आहे. प्रभू श्रीराम यांच्या दर्शनासाठी शहरात ५० लाख भाविक येण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली. मंदिर परिसरात ४ एप्रिलपासूनच धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला आहे. रामनवमीसाठी अयोध्येतील सर्व मठ आणि मंदिरांची सजावट करण्यात आली आहे. दुपारी १२ वाजता प्रभू श्रीराम यांचा सूर्य तिलक होणार आहे. चार मिनिटांपर्यंत सूर्याची किरणे रामलल्लांवर पडणार आहेत. यानंतर महाआरती होणार आहे. रामनवमी उत्सवासाठी जगभरातून रामभक्त अयोध्येत उतरल्याचे प्रशासनाने म्हटले आहे

## 'त्या' चिमुकल्या जिवांचा सर्व खर्च राज्य सरकार करणार : मुख्यमंत्री

**मुंबई** : पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील मिळवलेल्या प्रशासनामुळे आपल्या मातेपासून दुरावलेल्या दोन जुळ्या चिमुकल्याच्या वरील औषधोपचाराचा सर्व खर्च राज्य सरकार करणार आहे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून हा खर्च करण्यात येईल ,अशी माहिती दस्तुरखुद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी एक्स वर ही माहिती दिली.

रुग्णालय प्रशासनाने पैसे न भरल्याने ॲडमिट करून घेतल्याने गर्भवती भिसे यांना दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या जुळ्या मुलींची प्रकृतीही चिंताजनक आहे.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत चैत्र नवरात्री महोत्सवानिमित्त वाराणसी येथील मणिकर्णिका घाटावर आयोजित प्रार्थनेला उपस्थित होते.

## राजस्थानचा ५० धावांनी विजय

**पंजाब** : आयपीएल-२०२५ च्या १८ व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने पंजाब किंग्जला ५० धावांनी पराभूत केले. संघाने सलग दुसरा सामना जिंकला आहे, तर पंजाबने या हंगामात पहिल्यांदाच पराभव पत्करला आहे. शनिवारी मुल्लानपूर येथील महाराजा यादविंद्र सिंग क्रिकेट स्टेडियमवर २०६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या पंजाबला २० षटकांत ९ गडी गमावून फक्त १५५ धावाच करता आल्या. नेहल वढेराने ४१ चेंडूत ६२ धावांची खेळी केली.

### राज्याच्या मुख्य माहिती आयुक्तपदी राहुल पांडे

## गजानन निमदेव यांची आयुक्तपदी नियुक्ती

**नागपूर, ५ एप्रिल**

महाराष्ट्राच्या मुख्य माहिती आयुक्तपदी राहुल भालचंद्र पांडे यांची नियुक्ती करण्यात आली असून, तरुण भारतचे मुख्य संपादक गजानन श्रीधर निमदेव यांची राज्य माहिती आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नागपूरचे माजी जिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे आणि माजी प्रशासकीय अधिकारी प्रकाश इंदलकर यांचीही राज्य माहिती आयुक्त म्हणून नेमणूक झाली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या स्वाक्षरीनंतर याबाबतची अधिसूचना आज जारी करण्यात आली आहे. राहुल पांडे हे यापूर्वी तीन वर्षे राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे आयुक्त होते. तत्पूर्वी त्यांनी हितवाद या इंग्रजी दैनिकात दीर्घकाळ पत्रकारिता केली. माहिती आयुक्त असताना त्यांनी दिलेले अनेक निवाडे गाजले. राज्याचे मुख्य माहिती आयुक्त आणि तीन माहिती आयुक्त यांची निवड करण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विरोधी पक्षांपैकी उद्धव ठाकरे गटाचे भास्कर जाधव यांच्या उपस्थितीत विधानभवनात बैठक पार पडली. त्यात या चौघांची निवड करण्यात आली. तसेच यासंदर्भातील शिफारस राज्यपालांकडे करण्यात आली होती. गजानन निमदेव यांना नागपुरात काम करणाऱ्या बुलडाणा जिल्हा नागरिक मंडळाचा स्व. शक्तिकुमार संचेती स्मृती पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार, ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भ यांचा आप्पासाहेब पाडळकर स्मृती पत्रकारिता पुरस्कार, बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर येथील सत्यजित गौरव पुरस्कार, नागपुरातील प्रतिष्ठेचा मानला जाणारा स्व. अनिलकुमार पत्रकारिता पुरस्कार यासह एकूण ७ पुरस्कार मिळाले आहेत. सरकारी नोकऱ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्याची त्यांना विशेष आवड आहे. यासाठी त्यांनी सातत्याने २० वर्षे तरुण भारतात स्तंभलेखन केले. स्पर्धा परीक्षांसाठी निःशुल्क मार्गदर्शनही केले. हजारो विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला. एमपीएससीच्या परीक्षांसाठी त्यांनी लहान वयातच सात पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय विषयांवर स्वतंत्रपणे हजारपेक्षा जास्त लेख लिहिले आहेत. त्याचप्रमाणे आठशेपेक्षा जास्त अग्रलेख लिहिले आहेत. इंग्रजी आणि हिंदीतील साडेतीन हजार लेखांचे भाषांतर करण्याचा त्यांना अनुभव आहे.



राहुल पांडे



गजानन निमदेव



रवींद्र ठाकरे



## छत्तीसगडच्या ८६ नक्षलवाद्यांची तेलंगणात शरणागती पत्करली

**हैदराबाद, ५ मार्च**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या छत्तीसगड दौऱ्यादरम्यान याच राज्यातील ८६ नक्षलवाद्यांनी शनिवारी तलंगणात शरणागती पत्करली. यात कित्येक जहाल नक्षलवाद्यांचा समावेश आहे. नक्षलवादाच्या विरोधातील लढ्याला या माध्यमातून मोठे यश मिळाले, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

भद्राद्रि कोठागुडेम मल्टी झोन१ चे पोलिस महानिरीक्षक चंद्रशेखर रेड्डी यांच्यासमोर कोठागुडेमच्या हेम चंद्रपुरम् येथील पोलिस मुख्यालयात ८६ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. शरण आलेले नक्षलवादी छत्तीसगडमधील हिंसाचाराच्या कित्येक घटनांमध्ये सहभागी होते. ८६ नक्षलवाद्यांमध्ये ६६ पुरुष आणि २० महिलांचा समावेश आहे. या माओवाद्यांनी तेलंगणा सरकारच्या ऑपरेशन 'चेयुथा' कार्यक्रमाच्या अंतर्गत शरणागती पत्करली, अशी माहिती चंद्रशेखर रेड्डी यांनी दिली. नक्षलवादाचा नायनाट करण्यासाठी केंद्र आणि राज्यांद्वारे अभियान राबवले जात आहे. छत्तीसगड, महाराष्ट्र, आंध्रप्रदेशातही संयुक्त कारवाया सुरू आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

पान १ वरुन...

## शहरात दुषित पाण्याने घेतला दोन मुलींचा बळी...

सिव्हिलमध्ये भाग्यश्री महादेव म्हेत्रे (वय १७ रा. मोदीखाना) सोलापूर ही ४ एप्रिल रोजी सायंकाळी पाच च्या सुमारास उपचारासाठी दाखल केले. तीस दोन दिवसापासून ताप आहे. डॉक्टरांनी तीस मेंदूत ताप गेल्याचे (मेनिन्गो एन्सेफलायटीस) निदान झाले. तिच्यावर सिव्हिल रुग्णालयातील ए ब्लॉकमधील मेडिसिन आयसीयूमध्ये उपचार सुरु आहेत. तिची तब्येतही गंभीर आहे.

**सरकार आणि महापालिकेचा निष्काळजीपणा : खा. प्रणिती शिंदे**

खा. प्रणिती शिंदे यांनी जगजीवन राम वस्तीला भेट दिली. माहिती घेतली. त्यानंतर त्या म्हणाल्या, सोलापूर शहरात पंधरा वर्षांपूर्वी कॉलराची साथ होती. सद्यस्थितीत सोलापुरात दूषित पाणीपुरवठा होत आहे. ही गंभीर बाब आहे. महापालिकेत तीन वर्षापासून प्रशासकीय राजवट आहे. नगरसेवक नाही. महापौर नाही. निवडणुका घेतल्या जात नाहीत. यामुळे कामे होत नाहीत. ड्रेनेज चेंबर, जलवाहिनी दुरुस्ती केली जात नाही. महापालिकेच्या झोनकडे पैसे नाहीत. नागरिकांना सहा ते आठ दिवसाआड पाणीपुरवठा होतो. पाणी साठवून ठेवल्याने त्या पाण्यात अळ्या पडतात. त्यातच पाणीपुरवठा दूषित होतो. उन्हाळ्यापूर्वी वॉश आऊट झाले पाहिजे. ते करण्यात आले नाही. त्यामुळे हे बळी गेले. सरकार आणि महापालिकेचा निष्काळजीपणा आहे असा आरोप प करत आम्ही गप्प बसणार नाही सरकारचे डोळे उघडले पाहिजे. मयत मुलींच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळावी. सर्व शहराला शुद्ध पाणीपुरवठा करण्यात यावा. मैला मिश्रित पाणी थांबवा, असे खा. प्रणिती शिंदे यांनी स्पष्ट केले.

**शहरातील अशुद्ध पाणीपुरवठा थांबवावा : आ. देवेंद्र कोठे**



आ. देवेंद्र कोठे यांनी सकाळी या ठिकाणी भेट दिली. मयत मुलींच्या कुटुंबियांची विचारपूस केली. परिसराची पाहणी करून महापालिका अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले, अतिशय दुःखद आणि दुर्दैवी घटना आहे. संबंधित कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. माहिती मिळताच प्रशासनाला कळविले म हापालिकेचे पथक तातडीने दाखल झाले. आवश्यक ती कार्यवाही सुरू झाली. ड्रेनेज चेंबर मधून पिण्याची पाईपलाईन गेली असल्याने घाण पाणी येते असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे महापालिका प्रशासनाने अशुद्ध पाणीपुरवठा तत्काळ थांबवावा. शहरातील सर्वच ठिकाणी ड्रेनेज चेंबर मधून जलवाहिनी जात असल्यास तत्काळ दुरुस्ती व कार्यवाही करावी. प्रत्येकाचे प्राण म हत्त्वाचे आहेत. पोस्टमार्टम नंतर कारण स्पष्ट होईल. महापालिकेने कार्यवाही करावी, असे आ. देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

**बाबा करगुळे यांच्यासह रहिवाशांचा ठिय्या**

बाबू जगजीवन राम वस्ती येथे मयत मुलीच्या अंत्ययात्रेतील कैलास रथासमोरच युवा नेते बाबा करगुळे, माजी सभागृह नेते देवेंद्र भंडारे, निलेश संगेपांग यांच्यासह रहिवाशांनी महापालिकेचा धिक्कार करत ठिय्या मांडला. या वस्तीतील पाणीपुरवठा सुरळीत करावा. शुद्ध पाणीपुरवठा व्हावा. ड्रेनेज लाईन स्वच्छ करावी. संबंधित पालिका अधिकाऱ्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा. मयत मुलींच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई द्यावी. नोकरी देण्यात यावी, अशी मागणी करत महापालिका प्रशासनाच्या धिक्काराच्या घोषणा दिल्या. काही वेळानंतर आंदोलन मागे घेतले. त्यानंतर अंत्ययात्रा पुढे मार्गस्थ झाली. दरम्यान, या ठिकाणी पोलिसांचा मोठा बंदोबस्त दाखल झाला.

**ममता म्हेत्रे हिच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार**

दरम्यान, दुपारी सव्वा एकच्या सुमारास बाबू जगजीवन राम वस्ती येथील घरापासून ममता म्हेत्रे हिची अंत्ययात्रा काढण्यात आली. मोदी स्मशानभूमी येथे तिच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील महिलांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलिसांचा बंदोबस्त**

कार्यकर्त्यांनी केलेल्या ठिय्या आंदोलनामुळे पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला.

बाबू जगजीवन राम वस्ती येथे पोलिस उपायुक्त दिपाली काळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारीही दाखल झाले. पोलिसांचा मोठा फौज फाटा तैनात होता.

**योग्य ती कार्यवाही करण्यात येईल : अतिरिक्त आयुक्त पवार**

पाण्याची तपासणी केली आहे. ड्रेनेज लाईन, जलवाहिनी तपासायला सांगण्यात आले आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. महापालिका आयुक्तांना अहवाल देण्यात येणार आहे. आवश्यक ती कार्यवाही पुढे करण्यात येणार असल्याचे महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी सांगितले.

**महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी दिली वस्तीला भेट**

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बाबू जगजीवन राम वस्तीला भेट दिली. येथील परिसराची पाहणी केली. दोन मुलींचा मृत्यू झाल्याचे दुखद घटना घडली. यासंदर्भात सोलापूर शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयाकडून माहिती घेतली. त्या मुलींना मेंदू ज्वर ,डेंग्यूमुळे प्लेटलेटचे प्रमाण कमी होते असे प्राथमिक निदान झाले असल्याचे दिसून येते. यामुळे महापालिका मलेरिया विभागाला आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. डेंग्यू व संसर्गजन्य आजारासंदर्भात आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. शहरातील दवाखाने व रुग्णालयांनी डेंग्यू अथवा डेंग्यू सदृश्य रुग्ण आढळल्यास तत्काळ महापालिकेच्या आरोग्य विभागाला माहिती देण्याचे आदेश दिले आहेत. नागरिकांनीही आपापल्या परिसरात पाणी साठणार नाही. डास होणार नाहीत. याची दक्षता घ्यावी. तसे आढळल्यास पालिकेला सूचना कराव्यात. आवश्यक असल्यास महापालिकेच्या झोन अधिकाऱ्यांना संपर्क साधावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

# शासनाकडून एक राज्य, एक गणवेश योजना मागे

## आ. सुभाष देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश; सोलापूरच्या गारमेंट उद्योगाला दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**



राज्य सरकारने 'एक राज्य, एक गणवेश' योजना मागे घेतली आहे. यापुढे गणवेशाचा रंग आणि रचना निश्चित करण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला देण्याचा निर्णय सरकारने बुधवारी जाहीर केला. एक राज्य एक गणवेशमुळे सोलापुरातील १५ हजार काम गारांना फटका बसला होता. त्यामुळे ही योजना बंद करण्यासाठी आ. सुभाष देशम ुख यांनी शासनासह राज्यपालांकडे वारंवार पाठपुरावा केला होता, अखेर त्याला यश आले आहे. हा निर्णय रद्द झाल्यानंतर सोलापुरातील गारमेंट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आ. देशमुख यांचा सत्कार करत आभार मानले. या निर्णयामुळे सोलापूरच्या गारमेंट उद्योगाला दिलासा मिळाला आहे.

शिंदे सरकारच्या काळात तत्कालीन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी 'एक राज्य, एक गणवेश'चा निर्णय घेतला होता. हा राज्य स्तरावर कापड खरेदीचा निर्णय वादात अडकला होता. विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश मिळाले नसल्याने पालकांची मोठी नाराजी सरकारला सहन करावी लागली होती. याशिवाय गारमेंटसाठी प्रसिद्ध असलेल्या सोलापुरातील सुमारे १५ हजार कामगांराना याचा मोठा फटका बसला होता. याबाबत येथील गारमेंट असोसिएशनच्या पदाधिकार्यांनी याबाबत आ. सुभाष देशमुख यांची भेट घेत आपली व्यथा व्यक्त केली होती. आ. देशमुख यांनी याबाबत संबंधित मंत्री, मुख्यमंत्र्यांकडे गारमेंट पदाधिकारी कामगारांच्या अडचणी सांगत ही योजना रद्द करण्यासाठी पाठपुरावा केला होता. बुधवारी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, यापुढे केंद्र सरकारच्या समग्र शिक्षा व राज्य सरकारच्या मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात येणार आहे. त्यासाठी समग्र शिक्षांतर्गत केंद्र सरकारने निश्चित केलेली गणवेशाची रक्कम व राज्य सरकारच्या मोफत गणवेशाची रक्कम शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर म हाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयाकडून देण्यात येणार आहे. हा निर्णय झाल्यानंतर सोलापूरच्या गारमेंट असोसिएशनच्या पदाधिकार्यांनी आ. देशम ुख यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष सतीश पवार, सेक्रेटरी प्रकाश पवार, खजिनदार श्रीकांत अंबुरे, सुनील मेंगजी, अमित जैन यासह पदाधिकारी उपस्थित होते.

> शासनाच्या निर्णयामुळे गेल्या दीड वर्षांपासून सोलापूरच्या गारमेंट इंडस्ट्रीजला मोठा फटका बसला होता. आम्ही याबाबत आ. सुभाष देशमुख यांची भेट घेतली होती. त्यांनी शासन दरबारी प्रयत्न करून हा निर्णय मागे घ्यायला लावला. त्यामुळे गारेमेंट क्षेत्राला दिलासा मिळाला आहे. सोलापुरात आणखी रोजगार मिळणार आहे. हे सर्व आमदार देशमुख यांच्यामुळे शक्य झाले.
>
> - **प्रकाश पवार,** उपाध्यक्ष, गारमेंट असोसिएशन, सोलापूर

## चिंचेच्या झाडावरून पडून तरूण जखमी

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

चिंचा तोडण्यासाठी झाडावर चढलेला तरूण खाली पडून जखमी झाला. कैलास प्रल्हाद सावंत (वय ३६, रा. मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३ एप्रिल रोजी सकाळी मोदी पंखाबाऊडी येथे कैलास सावंत हे चिंचा तोडण्यासाठी चिंचेच्या झाडावर चढून चिंचा तोडत होता. त्यावेळी तोल जाऊन खाली पडून कैलास सावंत याच्या डोक्यास, चेहऱ्यास मार लागल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी रात्री कैलास हा पळून गेला होता. परंतु, त्यास ४ एप्रिल रोजी पुन्हा त्रास होऊ लागल्याने पुन्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## नगर भूमापन कार्यालयात भू-मापन केंद्र सुविधेचा शुभारंभ

### महसूल मंत्री बावनकुळे यांच्या हस्ते उदघाटने

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

भूमि अभिलेख विभागाकडून नागरिकांच्या सोयी करीता नगर भूमापन अधिकारी, सोलापूर कार्यालय येथे सेतु सुविधा केंद्राच्या धर्तीवर भू प्रणाम केंद्र ही सुविधा करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य येथे एकुण ३० भू प्रणाम केंद्र उभारण्यात आले आहे. त्या पैकी नगर भूमापन अधिकारी कार्यालय सोलापूर येथे एक भू प्रणाम केंद्र तयार करण्यात आले आहे. सदर ३० भू प्रणाम केंद्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते पुणे येथून दुरदृश्यप्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले आहे.

या भू प्रणाम केंद्रामध्ये संगणीकृत मिळकत पत्रिका, मिळकत पत्रिकेशी संबंधीत सर्व प्रकारचे फेरफार नोंदी करीता ऑनलाईन अर्ज भरणे, ई मोजणी व्हर्जन २.० मधील सर्व प्रकारचे मोजणी अर्ज भरणे, तसेच भविष्यात स्कॅनिंग अभिलेखाचे वितरण या केंद्रावर करण्यात येणार आहे. नमुना ९ नोटीस व इतर संबंधीत नकला व कागदपत्र या केंद्रावर नक्कल फी भरुन उपलब्ध होणार आहेत. वरील सर्व सुविधा नागरिकांना वाजवी दरामध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार असुन, या मुळे लोकाभीमुख प्रशासनास हातभार लागणार आहे. या सुविधांचा नागरीकांना लाभा घ्यावा, असे आवाहन नगर भूम ापन अधिकारी गजानन पोळ यांनी केले आहे.

## साप चावल्याने १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

साप चावल्याने १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. साईसमर्थ प्रभुलिंग बहिरगोंडे (वय १२, रा. उमराणी, ता. चडचण, जि. विजापूर, कर्नाटक) असे मृत म ुलाचे नाव आहे. ४ एप्रिल रेजी उमराणी येथील शिवारातील स्वतः च्या शेतात साईसमर्थ हा असताना त्यास डाव्या पायाला साप चावल्याने त्यास वडील प्रभुलिंग बहिरगोंडे यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी साईसमर्थ याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. अक्षय इमडे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे संस्थापक अध्यक्ष ढवळे यांचा सन्मान

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

श्रीसंत नामदेव शिंपी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था आयोजित प्रभू श्री रामचंद्र जन्मोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून श्री राम मंदिर देवस्थानच्या प्रांगणात अखिल भारतीय संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे संस्थापक अध्यक्ष महेश ढवळे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी समाज संस्थेचे सरचिटणीस प्रा. मुक्तेश्वर मुळे यांनी सूत्रसंचालन व प्रस्तावना केली. स्वागत अध्यक्ष धनंजय जवंजाळ यांनी केले. कार्याध्यक्ष युवराज चुंबळकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी समाज संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब शित्रे, वैभव होमकर, सरचिटणीस मुक्तेश्वर मुळे, नायब तहसीलदार विश्वस्त प्रवीण घम आदी उपस्थित होते.



## उमाबाई श्राविका विद्यालयाचे ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत यश

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत यश संपादन केले. यामध्ये इयत्ता ५ वी मधील आयान हरून तांबोळी या विद्यार्थ्याने गणित विषयात स्टेट टॉपर हा बहुमान मिळविला. तसेच समर्थ सुधाकर कुलकर्णी (इयत्ता ६ वी विषय गणित) व शंतनू नितीन सातपुते (इयत्ता ८ वी, विषय विज्ञान) या दोघांनी एक्सलन्स अवॉर्ड प्राप्त केला. या परीक्षेतील राऊंड एक मध्ये प्रतिक काकडे, कार्तिक भागवत, श्रद्धा सुरवसे यांनी सुवर्ण तसेच वेदांत कुलकर्णी याने रौप्य पदक मिळवले. या विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान विषय शिक्षकांचे तसेच प्रिती वर्हाडे, अभिजीत पाटील, सोनाली उंडे, मिनाक्षी बेळ्ळे व पल्लवी खांडवे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे विश्वस्त यतीन शहा, अंजली शहा, सी.ई.ओ. देवई शहा, विश्वस्त करण शहा, मार्गदर्शिका दीप्ती शहा, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुकुम ार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले.

## शेतकरी कुटुंबातील प्रशांत रिटे बनले एमबीबीएस डॉक्टर

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.५ एप्रिल**



रिटेवाडी तालुका करमाळा येथील प्रशांत मीना उत्तरेश्वर रिटे नुकतेच एमबीबीएस परीक्षा पास होऊन डॉक्टर बनले आहेत. एका छोट्याशा खेड्यात जन्मलेले व शेतकरी कुटुंबात वाढलेले प्रशांत रिटे हे डॉक्टर बनल्याने सर्वत्र कौतुक होत आहे

प्रशांतचे प्राथमिक शिक्षण रितेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेत झाले तर पाचवी ते आठवी पर्यंत शिक्षण छत्रपती शिवाजी विद्यालय वीट व नववी दहावीचे शिक्षण भारत हायस्कूल जेऊर येथे झाले. उच्च माध्यमिक शिक्षणासाठी त्यांनी बारामतीच्या टीसी कॉलेजची निवड केली. लहानपणापासूनच हुशार असणाऱ्या प्रशांतला वैद्यकीय क्षेत्राची आवड होती म्हणूनच त्याने नीट परीक्षा उत्तीर्ण होऊन डॉक्टर वसंतराव पवार मेडिकल कॉलेज नाशिक येथे पहिल्या प्रयत्नात एमबीबीएस पदवी प्राप्त करून डॉक्टर बनण्याचा बहुमान मिळवला आहे. प्रशांत हा प्रगतशील बागायतदार सर्जेराव रिटे यांचा नातू तर रिटेवाडी चे माजी सरपंच किशोर रिटे यांचा पुतण्या आहे.त्याच्या या उज्वल यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## महापालिकेच्या वतीने शिवाजी महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील कार्यालयात श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सहायक आयुक्त मनीषा मगर, विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर,कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, प्रकाश सांवत, उद्यान प्रमुख किरण जगदाळे, नितीन गायकवाड, सिद्धू तिमिगार, अशोक खडके उपस्थित होते.

# दुसऱ्या टप्प्यातील शिक्षक भरती प्रक्रिया सुरु

### शिक्षक भरतीसाठी उमेदवारांची प्रतीक्षा वाढली

### जाहिराती अपलोडसाठी १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**

पवित्र पोर्टलवर सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेसाठी उमेदवारांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी अनुदानित शाळांना रिक्त पदांच्या जाहिराती अपलोड करण्यासाठी १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे प्राधान्यक्रम भरण्याची सुविधा एप्रिल अखेरीस उपलब्ध होण्याची शक्यता आहे. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती सुरू आहे.

शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी २०२२-२३ उमेदवारांनी नोंदणी केली २,३९,७३० उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली, २,१६,४४३ उमेदवारांनी स्वप्रमाणन प्रक्रिया पूर्ण केली ..१,६३,०६१ राज्यात पहिला टप्पा ७० टक्के शिक्षक भरती पूर्ण झाली असून उर्वरित १० टक्के जागेवर दुसऱ्या टप्प्यात शिक्षकांची भरती होणार असून त्याप्रमाणे नियोजन केले असून त्यासाठी १५ एप्रिल पर्यंत मुदत वाढ दिली गेली आहे.

पहिल्या टप्प्यात २१,६७८ रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यानंतर रिक्त, अपात्र किंवा गैरहजर उमेदवारांमुळे उर्वरित जागांसाठी शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा सुरू आहे. यासाठी २० जानेवारीपासून स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी संस्थांना रिक्त पदांच्या जाहिराती अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. २१,६७८ रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

**मुदतवाढ मिळाल्याने जागा वाढण्याची शक्यता**

पवित्र पोर्टलवर जाहिराती अपलोड करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे.सुरुवातीला २० फेब्रुवारी, त्यानंतर २८ फेब्रुवारी, १५ मार्च, ३१ मार्च आणि आता १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.त्यामुळे आणखी जाहिराती अपलोड होतील आणि रिक्त जागांची संख्याही वाढण्याची शक्यता आहे.

> उर्वरीत १० टक्के व अपात्र रिक्त पदे गतिमान प्रक्रियाद्वारे भरण्यात यावी.सर्व प्राथमिक अस्थापनतील व जिल्हा परिषद च्या शाळेतील रिक्त पदे सुधारित संचमान्यता प्रमाणे भरावी. वाड्या वस्त्यावरील कमी पट संख्या शाळेत शिक्षकांना संधी उपलब्ध होईल.उर्वरीत भरती पूर्ण करावी. हि भरती पूर्ण करून पुढील तीसरा टेट परीक्षांचे नियोजन केले पाहिजे जेणेकरुन भावी शिक्षकांना जूनच्या नवीन शैक्षणिक वर्षाला शिक्षकांना न्याय मिळेल.
>
> - **प्रशांत शिरगूर,** राज्य उपाध्यक्ष,
> डि.एड बी.एड असो. तथा पवित्र पोर्टल शिक्षक भरती



## दीनानाथ कमळे गुरूजी पतसंस्था चेअरमनपदी संतोष अंकलगी

**सोलापूर, दि.५ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील स्व. दीनानाथ कमळे गुरूजी पतसंस्थेच्या चेअरमनपदी जीवन ज्योत प्रशाला कंदलगाव येथील सहशिक्षक संतोष अंकलगी तर व्हाईस चेअरमनपदी जीवन विकास प्रशाला भंडारकवठेचे सहशिक्षक संतोष कमळे यांची बिनविरोध निवड करण्यात आले. निवडणूक अधिकारी म्हणून दक्षिण सोलापूर तालुका सहायक निबंधक कार्यालय अधीक्षक विद्या शिंदे यानी काम पाहिले. यावेळी नूतन चेअरमन व व्हाईस चेअरमन, सर्व नूतन संचालक यांचा सत्कार सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे विश्वस्त तसेच पतसंस्थेचे मार्गदर्शक नागेश बिराजदार , सहसचिव सुबोध कोळी, विश्वस्त अमर कमळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे मार्गदर्शक नागेश बिराजदार यांनी पतसंस्थेच्या कारभार पारदर्शक करावा व आदर्श पतसंस्था करावे. सभासदांच्या ओळखून जास्तीत जास्त लाभ व् सुविधा देण्याचे काम करावे असे आवाहन केले. यावेळी प्राचार्य डॉ जवाहर मोरे, प्रा. डॉ. भगवान अधटराव, मावळते चेअरमन राजशेखर कमळे यांच्यासह नूतन संचालक शिवशंकर म्यानकेळे सुनिल हविनाळे, भीमशंकर खूने, अमोगसिद्ध बगले, बसवराज कोळी, सचिन व्हनमाने, समीना शेख, सुशीला सुतार, पतसंस्था सचिव राजू कुरनूरकर उपस्थित होते.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



# ‘वक्फ’ मुद्यावरून इंडिया आघाडीत फूट

### खासदार संजय राऊत यांचे प्रतिपादन

### सर्वोच्च न्यायालयात जाणार नाही

**मुंबई, ५ एप्रिल**

वक्फ विधेयकाची फाईल आता आमच्यासाठी बंद झाली असून आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार नाही, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे इंडिया आघाडीत वक्फवरून फूट पडल्याचे दिसून येत आहे.

वक्फ विधेयकाचे हिंदुत्वाशी काहीच घेणेदेणे नसून हे एक सर्वसामान्य विधेयक आहे. काही ठराविक उद्योगपतींना वक्फच्या जमिनीवर ताबा मिळविणे सोपे जाईल, या उद्देशानेच हे विधेयक आणल्याचा आरोप राऊत यांनी केला. विधेयकाला मिळालेल्या घटनात्मक दर्जाला आव्हान देण्यासाठी एएमआयएम, आप, राजद, द्रमूक आणि काँग्रेसने वक्फच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे ठाकरे गटाने मात्र, सुरक्षित डाव खेळताना संसदेत विरोधाची भूमिका घेतली असली तरी न्यायालयीन लढाईतून मात्र, माघार घेतली आहे.



दरम्यान, वक्फ सुधारित विधेयकाला उद्धव ठाकरे गटाचा पाठिंबा मिळविण्याचे राज्य आणि केंद्रातील भाजप नेत्यांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले, असा दावा राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी केला आहे. प्रारंभी विरोधात असणाऱ्या बिजू जनता दलावरही असाच दबाव टाकण्याचे राऊत म्हणाले.

भारतीय जनता पक्षाच्या लाडक्या उद्योजकांसाठी केंद्र सरकारने वक्फ विधेयक आणले आहे. भ्रष्टाचाराला कायदेशीर चौकटीत बसविण्यासाठी आणि दोन लाख कोटी किंमत असलेली जमीन लाडक्या उद्योगपतींना देण्यासाठी हा सारा खटाटोप केंद्र सरकारने केला आहे. ओडिशातील बिजू जनता दलाला लोकसभेत पाठिंबा देण्यासाठी दबावात आणले. पण, या पक्षाने तरीही भाजपपुढे न झुकता आपल्या खासदारांसाठी व्हीप जारी केला नाही. त्यांना विवेकाचा वापर करून मतदानासाठी मोकळे सोडले. त्यांनी आमच्या प्रमाणे थेट विरोधात मतदान करण्याचा निर्णय घेतला नसला तरी काहींनी तरी विधेयकाच्या विरोधात मतदान केल्याचे दिसते. वक्फ विधेयक फार मोठ्या फरकाने पारित झाले असे नाही. सरकारच्या बाजूने धड ३०० मतेही पडली नाहीत. विरोधी पक्षांचा आकडा आणखी जास्त झाला असता पण आमचे काही सहकारी उपस्थित राहिले नाहीत तर काही आजारी होते, असे राऊत यांनी सांगितले. वक्फ विधेयकावर प्रथम लोकसभा आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी लोकसभेत जोरदार चर्चा झाली. दोन्ही सभागृहात साधारणतः १२ तास चर्चा झाली. विधेयकाला संसदेच्या दोन्ही सभागृहाची संमती मिळाल्यानंतर आता ते स्वाक्षरीसाठी राष्ट्रपतीकडे पाठविले जाणार आहे. राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाल्यानंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल. (वृत्तसंस्था)

### आम्ही झुकलो नाही

राज्यसभेतील मतदानाच्या वेळी आमच्यावर दबाब टाकण्याचा प्रयत्न महाराष्ट्र आणि केंद्रातील भाजप नेत्यांनी करून पाहिला पण आम्ही दबावाला झुगारून दिले. आम्ही आमच्या मताप्रमाणे निर्णय घेतला आणि विरोधात मतदान केले, असे संजय राऊत म्हणाले.



अभिनेते मनोज कुमार यांना महानायक अमिताभ बच्चन, सलीम खान यांनी श्रद्धांजली अर्पण केली

# अभिनेते मनोज कुमार पंचतत्त्वात विलीन

### शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार, मान्यवरांची उपस्थिती

**मुंबई, ५ एप्रिल**

देशभक्तीचा जागर करणारे चित्रपट अभिनेते मनोज कुमार यांच्यावर जुहू उपनगरातील स्मशानभूमीत शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार करण्यात आला. सकाळी साडेअकरा वाजता विशाल आणि कुणाल यांनी त्यांना मुखाग्नी दिला. मनोज कुमार यांचे शुक्रवारी कोकिलाबेन रुग्णालयात दीर्घ आजाराने निधन झाले.

अन्त्ययात्रेला चित्रपट आणि अन्य क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. अभिषेक बच्चन, सुभाष घई, अनू मलिक, झायेद खान, प्रेम चोप्रा, राजपाल यादव उपस्थित होते. अभिनेते धर्मेंद्र, मधुर भांडारकर, फराह खान, साजीद खान यांनी मनोज कुमार यांच्या निवासस्थानी जाऊन श्रध्दांजली अर्पण केली. मनोज कुमार यांच्या मागे दोन पुत्र आणि पत्नी शशी आहेत. (वृत्तसंस्था)

# रेल्वे प्रकल्पांमुळे पायाभूत सुविधांमध्ये वाढ : पंतप्रधान

**नवी दिल्ली, ५ मार्च**

वाहतुकीवर होणारा खर्च कमी होण्याबरोबरच पुरवठा साखळी आणखी मजबूत होण्यास रेल्वे प्रकल्पामुळे मदत होणार आहे. तसेच पायाभूत सुविधांमध्येही वाढ होईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने शुक्रवारी चार रेल्वे प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या चार प्रकल्पांची किंमत १८६५८ कोटी एवढी आहे. या प्रकल्पांवर बोलताना पंतप्रधान म्हणाले की, या चार प्रकल्पांमुळे महाराष्ट्र, ओडिशा आणि छत्तीसगड या तीन राज्यांमधील १५ जिल्ह्यांमधील दळणवळण सुविधा वाढणार असून रेल्वे जाळ्यात १२४७ किलोमीटरने वाढ होणार आहे. व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम-२ ला केंद्रीय मंत्रिमंडळाने मजुरी दिली असून यामुळे सीमेवरील गावांमधील नागरिकांचे जीवनमान उंचावणार आहे. व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम-१ मध्ये जेवढी गावे अंतर्भूत करण्यात आली होती त्यापेक्षा जास्त गावे व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम-२ मध्ये समाविष्ठचा प्रयत्न होईल



# वक्फ बोर्डाच्या नावावर जमीन बळकावल्यास तुरुंगात टाकू

### मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा इशारा

**महाराजगंज, ५ एप्रिल**

वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाल्याने आता कोणीही वक्फ बोर्डाच्या नावावर जमीन लुटू शकणार नाही आणि सार्वजनिक मालमत्तेचा वापर गरिबांसाठी शाळा, महाविद्यालये, रुग्णालये किंवा घरे बांधण्यासाठी केला जाईल. यापुढे वक्फ बोर्डाच्या नावावर कोणीही जमीन बळकावल्याचे समोर आल्यास त्यांची तुरंगात रवानगी करण्यात येईल असा इशारा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिला आहे. मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी शनिवारी महाराजगंज जिल्ह्यातील रतनपूर येथे ६५४ कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली, यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते म्हणाले, मागील सरकार केवळ स्वतःचा आणि त्यांच्या आप्तेष्टांचा विचार करायचे, त्यांना गरीब आणि वंचितांविषयी देणेघेणे नव्हते. त्यांचा वापर ते राजकारण आणि मतदान मिळविण्यासाठीच करायचे. वक्फ बोर्डाच्या जमिनीदेखील त्यांनी सोडल्या नाही. आता वक्फ बोर्डाच्या नावावर असलेल्या जमिनींवर कोणीही दरोडा टाकू शकणार नाही. वक्फ बोर्डाच्या नावाखाली सुरू असलेल्या घोटाळ्याला कायम स्वरूपी आळा घालण्याचे काम केंद्र सरकारने केले. उत्तर प्रदेशातही वक्फ बोर्डाच्या नावावर लाखो एकर जमिनीवर बेकायदा कब्जा करण्यात आला. मी पंतप्रधान नरेंद्र



# प्रीपेड वीज मीटरविरोधात उच्च न्यायालयात याचिका

**यवतमाळ, ५ एप्रिल**

महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष प्रशांत दर्यापूरकर यांनी प्रीपेड स्मार्ट वीज मीटरविरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. प्रतीक पुरी काम बघत असून, या याचिकेवर २ एप्रिलला पहिली सुनावणी झाली. प्रीपेड स्मार्ट मीटर लावण्याकरिता केंद्र सरकार ६० टक्के व महाराष्ट्र सरकार ४० टक्के अनुदान देणार आहे. म्हणजे २६ हजार कोटींचे अनुदान महाराष्ट्र सरकार देणार आहे. पण, हा पैसा शेवटी जनतेच्या खिशातून चालला आहे आणि हा एक प्रकारे सरकारी तिजोरीवरचा बोजाच आहे. ज्या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रात १८ टक्के मीटर खराब असल्याचा दावा वितरण कंपनी करीत आहे. त्याकरिता पूर्ण २ कोटी ५० लाख मीटर बदलण्याची गरज काय, असा प्रश्न याचिकेत उपस्थित केला आहे. २६ हजार कोटींचे अनुदान जर महाराष्ट्र सरकार देत आहे, तर १०४० रुपयांचे प्रत्येक मीटर झाले. हा भुर्दंड प्रत्येक विद्युत ग्राहकावर पडणारच आहे, हाही मुद्दा याचिकेत नमूद केलेला आहे.

# यंदाच्या वर्षासाठी मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम जाहीर

### ६० तरूणांची होणार निवड

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ एप्रिल-**

राज्यातील तरुणांना प्रशासनासोबत काम करण्याचा अनुभव मिळावा व त्यासोबतच त्यांच्या ज्ञानाच्या, अनुभवाच्या कक्षा रुंदावण्यास मदत व्हावी. तरुणांमधील कल्पकता व वेगळा विचार मांडण्याची क्षमता, उत्साह, तंत्रज्ञानाची आवड यांचा उपयोग प्रशासनास व्हावा आणि या माध्यमातून प्रशासकीय प्रक्रियांमध्ये गतिमानता यावी ,यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०२५-२६ जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार या कार्यक्रमात ६० फेलोंची निवड करण्यात येणार आहे.

या निवडी संदर्भातील निकष, नियुक्ती संदर्भातील अटी व शर्ती तसेच शैक्षणिक संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमाची रूपरेषा व अंमलबजावणी बाबत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत हा कार्यक्रम सुरू करण्यात आला व यशस्वीपणे राबविण्यात आला. त्यानंतर २०२३-२४ या कालावधीतील कार्यक्रम यशस्वीपणे राबविल्या नंतर आता २०२५-२६ साठी हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी नियोजन विभागाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्यामार्फत केली जाईल.



**फेलोंच्या निवडीचे निकष :**

अर्जदार भारताचा नागरिक असावा. शैक्षणिक अर्हता : कोणत्याही शाखेतील पदवीधर (किमान ६०% गुण आवश्यक) असावा.

अनुभव : किमान १ वर्षाचा पूर्णवेळ कामाचा अनुभव आवश्यक राहील. तसेच, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून पूर्णवेळ इंटर्नशिप / अप्रेंटीसशिप /आर्टीकलशिपसह १ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील. पूर्णवेळ स्वयंरोजगार, स्वयंउद्योजकतेचा अनुभवही ग्राह्य धरण्यात येईल. अर्जदारास तसे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल.

मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक राहील. हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील. तसेच, संगणक हाताळणी आणि इंटरनेटचे ज्ञान आवश्यक राहील.

**वयोमर्यादा :-** उमेदवाराचे वय अर्ज सादर करावयाच्या अंतिम मुदतीवेळी किमान २१ वर्षे व कमाल २६ वर्षे असावे. अर्जाकरिता ५०० रुपये शुल्क असून कार्यक्रमात फेलोंची संख्या ६० इतकी निश्चित करण्यात आली असून, त्यापैकी महिला फेलोंची संख्या फेलोंच्या एकूण संख्येच्या १/३ राहील. १/३ महिला फेलो उपलब्ध न झाल्यास त्याऐवजी पुरुष फेलोंची निवड करण्यात येईल. फेलोंचा दर्जा हा शासकीय सेवेतील गट-अ अधिकाऱ्यांच्या समकक्ष असेल. उमेदवारास ऑनलाईन अर्ज करून ऑनलाईन परीक्षा शुल्क भरावे लागेल. तसेच ऑनलाईन अर्ज करताना आधार कार्ड किंवा अन्य ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. परीक्षा शुल्क भरणाऱ्या उमेदवारास ऑनलाईन वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षा द्यावी लागेल.

ऑनलाईन परीक्षा देण्याची कार्यपद्धती संचालनालयाच्या mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल व त्यातील अटी व शर्तीचे उमेदवाराने पालन करणे आवश्यक राहील.

यापूर्वी मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमात काम केलेले फेलो पुनश्चः या कार्यक्रमांतर्गत फेलो निवडीसाठी पात्र असणार नाहीत. तसे फेलोंनी अर्जात नमूद करणे आवश्यक राहील. (वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षेत उत्तीर्ण सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या सुमारे २१० उमेदवारांना दिलेल्या विषयांपैकी एका विषयावरील निबंध विहीत तारखेस विहीत वेळेत ऑनलाईन पध्दतीने सादर करावा लागेल. वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षेत उत्तीर्ण सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या २१० उमेदवारांची मुलाखत मुंबई येथे घेण्यात येईल. निवडक २० जिल्ह्यामध्ये प्रत्येकी दोन ते तीन फेलोंचा गट नियुक्त करण्यात येईल. या गटातील एक फेलो संबंधित जिल्हाधिकारी व एक ते दोन फेलो मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांच्या अधिनस्त काम पाहतील. नियुक्ती १२ महिने कालावधीसाठी असेल. यामध्ये वाढ करण्यात येणार नाही. तसेच फेलो रुजु झाल्याच्या दिनांकापासून १२ महिन्यांनी त्याची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

### ॥ उसंतवाणी ॥

१४७१

वक्फ विरोधात । आले रस्त्यावर ।
बंदे ते कट्टर । इस्लामचे ॥१॥

पाठिंबा का देतो । वक्फ कायद्याला ।
मारले वृद्धाला । कट्टरांनी ॥२॥

आता सांगा कुठे । गेली उदारता ।
कशाला मारता । सामान्यांना ॥३॥

शाहीनबागेची । धमकी दे कोण ।
धर्मांधता कोन । जाणा त्याचा ॥४॥

कायद्याशी कोण । करी बगावत ।
हवी शरियत । कुणाला ही ॥५॥

वक्फ चर्चेतून । पळाला राहुल ।
मुद्द्यालाच हूल । देऊनिया ॥६॥

कांत इस्लामचे । अंधभक्त बंदे ।
असहिष्णू धंदे । पहा त्यांचे ॥७॥



श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
०५ एप्रिल २०२५

# वादग्रस्त धनंजय मुंडेचा पाय आणखी खोलात!

### पोटगी विरूध्दची याचिका सत्र न्यायालयाने फेटाळली

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ५ एप्रिल-**

गेल्या काही महिन्यापासून वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. कौटुंबिक न्यायालयाने करुणा शर्मा यांना पोटगी देण्याबाबत दिलेल्या निकालाच्या विरोधात त्यांनी दाखल केलेली याचिका मुंबईतील माजगाव सत्र न्यायालयाने शनिवारी फेटाळून लावली .अतिरिक्त सत्र न्यायालयाने यांनी हा निकाल करुणा शर्मा यांच्या बाजूने देत वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने त्यांना व त्यांच्या मुलगी शिवानी यांना दरमहा २ लाख रुपये पोटगी देण्याचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे त्याविरोधात धनंजय मुंडे यांना उच्च न्यायालयात आव्हान देण्याशिवाय पर्याय नाही. अन्यथा त्यांच्या आमदारकीवर गंडातर येऊ शकते. वांद्रे न्यायालयातील न्या.एस.बी.जाधव यांनी २८ फेब्रुवारीला करुणा मुंडे यांच्या याचिकेचा निकाल दिला होता.



# मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम

## प्रासंगिक

**श्रीराम पुरुषोत्तम बरबडे**

सूर्यवंशात दिलीप नावाचा प्रसिद्ध राजा होता. त्याच्या पत्नीचे नाव सुदक्षिणा. त्यांचा पुत्र रघु, ज्याने ९९ अश्वमेध यज्ञ केलेत. शंभराव्या वेळी इंद्राने प्रसन्न होऊन घोड्याशिवाय यज्ञ पूर्ण होईल असा आशीर्वाद दिला आणि तेव्हापासून चक्रवर्ती साम्राज्याच्या या वंशाला रघुवंश म्हणतात. रघुचा पुत्र अज ज्याने विदर्भ देशाचा राजा भोज याच्या इंदुमती नावाच्या कन्येशी विवाह केला. याच अज आणि इंदुमतीचा पुत्र म्हणजे राजा दशरथ. दशरथाला तीन राण्या होत्या कौसल्या, सुमित्रा आणि कैकेयी. पण तिघींनाही पुत्र नव्हता. दशरथाने पुत्रकामेष्टी यज्ञ केला आणि फलस्वरूप कौसल्येला राम, सुमित्रेला लक्ष्मण व शत्रुघ्न आणि कैकेयीला भरत असे चार पुत्र झाले. श्रीरामांचा जन्म चैत्र शुद्ध नवमीला अभिजित मुहूर्तावर झाला. बाल्यावस्थेत त्यांनी माता कौसल्येला अखंड अद्‌भुत रूप दाखवले होते. हा एक प्रसंग सोडला तर त्यांचे बालपण तत्कालीन इतर सर्व राजपुत्रांप्रमाणेच होते. तरुणपणी विश्वामित्रांच्या यज्ञरक्षणार्थ त्यांनी त्राटिका, मारीच इत्यादी राक्षसांचा संहार करून दशरथाचा ज्येष्ठ पुत्र या नात्याने उत्तराधिकारी म्हणून वाटचाल सुरू केली. पुढे विश्वामित्रांच्याच आशीर्वादाने श्रीरामांनी प्रचंड दुर्धर अशा शिवधनुष्याला प्रत्यंचा लावून जनकाचा सीता-स्वयंवराचा पण जिंकला व सीतेशी विवाह करून ते अयोध्येत परतले आणि दशरथाने खुश होऊन त्यांच्या राज्याभिषेकाची घोषणा केली.

येथपर्यंत सुरळीत सुरू असलेल्या श्रीरामांच्या जीवनप्रवासाने कैकेयीच्या निमित्ताने कलाटणी घेतली. राज्याभिषेक करून घेण्याच्या तयारीत असलेल्या श्रीरामांच्या नशिबात राजेपण तर दूरच उलट राजधानीचाही त्याग करून वनवास येतो. इथे प्रथमच रामाचे वेगळेपण दिसून येते. सर्वसामान्य माणूस आई-वडिलांच्या इच्छेविरुद्ध बंड करेल, नाराजी व्यक्त करेल, राज्य नको किमान अयोध्येत तरी राहू द्या असे म्हणेल. पण श्रीराम यापैकी काहीच करीत नाही. श्रीराम माता कैकेयीवर अजिबात रागावले नाही, भरताच्या राज्याभिषेकाच्या वार्तेने त्यांना आनंदच झाला. आई-वडिलांच्या इच्छेखातर त्यांच्या वचनपूर्तीसाठी युवराज राम आनंदाने पत्नी सीता आणि कनिष्ठ बंधू लक्ष्मणासह वनवास पत्करतात.

पुत्रवियोगाने मृत्यूचा शाप मिळालेल्या दशरथाचा राम वनवासात गेल्यावर मृत्यू होतो. मामाकडे गेलेल्या भरताला अयोध्येत बोलाविले जाते आणि हा सगळा घटनाक्रम ऐकून भरत प्रचंड क्रोधीत होतो. अत्यंत तीव्र शब्दांत कैकेयीची निर्भर्त्सना करून तो रामाला आणायला वनवासात जातो. ज्यांची वचनपूर्ती करायची त्या पित्याचा मृत्यू झालाय. कैकेयी सुद्धा पश्चात्तापदग्ध झालीय आणि भरत अयोध्येत चलण्याचा हट्ट धरून बसलाय. या संधीचा फायदा राम घेऊ शकत होते, पण इथे दुसऱ्यांदा रामाचे वेगळेपण दिसते. श्रीराम भरताचीच समजूत काढतात आणि आपल्या चरणपादुका देऊन त्याला परत पाठवतात. रामासोबतच इथे भरताचेही वेगळेपण उठून दिसते. समोरून चालत आलेले सिंहासन दोघेही नाकारतात. श्रीराम पित्याची वचनपूर्ती या पुत्रधर्माचे तर भरत सिंहासन ज्येष्ठ बंधूचेच या भ्रातृधर्माचे आचरण करतात.

पुढे शूर्पणखेच्या रूपाने मोहाचाही एक परीक्षेचा क्षण येतो. एकतर वनवासात आणि त्यातही ज्येष्ठ असल्याने भगवान प्रभू रामचंद्रांना नाही कोण म्हणणार? पण स्वतःच स्वतःला घातलेली एकपत्नी व्रताची मर्यादा श्रीरामचंद्र पाळतात. ज्याची परिणती रावणाद्वारे सीताहरणात होते. सीतेचा शोध घेत असताना राम-लक्ष्मणांना हनुमंत आणि सुग्रीव भेटतात. वालीचा वध करताना देखील रामचंद्र आपल्या भात्यातील अमोघ अस्त्र शस्त्र टाळून एका सामान्य बाणाचा प्रयोग करतात जेणेकरून वालीला तत्काळ मृत्यू न येता रामाची व प्रियजनांची भेट होऊन, सर्वांशी बोलून, सर्व शंका निरसन झाल्यावर मृत्यू यावा. मरताना त्याच्या मनात कुठलाही संदेह नसावा. असे करून किष्किंधेचे राज्य सुग्रीवाला परत मिळवून देतात. स्वतः राज्यपदी बसणे तर दूरच पण नगरात जायचे काम पडते तेव्हा लक्ष्मणाला दूत म्हणून पाठवतात आणि आपण स्वतः नगराबाहेर राहतात. वनवास म्हणजे वनवास. प्रतिज्ञापालन. हाच आदर्श



रावणवधानंतर सुद्धा पाळला गेलेला आहे. राम-रावण युद्धात रावण प्रभू रामचंद्रांच्या बाणाने मृत्युमुखी पडतो. त्यानंतर त्याचा उचित अंत्यविधी केला जातो. इथे खरेतर लंकाधिपतीचा वध झाला असल्याने लंका रामांनी जिंकली असते. पण प्रभू लंकेच्या सिंहासनावर बिभीषणाचा राज्याभिषेक करतात. आणि आपण स्वतः सीतेसह अयोध्येला परत जातात.

सत्ता, संपत्ती, स्त्री यांचा मोह भल्याभल्यांना भुरळ पाडतो. चारित्र्य जपताना या वाटा फार निसरड्या असतात. वर आपण पाहिले अयोध्या, किष्किंधा आणि लंका तिन्ही सिंहासने प्रभू रामांच्या हातात होती पण त्यांनी सत्तामोह टाळला आणि निःस्वार्थपणे ज्याची त्याला देऊन टाकली. ऐन तरुणपणात स्वतःची काहीही चूक नसताना केवळ सावत्र मातेच्या इच्छेखातर आणि वडिलांच्या वचनपूर्तीसाठी त्यांनी हक्काच्या राज्यपदाचा त्याग करून वनवास पत्करला. मात्या-पित्यांप्रति कुठलीही नाराजी न ठेवता, न चिडता, बंधू भरताप्रति कुठलीही द्वेषभावना न ठेवता, आनंदाने त्यांनी राज्यत्याग केला. उलट भरत न्यायला आला असता त्यालाही माता कैकेयीला दोष देऊ नको असाच उपदेश केला. पुत्रधर्माच्या पालनाचा एक अत्युच्च आदर्श प्रस्थापित केला. अयोध्या किती वैभवशाली आणि शक्तिसंपन्न चक्रवर्ती साम्राज्य होते ते आपण सुरुवातीलाच पाहिले. रावणासोबत युद्ध अटळ झाल्यावर रामाच्या मदतीला कोणीही नाही म्हटले नसते. पण कुठल्याही प्रस्थापित राजसैन्याला न घेता सामान्य अशा नर-वानर-अस्वल, शोषित, वनवासी, आदिवासी गिरिजन यांचे सहकार्य घेतले. हे सर्व वनवास पत्करल्यानंतर रामाच्या संपर्कात आले होते. अयोध्येचा त्याग करून वनवासात गेल्यावर अयोध्येशी संबंधित कोणाचीही मदत घेणे टाळले आणि वनवासाची मर्यादा निष्ठुरपणे काटेकोर पाळली. किष्किंधा आणि लंका जिंकल्यावरही साम्राज्यविस्ताराचा मोह त्यांना झाला नाही. सुग्रीव आणि बिभीषण त्यांचे मित्रच राहिले. त्यांना अयोध्येचे मांडलिक किंवा गुलाम म्हणून न वागवता मित्रत्वाच्या बरोबरीच्या नात्याने सन्मान दिला. अयोध्येत परतल्यावरही त्यांचा योग्य तो आदर सत्कार केला गेला.

शूर्पणखा तर आपण होऊन तयारच होती. पण वाली वधानंतर तारा व रुमा आणि रावण वधानंतर मंदोदरी यांच्यावरही राम हक्क दाखवू शकले असते. त्याकाळी ती पद्धतच होती. खुद्द दशरथालाही तीन राण्या होत्या. आणि तारा ही तर शास्त्रार्थ जाणणारी विदुषी होती. अहल्या, द्रौपदी, कुंती, तारा, मंदोदरी या महान पंचकन्या. ज्यात तारा आणि मंदोदरीचा समावेश आहे. सत्ता संपत्तीच्या मोहावर विजय मिळवता येईल, पण स्त्री मोह? प्रत्यक्ष विश्वामित्राचीही तपश्चर्या भंग व्हायला मेनकाच कारणीभूत ठरली होती. पण प्रभू श्रीराम सर्व मोह मायांवर विजय मिळवून पती-धर्म सांभाळत एकपत्नी व्रताचे पालन करतात.

प्रभू श्रीरामचंद्र हे विष्णूचा अवतार होते. पण मानवी देह धारण केल्यावर ते मानवी विकारांना बळी पडले नाही हे वरील सर्व प्रसंगांत आपल्याला प्रकर्षाने दिसून येते. उलट संपूर्ण आयुष्य त्यांनी विवेकाने निष्कपट, निरपेक्ष, निर्लोभी, निःस्वार्थी, न्यायी भावनेने व्यतीत केले आणि मानवी देहात असूनही देवत्व प्राप्त केले. दुसऱ्या बाजूने विचार केला असता असे दिसून येते की, विष्णूचा अवतार असल्याने त्यांना अशक्य असे काहीच नव्हते. सर्व दैवी शक्ती त्यांच्या पाठीशी होत्या. पण हे माहीत असूनही आता आपण मानव देहात आहोत आणि त्या देहाच्या ज्या मर्यादा आहेत त्या मर्यादांचा त्यांनी कधी विसर पडू दिला नाही. सुग्रीव आणि वाली युद्धात शरीर साधर्म्यामुळे सुग्रीवाला ओळखू न शकणे असा उल्लेख आहे. ही दैवी अवताराची नाही सामान्य माणसाचीच मर्यादा आहे. अगदी रावणासोबतच्या मायावी युद्धात किंवा शेवटी एक शिर उडविल्यावर लगेच दुसरे शिर तयार दिसताना देखील त्यांनी दैवी शक्तीने हे जाणले असे होत नाही तर बिभीषण त्यांना रावणवधाचा मार्ग सांगतो आणि कुठलाही दैवी चमत्कार न करता प्रभू श्रीरामचंद्र आपल्या मानवी देहाच्या मर्यादा जपत, सांभाळत आपल्या अवताराचे विहित कर्तव्य जे की रावणवध ते पूर्ण करतात.

मानवी देहात असून मानवी विकारांना बळी न पडणे आणि दैवी अवतार असूनही, नरदेहाच्या मर्यादित राहून कुठलेही चमत्कार न करता नरदेहाला शक्य आहेत त्या आणि तेवढ्याच मार्गांनी लक्ष्यप्राप्ती व रावणवध केलेल्या मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामचंद्र यांचा आदर्श प्रत्येकाने ठेवून त्याप्रमाणे सदाचरण करण्याचा प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. आज आपल्या पारंपरिक मूल्यसंस्था ढासळत असताना, तरुणांसमोर कुठलाही आदर्श नसताना, श्रीरामाचे स्मरण करणे, श्रीरामकथेचे श्रवण करणे आणि प्रभू श्रीरामचंद्रांचा आदर्श ठेवून संस्कारांची पुनर्स्थापना करणे महत्त्वाचे आहे. आज श्रीरामनवमीच्या दिवशी हाच संकल्प करूया. जय श्रीराम.

९९२११३७९९९

# मनोजकुमार नव्हे, भारतकुमार...

## श्रद्धांजली

**संजय तिवारी**

या मायावी दुनियेत येणं, आपलं कौशल्य पणाला लावणं आणि त्या कौशल्याच्या सोबतीला नशिबाचीही साथ आहे, हे सिद्ध करणं हे वाटतं तेवढं सोपं काम नाही. इतकं सारं असेल तर इथला रसिक मायबाप तुम्हाला एका विशिष्ट प्रतिमेच्या चौकटीत अडकवून मोकळा होत असतो. ही प्रतिमा आणि चौकट अर्थात बऱ्याचदा तुमच्या कर्तृत्वाच्या शिखरांची उंची मर्यादित ठेवत असतात. चित्रपटसृष्टीत तर याचा प्रत्यय वरचेवर येत असतो. मात्र ही 'प्रतिमा' हीच ज्यांची खरी ओळख असते, अशा काही भाग्यवान कलावंतांपैकी एक नाव होतं मनोजकुमार. या देशाची सेवा करण्याचा सारा मक्ता आपल्याकडे असल्याच्या थाटात तो वावरायचा. हे देशप्रेम पडद्यावर व्यक्त झालं पाहिजे, यासाठी तो आग्रही असायचा. निर्माण केलेल्या प्रत्येक चित्रपटातून अगदी ठळकपणे व्यक्त केलं. मनोजकुमारसारखा भारतमातेचा सुपुत्र अन्य कोणी नाही असं वाटावं इतकं मनोजकुमारने या प्रतिमेत आपल्याला बांधून घेतलं. एक वेळ कारगिल युद्धात प्राण पणाला लावणाऱ्या खऱ्या जवानांबद्दलचा आदर कमी असेल, पण तीच व्यक्तिरेखा मनोजकुमारने पडद्यावर रंगवली असती तर, त्याला अमाप लोकप्रियता मिळाली असती. असो. हा झाला थोडा अतिशयोक्तीचा भाग. पण यात वस्तुस्थिती सांगणारी सत्यताही आहेच. एखाद्या कलावंताची विशिष्ट छबी रसिकांच्या मनावर कशी साम्राज्य करत असते याचं उत्तम उदाहरण म्हणून मनोजकुमारचं नाव घेता येईल.



मनोजकुमारने आपली कारकीर्द कृष्णधवल चित्रपटांपासून सुरू केली. काही वर्ष रोमँटिक हिरोची भूमिका पार पाडल्यानंतर भारतमातेचा निष्ठावान सेवक अशी त्याची प्रतिमा तयार होत गेली. स्वतःच निर्माण केलेल्या अनेक चित्रपटांमधून एका साध्यासुध्या भारतीयाचा देशीपणा, त्याची संस्कृती याचं दर्शन त्याने घडवलं. आपल्या चित्रपटांमध्ये त्याने नायिकांशी जवळीक ठेवण्याचं प्रकर्षानं टाळलं. आपण 'भारतमाता' असा उल्लेख करतो तेव्हा स्त्रीत्वाशी खेळणं कसं शक्य आहे, असा सवाल मनोजकुमार करतो. १९७० आणि १९८० चं दशक हे मनोजकुमारच्या लोकप्रियतेच्या चढत्या आलेखाचं दशक होतं. अर्थात त्याच्यावर मनापासून प्रेम करणारे फॅन्स भारतभर आहेत. मनोजकुमारने भारतकुमार म्हणून आपली इमेज तयार केलीच, पण इतर प्रकारच्या भूमिकाही त्याने ज्या पद्धतीने केल्या त्या आजच्या पिढीला आदर्श ठराव्यात अशा आहेत. धोती-कुर्ता हा पेहराव त्याने आदर्श पोशाख म्हणून रसिकांच्या मनावर बिंबवला. त्याचं हसणं, नाचणं, गाणं आणि एकूणच वावरणं यामध्ये कधीच भडकपणा नव्हता. साधेपणा हेच त्याचं वैशिष्ट्य होतं. भूमिकेच्या मागणीप्रमाणे त्याने कोट-सूट असे पोशाख वापरले. खालच्या पट्टीतली संवादफेक हे दिलीपकुमारच्या संवादफेकीचं वैशिष्ट्य होतं. मनोजकुमारनेही काहीशी अशाच प्रकारची संवादफेक करणं पसंत केलं.

आज इतर क्षेत्रांप्रमाणेच चित्रपटक्षेत्रही तंत्रज्ञानाच्या बाबतीत फारच पुढारलं आहे. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी मात्र परिस्थिती अशी नव्हती. छायाचित्रण, स्टील फोटोग्राफी अशा तंत्रज्ञानाच्या बाबतीत फार प्रगती झालेली नव्हती. मात्र असं असतानाही कॅमेऱ्याच्या सर्व अँगलसमधून मनोजकुमार देखणाच दिसत असे. 'पोलाईटनेस' हा मनोजकुमारचा पडद्यावर वाखाणण्याचा गुण होता. आजच्या नटांप्रमाणे अकांडतांडव, आक्रस्ताळेपणा करून केलेल्या अभिनयाला खरा अभिनय मानण्याचा प्रयत्न मनोजकुमारने कधी केला नाही. शांत, संयमी लयीतला अभिनय हे त्याचं गुणवैशिष्ट्य. मनोजकुमारच्या चाहत्यांमध्ये स्त्रियांची संख्या लक्षणीय होती, यामागील कारण बहुधा हेच असावं. मनोजकुमारचा चित्रपट म्हटल्यावर भडकपणा, असभ्यपणा नसणार, याची खात्री प्रेक्षकांना असायची. त्याच्या चेहऱ्यातही एक प्रकारचा साधेपणा असायचा. 'गाव का छोरा' ही त्याची प्रतिमा अधिक सशक्त झाली ती त्याच्या चेहऱ्यात असणाऱ्या या कमालीच्या साधेपणामुळे. कपाळ आच्छादून टाकणारी त्याची केशरचना त्याच्या या प्रतिमेला अधिक पोषक होती. त्याच्या काळातल्या साधना, आशा पारेख, सायरा बानू ते अगदी हेमामालिनीपर्यंत सर्व आघाडीच्या अभिनेत्रींबरोबर मनोजकुमारने नायक रंगवला. गूढगर्भ वाटाव्यात अशा भूमिकांमध्ये मनोजकुमार अधिक रमला. 'वो कौन थी' असो किंवा गाथा ख्रिस्तीच्या कादंबरीवर आधारित 'गुमनाम' असो मनोजकुमारचा पेहराव, त्याचा अभिनय या गोष्टी संस्मरणीय होत्या.

लालबहादूर शास्त्री यांनी दिलेली 'जय जवान जय किसान' ही घोषणा गाजत होती. याच घोषणेला केंद्रस्थानी ठेवून मनोजकुमारने 'उपकार' या चित्रपटाची निर्मिती केली. त्याचा हा चित्रपट 'मेगाहिट' झाला. अशा प्रकारच्या चित्रपटात त्याचा पेहराव पूर्ण शरीर झाकून टाकणारा असल्यामुळे त्याच्या चेहऱ्यावरील अभिनय शोधण्यासाठी कॅमेरामनला खटाटोप करावा लागत असे असं विनोदाने म्हटलं जायचं. प्राणने आजवर रंगवलेला खलनायक मनोजकुमारने 'उपकार'मध्ये पूर्णपणे बदलून टाकला. प्राणने या चित्रपटात रंगवलेला खलनायक अतिशय वेगळ्या प्रकारचा होता. प्राणने नंतरही अनेकदा आपल्या मुलाखतीमध्ये या गोष्टीचा उल्लेख केला आहे आणि आपल्या या वेगळ्या भूमिकेसाठी मनोजकुमारला धन्यवाद दिले होते. आपल्याला वाईट प्रतिमेतून बाहेर काढण्याचं श्रेय त्याने मनोजकुमारला दिलंय. खलनायकालाही त्याची काही बाजू असू शकते हे 'उपकार'मध्ये प्रथमच दाखवलं गेलंय. प्राणप्रमाणेच 'मन्ना डे' या गुणी गायकाच्या आवाजाला मनोजकुमारने मोठा वाव दिला. देशप्रेमावरची त्याने गायिलेली गाणी प्रचंड लोकप्रिय झाली. दरम्यान, 'पूरब और पश्चिम' हा वेगळ्या धाटणीचा सिनेमा मनोजकुमारने निर्माण केला. पाश्चात्त्य संस्कृती, त्यातला फोलपणा लक्षात न घेता त्याचं अंधानुकरण करणारी आपली भारतीय जनता याचं चित्रण 'पूरब और पश्चिम'मध्ये मनोजकुमारने केलं. स्त्रियांमध्ये वाढणारी व्यसनाधीनता हे पाश्चात्त्यांचं अंधानुकरण असल्याचं त्याने चित्रपटामध्ये पटवून दिलं.

कोणताही संदेश देताना तो आपण कोणत्या पद्धतीने देतोय हे अधिक महत्त्वाचं असतं. मनोजकुमारने या गोष्टीचं भान नेहमीच ठेवलं. संदेश तर परिणामकारक रीतीने पोहोचवायचा आणि तो कंटाळवाणा तर होऊ नये, त्याचा थाट प्रचारकी असू नये याची काळजी मनोजकुमारने नेहमीच घेतली. साखरेचं आवरण लावून कडू गोळी दिली तरी ती गोड लागते, हे सूत्र त्याने पक्कं लक्षात ठेवलं. त्यामुळेच देशप्रेमाचा संदेश पोहोचवताना त्याला मनोजकुमारने मनोरंजनाची जोड दिली. 'पूरब और पश्चिम'सारख्या चित्रपटातून त्याने दिलेला संदेश प्रेक्षकांच्या गळी उतरला तो त्यामुळेच. संगीतकार रवी यांच्या दिग्दर्शनामुळे 'दो बदन' लोकप्रिय झाला हे खरं, पण त्यातली मनोजकुमारची भूमिका वाखाणण्याजोगी होती. हेमामालिनीबरोबरचा 'संन्यासी'ही गाजला तो मनोजकुमारमुळे. बॉक्स ऑफिसवर हे दोन्ही चित्रपट हिट ठरले ते मनोजकुमारमुळे. 'क्रांती'ने खरोखरच चित्रपटसृष्टीत नवी क्रांती केली. देशप्रेम चित्रपटातून दाखवल्यावर त्याचा परिणाम केवढा व्यापक असतो, याचं नवं परिमाण 'क्रांती'ने घडवलं. दिलीपकुमार, शत्रुघ्न सिन्हा, शशी कपूर यांच्यासारखे मोठे कलाकार 'क्रांती'मध्ये होते, तरी मनोजकुमारचं वेगळेपण उठून दिसलं. 'क्रांती'मध्ये महागडे सेट, भव्य ड्रेपरी यावर भरपूर पैसा खर्च करण्यात आला. परंतु 'क्रांती'ने उत्पन्नाचे विक्रम केल्यामुळे हा खर्च हातासरशी बाहेर पडला.

देशभक्तिपर चित्रपटांना यश मिळतं, पण त्यामध्ये काम करणाऱ्या अभिनेत्यांना तितकंसं यश मिळेलच असं नाही. पण मनोजकुमारसारखे काही अभिनेते त्याला अपवाद असतात. अमिताभ बच्चन, अजय देवगण यांच्यासारखे आघाडीचे कलाकार असूनही देशभक्तिपर चित्रपट कसे आदळतात हे आपण पाहिलं आहे. एखादा अपवाद वगळता देशभक्तिपर चित्रपट गाजण्याबाबत सारा सावळा गोंधळच आहे. पण मनोजकुमारने निर्माण केलेले आणि अभिनय केलेले सारे चित्रपट तिकीट खिडकीवर यशस्वी ठरले. आज तो आपल्यामध्ये नाही, पण त्याच्या देशभक्तीने सजलेल्या भूमिका हिंदी चित्रसृष्टीमध्ये अजरामर राहतील.

## रविवारची पत्रे

### सर्वांचा आदर्श श्रीराम

आदर्श व्यक्ती म्हणून कुणाची प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर येत असेल तर ती म्हणजे श्रीरामचंद्रांची. आयुष्य जगताना आपण जीवन कसे जगावे? हे आपल्याला श्रीराम चरित्र शिकवते. जीवनात अनेक अडचणी येतात, तरीही आपल्या नैतिक मूल्यांवर व आदर्शांवर चालून, त्यांना भेदून कसे पुढे जायचे हे आपल्याला श्रीरामचंद्रांच्या चरित्रावरून कळते. चांगल्या मार्गांवर चालणाऱ्या सर्वसामान्य माणसाला जीवनात अनेक अडचणींना तोंड देताना श्रीरामांचे चरित्र खरोखरच आदर्श ठरू शकते. श्रीरामांनी आपल्या जीवनात आत्मविश्वास व सकारात्मकतेच्या जोरावर मोठ मोठ्या संकटावर विजय मिळवला. खरं तर आत्मविश्वास, सकारात्मकता, नैतिकता, सच्चेपणा हे श्रीरामांच्या जीवनाचे खरे सूत्र होते.

त्याच आदर्श मूल्यांवर ते जीवनभर चालले व पुढील पिढ्यांसाठी एक आदर्श कायम केला. श्रीरामांचे चरित्र सर्वसामान्यांच्या मनात नेहमीच आत्मविश्वास निर्माण करते. श्रीरामांची कथा आपल्याला शिकवते की एक सामान्य व्यक्ती आत्मविश्वास व सकारात्मकतेच्या जोरावर प्रचंड यश मिळवू शकते, असाध्यही साध्य करू शकते. असे असाध्य साध्य करताना जीवनाचे लक्ष्य साध्य करताना, तुम्हाला कुठल्याही विशिष्ट संपत्तीची, विशिष्ट सत्तेची किंवा आप्तस्वकीयांच्या मदतीची आवश्यकता नाही. या सर्वांची मदत न घेता ही व्यक्ती केवळ आणि केवळ स्वतःच्या मेहनत, आत्मविश्वास, सकारात्मकता या गुणांवर उच्च ध्येय गाठू शकते. किंबहुना श्रीरामांचे चरित्र असा ठाम विश्वासच आपल्यात निर्माण करते.

खरे तर श्रीरामांनी कधीही यश मिळवण्यासाठी आपल्या आप्तस्वकीयांची मदत घेतली नाही. स्वतःच्या बळावर त्यांनी आपल्या जीवनात यशाची भली मोठी उंची गाठली. कल्पनेतही अशक्यप्राय वाटणारा रामसेतू त्यांनी प्रत्यक्षात उतरवला, बलाढ्य रावणालाही त्यांनी पराजित केले. श्रीरामांप्रमाणेच मनुष्याला साधेपणा, सरळपणा, स्वच्छ व निर्मळ मन, निःस्वार्थ मन असणारा माणूस मोठ मोठी आमिषे, प्रलोभने याच्या मार्गाने येणाऱ्या संकटांना सहज परतावून लावण्यास समर्थ ठरतो. त्यांचे हेच गुण त्याच्यासाठी श्रीरामरक्षा कवच ठरतात. श्रीरामांनी आपल्या जीवनात सतत संघर्ष केला. मग कुटुंबासोबत असो, वनवासातील जीवन असो, रावणाशी झालेलं युद्ध असो किंवा राजा झाल्यावर प्रजेच्या सुखासाठी असो. हा संघर्ष करताना त्यांनी मेहनत, प्रामाणिकपणा, संघटन कौशल्य, आत्मविश्वास, सकारात्मकता, कुटुंब कल्याण व देशाचे कल्याणाची भावना सदैव ठेवत आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली.

जेव्हा एखादी माणूस आजही श्रीरामांच्या या तत्त्वांवर चालतो तेव्हा या गुणांच्या जोरावर एखादा शेतकऱ्याचा मुलगा आयएएस अधिकारी होतो, एखाद्या मजुराचा मुलगा वैज्ञानिक होतो, एखाद्या खाण कामगाराची मुलगी देशाची राष्ट्रपती होते, तर चहा विकणाऱ्याचा मुलगा देशाचा पंतप्रधान होतो. हा चमत्कार आजही घडतो तो या राम तत्त्वांवर चालणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात. खरंतर श्रीरामांनी आपल्या आयुष्यात कधीही दैवी चमत्कार केला नाही किंवा त्याचा आधार घेतला नाही. या उलट मनुष्याच्या मानवी सद्गुणांच्या आधारावर स्वतःची सक्षमता वाढवून यश मिळवून मानवी सक्षमतेच्या व विकासाच्या कक्षा रुंदावल्या. श्रीरामांचे हे तत्त्व केवळ भारतीयांपुरतेच मर्यादित नाही तर ते विश्वव्यापक आहे. संपूर्ण विश्वाच्या यशाचा विश्वबंधुत्वाचा पाया ठरू शकणारे तत्त्व म्हणजे श्रीरामांचे रामतत्त्व.

**हेमांगी देशपांडे**/७३५०८२३७४२

### इतिहासाचा विसर की हेतुपुरस्सर दुर्लक्ष?

''सत्य कितीही झाकण्याचा प्रयत्न झाला तरी ते सूर्यप्रकाशासारखे प्रखर असते! पण काही जणांचे डोळेच मिटले असतील, तर त्यांना सूर्यप्रकाशाचे तेज कसे दिसणार?'' नुकत्याच नागपूर येथे पार पडलेल्या एका कार्यक्रमात, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचे खुलेपणाने कौतुक केले. संघाच्या राष्ट्रसेवेच्या अपार कार्याचा गौरव करताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा केवळ सामाजिक संघटना नसून, तो भारतीय राष्ट्रवादाचा मूळ गाभा आहे. आणि बस्स! एवढे ऐकताच काहींना घशात अडकलेला कडू घोट गिळावा लागल्यासारखी अवस्था झाली. संघाचे नाव जरी कुणी गौरवाने घेतले तरी यांना असह्य होते. स्वातंत्र्यलढ्यात संघ कुठे होता, अशी जुनीच टेप हे पुन्हा वाजवू लागले. पण त्यांचे दुर्दैव असे की, इतिहास त्यांच्या थापांना पुन्हा पुन्हा खोटे ठरवतो आहे!

संघाच्या स्वातंत्र्यलढ्यातील भूमिकेबाबत जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवली जाते. काही राजकीय ठेकेदार संघाने स्वातंत्र्यलढ्यात कोणतेही योगदान दिले नाही, असा अपप्रचार करत असतात. पण वास्तव काय आहे? ऐतिहासिक दस्तावेज आणि तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास केला तर हे स्पष्ट होते की, संघाचे योगदान केवळ महत्त्वाचेच नव्हे, तर निर्णायक होते. स्वातंत्र्यलढा म्हणजे केवळ तुरुंगात जाणे किंवा ठरावीक आंदोलनांना पाठिंबा देणे नव्हते. राष्ट्रनिर्माणाच्या दीर्घकालीन दृष्टिकोनातून समाज जागृती, युवकांचे संघटन, शिस्तबद्ध संघटन निर्माण करणे आणि राष्ट्रीय विचार बिंबवणे हे सुद्धा स्वातंत्र्यलढ्याचाच एक भाग होते. याच भूमिकेतून संघाचे कार्य उभे राहिले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी केली. हे विसरता येणार नाही की, डॉ. हेडगेवार हे स्वतः काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी १९२१ च्या असहकार आंदोलनात भाग घेतला होता. त्यांचा पिंडच क्रांतिकारी होता. पण केवळ ब्रिटिशांविरुद्ध लढणे पुरेसे नाही, तर हिंदू समाजाच्या संघटनाशक्तीला जागृत करणे हेच दीर्घकालीन स्वातंत्र्याची ग्वाही देऊ शकते, हे त्यांनी ओळखले आणि संघस्थापनेच्या मार्गावर ते वळले.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात संघाने थेट सहभाग घेतला नाही, हे विरोधक सतत ओरडून सांगतात. पण वास्तविक पाहता, काँग्रेसमध्येच या आंदोलनावर एकमत नव्हते. खुद्द महात्मा गांधींनी करा किंवा मरा असे आवाहन केले, पण तत्कालीन काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी या आंदोलनाला संमिश्र प्रतिसाद दिला होता. अशा परिस्थितीत संघाने आपले स्वतंत्र मार्ग आखले आणि भारतासाठी दीर्घकालीन राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेकडे लक्ष केंद्रित केले. राष्ट्रासाठी समर्पित नेतृत्व, संस्कारक्षम आणि राष्ट्रीय विचाराने प्रेरित युवकांची फौज तयार करणे हे संघाने त्या काळात केले, जे आजही देशासाठी अमूल्य ठरते आहे.


ब्रिटिश गुप्तचर अहवालांमध्येही संघाच्या राष्ट्रवादी कार्याकडे संशयित नजरेने पाहिले गेले होते. उदाहरणार्थ, १९३३ मध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांनी अहवालात लिहिले होते की, ''हे एक कठोर शिस्तबद्ध संघटन असून, भारतीय युवकांमध्ये राष्ट्रवाद जागृत करण्याचे कार्य करत आहे.'' (संदर्भ : ब्रिटिश इंटेलिजन्स रिपोर्ट, १९३३). जर संघ हा निष्क्रिय असता, तर ब्रिटिश सरकारने त्याच्या हालचालींवर एवढी बारीक नजर ठेवली असती का? स्वातंत्र्यानंतर १९४७ च्या विभाजनाच्या काळात पाकिस्तानातून स्थलांतरित होणाऱ्या लाखो निर्वासितांसाठी संघाच्या स्वयंसेवकांनी जिवाची बाजी लावली. दिल्लीतील किंग्सवे कॅम्पमध्ये स्वयंसेवकांनी हजारो निर्वासितांना अन्न, वस्त्र आणि सुरक्षितता पुरवली होती. हे त्या लोकांनी का विसरावे, जे आज संघावर खोटे आरोप करत सुटले आहेत? संघाच्या स्वातंत्र्यलढ्यातील भूमिकेवर शंका उपस्थित करणाऱ्यांनी स्वातंत्र्यलढा म्हणजे केवळ आंदोलन हा संकुचित दृष्टिकोन सोडून, व्यापक इतिहासाचा अभ्यास करावा. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा केवळ एक संस्था नाही, तर राष्ट्रप्रेम, समर्पण आणि सशक्त भारताच्या उभारणीसाठी प्रेरित असलेली एक चळवळ आहे. विरोधक कितीही नाकारत असले, तरी सत्याचा प्रकाशाला कोणीही कधीही झाकाळू शकणार नाही!

**प्रा. भागवत भांगे**/७२७६४६९८००

### नर्मदा परिक्रमेची संकल्पपूर्ती

जवळपास १०-१२ वर्षांपूर्वी मी जगन्नाथ कुंटेचे 'नर्मदे हर' हे पुस्तक वाचले होते. तेव्हापासून आपण ही नर्मदा-परिक्रमा करावी अशी प्रबळ इच्छा मनात येऊन गेली. पण तेव्हा सांसारिक जबाबदाऱ्या, माझी शाळा यामुळे ते शक्य नव्हते. तर असा हा नर्मदा- परिक्रमेचा आमचा योग २० फेब्रुवारी २०२५ ला जुळून आला. आमचा ओंकारेश्वरचा प्रवास सुरू झाला. नर्मदा म्हणजे सगळ्यांना आनंद देणारी नदी असा आमचा नर्मदेचा प्रवास सुरू झाला!! ओंकारेश्वरला पोचल्यावर आम्ही सगळेच खूप थकलो होतो. थोडा आराम झाल्यावर आम्ही ममलेश्वरच्या दर्शना साठी निघालो. हे भगवान शंकराच्या १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. दुसऱ्या दिवशी पहाटेच सगळ्यांनी नदीत अंघोळी आटोपल्या व नर्मदेचे जल आपल्या बाटलीत भरून नर्मदा- परिक्रमेचा विधीपूर्वक संकल्प करण्यात आला. नर्मदेची ओटी भरून, कन्यापूजन करण्यात आले. जवळपास ३५०० किमीचा प्रवास आम्हाला करायचा होता. नर्मदेचे जल नेहमी आपल्या सोबतच ठेवायचे व प्रत्येक ठिकाणी थोडे थोडे जल त्यात टाकत जायचे. आमचा मुक्काम महाराष्ट्र-गुजरातच्या बॉर्डरवर असलेले शहादा या गावी होता. हे छोटेसेच गाव नंदुरबार जिल्ह्यात आहे. सकाळच्या प्रसन्न वातावरणात आम्ही पूजन आटोपून ऋण मुक्तेश्वर, केदारेश्वर, काशी- विश्वेश्वर आदी मंदिरांचे दर्शन घेतले. इथे नर्मदा समुद्राला येऊन मिळते व गुजरातच्या खंबाट खाडीत येऊन समर्पित होते. रात्री २.३० च्या दरम्यान आम्ही दाहेजला आमच्या बसमध्ये बसलो. सकाळी ६ वाजता आम्ही नारेश्वर ला येऊन पोहचलो.

आता आमचा प्रवास प्रत्यक्ष वासदेवानंद सरस्वती



म्हणजेच टेंबे स्वामींची समाधी आहे, त्या गरुडेश्वरकडे होता. भारतभर भ्रमण करून टेंबे स्वामींनी शेवटचा चातुर्मास इथे केला होता. त्यानंतर बराच प्रवास केल्यानंतर महेश्वरपासून ४० किमीवर सहस्रधारा व एकमुखी दत्त- मंदिर आहे, ते बघायला आम्ही संध्याकाळी गेलो. शिवरात्रीची सुट्टी असल्याने गर्दी चांगलीच होती, त्यामुळे बसमधून उतरुन आम्हाला पायी जावे लागले. प्रत्येकाला आपले सुख- दुःख विसरायला लावणारी हीच ती नर्मदा आहे का? असे क्षणभर वाटून जाते! आता आमचा प्रवास नर्मदेचे नाभी- स्थान असलेले नेमावर या ठिकाणी होता. दुपारी ४ वाजता इथे पोचल्यावर आम्ही संध्याकाळी नदीवर जाऊन सिद्धेश्वर महादेव मंदिर, नर्मदा मंदिर पाहून आलो. अतिशय पुरातन अशा या मंदिरात ब्रह्मा - विष्णू- महेश यांच्या कोरीव काम केलेल्या वेगवेगळ्या मूर्ती आहेत. ३५० किमीपेक्षा जास्त अंतर पार करून रात्री ८ वाजता आम्ही भेडाघाटला येऊन पोहोचला.

आता आमचा प्रवास परतीच्या दिशेने सुरू झाला होता. अमरकंटकला उत्तर तट ओलांडून आम्ही परत दक्षिण तटावर जाणार होतो. दुसऱ्या दिवशी आमचा मुक्काम महाराजपूर (मंडला) इथे होता. या ठिकाणी सरस्वती - नर्मदा व कावेरी या तीन नद्यांचा संगम आहे. सकाळी आम्ही नदीवर जाऊन अंघोळी करून सूर्याला अर्घ्य अर्पण करून आलो. सकाळी आम्ही नर्मदापुरमकडे प्रस्थान केले म्हणजेच आधीचे हुशंगाबाद. ट्रीपचे आयोजक रोज आम्हाला वेगवेगळा नाश्ता व जेवण देऊन खूष करीत होते. परिक्रमेची संकल्पपूर्ती करण्यासाठी परत ओंकारेश्वरला येऊन पोहोचलो होतो. सकाळी कन्या पूजन, नर्मदेची ओटी व ममलेश्वराला अर्धे जल अर्पण करून आमचा नर्मदा परिक्रमेचा संकल्प पूर्ण केला.

**मीनाक्षी चावजी**/९९६०९९५८९३

### बदलती जीवनशैली, फास्टफूड आणि कॅन्सर

मेडिकल जर्नल ऑफ ऑन्कॉलॉजीने सांगितल्याप्रमाणे गेल्या १० वर्षामध्ये कॅन्सरचे प्रमाण २५ टक्क्यांनी वाढले आहे. यामध्ये ४० टक्के प्रकरणांमध्ये कॅन्सरचा संबंध तंबाखू सेवनाशी असल्याचं अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था म्हणजेच एम्समधल्या सर्जिकल ऑन्कॉलॉजी विभागाचे प्राध्यापक डॉ. एस. व्ही. एस. देव सांगतात. इतर ६० टक्के प्रकरणांमध्ये कॅन्सरची कारणे ही बहुविध आहेत.

जगभरात सर्वांत जास्त कॅन्सर अनुक्रमे फुफ्फुस, कोलन, पोट, यकृत, स्तन, अन्ननलिका असा आहे. जागतिक आरोग्य संघटनेने सांगितल्याप्रमाणे भारत देश कॅन्सरची जागतिक राजधानी होत आहे. भारतीयांची जीवनशैली आणि खानपान कॅन्सर वाढण्यास मदत करत आहेत. हरितक्रांतीनंतर भारतामध्ये रासायनिक खतांचा वापर जास्त वाढला. तणनाशके, कीटकनाशके जास्त वापरल्याने त्याविरोधात प्रतिरोध निर्माण झाला. त्यामुळे दिवसेंदिवस जास्त तीव्रतेचे रसायने शेतीसाठी वापरली जाऊ लागली. सकाळी उठल्यानंतर दात स्वच्छ करायच्या पेस्टपासून ते रात्री झोपेपर्यंत विविध पदार्थांमधून केमिकल्स शरीरामध्ये जात आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये दूध भेसळ प्रकरणे जास्त निदर्शनास आली. दूध जास्त काळ टिकण्यासाठी व घट्ट राहण्यासाठी त्यामध्ये युरिया खत टाकले जात होते. कोरोनानंतर वर्क फ्रॉम होम, बैठे जॉब जास्त वाढल्याने शारीरिक हालचाल कमी झाली आहे. त्यामुळे सुद्धा लठ्ठपणा वाढून कॅन्सर होण्यास अनुकूलता निर्माण होत आहे. कॅन्सर पूर्णतः हद्दपार करणे खूप अवघड आहे परंतु खालील काही उपाय कॅन्सरला दूर ठेवण्यास आपली मदत नक्कीच करू शकतात. रासायनिक खते वापरलेल्या भाज्या खाण्यापेक्षा किचन गार्डन ही पद्धत लोकांनी अमलात आणली पाहिजे. आपल्या घराच्या समोर अंगणामध्ये किंवा छतावर आपल्या परिवाराला जेवढी भाजी लागते तेवढी सेंद्रिय पद्धतीने लागवड केली पाहिजे. आपल्या जवळच्या शेतकऱ्यांना सेंद्रिय भाजीबद्दल सांगितले पाहिजे. तसेच जे शेतकरी सेंद्रिय शेती करतात त्यांच्याकडून खरेदी करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. पॅक फूड खाणे टाळले पाहिजे. दात घासण्यासाठी आयुर्वेदिक पद्धतीने तयार केलेले चूर्ण आपण वापरू शकतो. फ्रीजमध्ये जास्त काळ पदार्थ ठेवणे हे घातक आहे. त्यामुळे फ्रीजचा वापर कमीत कमी करावा. बंद बाटलीतील शीतपेये पिणे टाळू शकतो. गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरू शकतो. त्यामुळे प्रदूषित हवा नाकातोंडात कमी प्रमाणात जाते. शक्यतो कोठेही प्रवासाला जाताना पिण्याच्या पाण्याची बाटली सोबत घेऊन जाणे फायदेशीर राहते. त्यामुळे विकत मिळणारे बंद बाटलीमधील पाणी टाळता येऊ शकते. दररोजच्या जेवणामध्ये मैदा, सोडा, साखर या पदार्थांचा वापर कमी करावा. मैद्याचे पदार्थ जास्त काळ पोटाच्या आतड्यांमध्ये साठून राहतात. त्यामुळे सकाळी लवकर पोट साफ न झाल्याने पोटाच्या तक्रारी वाढतात. साखर तयार करताना त्यावर चमक यावी म्हणून विविध केमिलकचा वापर केला जातो. त्यामुळे दररोज जास्त प्रमाणात साखर खाणे हे आरोग्यास घातक ठरते. चहाबरोबर दररोज बिस्किटे, ब्रेड खाणे टाळावे. चायनीज, पिझ्झा, बर्गर यामध्ये मैद्याचे प्रमाण जास्त असते. असे पदार्थ टाळावेत. वरील विविध पद्धतींचा अवलंब करून आपण कॅन्सरला दूर ठेवू शकतो.

**अभिषेक गवळी**/७२४९७७३६९४

## महत्वाचे...



### पालकमंत्री गोरे यांची सिनाई अ‍ॅग्रो टुरिझम अ‍ॅन्ड रिसॉर्टला सदिच्छा भेट

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त सिनाई अ‍ॅग्रो टुरिझम अ‍ॅन्ड रिसॉर्टला सदिच्छा भेट दिली. यावेळी अंकुश आवताडे यांनी पालकमंत्री गोरे यांचे स्वागत केले. जिल्ह्यातील कृषी पर्यटनाच्या वाढीसाठी आणि विकासासाठी या भेटीत विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. ग्रामीण भागातील पर्यटनाची वाढ, शाश्वत विकास व रोजगार निर्मिती यासाठी मंत्री महोदयांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी आवश्यक ती सर्व मदत शासन स्तरावरून केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. या प्रसंगी भाजप नेते संतोष पाटील, भाजप सोलापूरचे माजी जिल्हाध्यक्ष शंकर वाघमारे, विठ्ठल माळी, ज्ञानेश्वर पाटील, संदीप बापू आवताडे, गणेश दुबे, श्याम आवताडे, महेश कांबळे यांच्यासह तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

### रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीतर्फे गुळवंची येथे मोफत् आरोग्य तपासणी शिबिर

**सोलापूर, दि. ५ एप्रिल -**

रोटरी क्लब, सर्वोपचार रुग्णालय,मेडिकल कॉलेज व कॅन्सर सोसायटीतर्फे गुळवंची (ता.सोलापूर) येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. थायरॉईड, मोतीबिंदू, स्तन कर्करोग, थलेसेमिया मोफत तपासण्या करण्यात आल्या. अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली. रक्तदान शिबिरही झाले. सिव्हिलचे डॉ. मस्के, डॉ. तिरंकर, डॉ. जगती व डॉ. जयश्री किसते यांनी तपासणी केली. डॉ. गवळी, डॉ. प्रतिमा लालीकर, डॉ. प्राजक्ता गिरी, डॉ. कुलकर्णी यांनी सेवा दिली. अध्यक्ष रो. रविराज दरेकर, सचिव रो. अकबर नदाफ, रो. महेश साळुंके, नागेश शेंडगे, बसवराज बिराजदार यांनी परिश्रम केले. यावेळी सरपंच सुनील जाधव. विष्णू भोसले, सुहास भोसले, मुकुंद कदम, सत्यजित देशमुख, अनिल बोराडे, अंकुश शिंदे, अमोल बोराडे, विजया बोराडे उपस्थित होते. प्रस्तावना रो. महेश साळुंके यांनी केली व सूत्रसंचालन सुहास भोसले यांनी व रो. नागेश शेंडगे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. मस्के यांनीही मार्गदर्शन केले.

# सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे : अ‍ॅड.मेश्राम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

जिल्ह्यात अनुसूचित जाती आणि जमातींची लोकसंख्या १५% असून, येथे ट्रॉसिटीच्या गुन्ह्यांचे प्रमाण इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अधिक आहे. २०२३ मध्ये २१९ अ‍ॅट्रॉसिटीचे गुन्हे नोंदवले गेले, तर २०२४ मध्ये हा आकडा वाढून २५८ झाला आहे. या चिंताजनक आकडेवारीमुळे समाजाच्या उन्नतीसाठी गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. आयोगाची भूमिका ही समन्वयकाची असून शासन, प्रशासन व समाज यांनी एकत्रितपणे मागासवर्गीयांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे आवाहन राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष अ‍ॅड. धर्मपाल मेश्राम यांनी केले.

अ‍ॅड. मेश्राम म्हणाले, ही व्यवस्था बदलायला हवी. कधी कधी राजकीय हेतूनेही अ‍ॅट्रॉसिटीचे काही गुन्हे घडतात. आयोगाची भूमिका समन्वयक म्हणून म हत्वाची आहे, कारण शासन, प्रशासन आणि समाज यांनी मिळून चांगली परिस्थिती घडविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आयोग कार्यरत आहे. आपण उपाध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर आदिवासी सम ाजाच्या विकासासाठी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. अनुसूचित जाती जमाती समाजातील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही काम करीत आहोत, असे त्यांनी सांगितले.

स्मशानभूमीच्या समस्येवर लक्ष देताना, काही गावांमध्ये गंभीर अडचणी असल्याचे आढळले आहे. याबाबत जिल्हाधिकारी आणि पोलीस विभागाच्या अहवालांची मागणी करण्यात आली आहे. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांना याबाबत अहवाल तयार करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. तसेच संविधानाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने आयोगाचा उद्देश आहे की, समाज, प्रशासन आणि शासन यांच्या सहकार्याने अ‍ॅट्रॉसिटीचे प्रम ाण कमी करणे आणि मागासवर्गीय घटकांचा सर्वांगीण विकास साधणे. सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती जमातींच्या विकासासाठी आयोगाची ही पहिली पायरी आहे, जी भविष्यातील सकारात्मक बदलांसाठी महत्त्वाची ठरू शकते. आयोगाचे कार्य आणि त्याचे उद्दिष्ट समाजातील सर्व घटकांसाठी एक सकारात्मक वातावरण निर्माण करणे आहे, असेही आयोगाचे उपाध्यक्ष अ‍ॅड. मेश्राम यांनी स्पष्ट केले.

## चैतन्य टेक्नोच्या विद्यार्थ्यांचे टॅलेंट सर्च ऑलिम्पियाड परीक्षेत यश

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

येथील चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये घेतलेल्या ऑलिम्पियाड परीक्षेत प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवले.या परीक्षेत प्रशालेतून इंग्रजी, विज्ञान, गणित तसेच साम ान्य ज्ञान अशा विविध विषयातून विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विद्यार्थ्यांच्या प्रतिभा शक्तीला चालना देण्यासाठी अशा स्पर्धात्म क परीक्षा प्रशालेत नेहमीच घेतल्या जातात. इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये सहभाग घेतला होता. या परीक्षेची प्रथम फ ेरी यशस्वीरित्या पार करीत गणित विज्ञान, इंग्रजी तसेच सामान्य ज्ञान या विषयातून ५९ विद्यार्थ्यांनी दुसऱ्या फेरीत सहभाग घेतला होता. यामध्ये अर्श या विद्यार्थ्याने सायन्स टॅलेंट सर्च ओलंपियाडम ध्ये क्रमांक प्रथम क्रमांक मिळवला आहे तसेच सहावीतील अर्णव येम ुल या विद्यार्थ्याने मॅथ्स टॅलेंट सर्च ओलंपियाड परीक्षेत तृतीय क्रमांक, सातवीतील विनीत कुमावत याने मॅथ्स टॅलेंट सर्च ओलंपियाड परीक्षेत चौथा क्रमांक मिळवला आहे तसेच तिसरीतील रेयांश दुलंगे मॅथ्स टॅलेंट सर्च ओलंपियाड परीक्षेत पाचवा क्रमांक मिळवला आहे आणि इयत्ता पाचवीतील अनया स्वामी इंग्लिश टॅलेंट सर्च ओलंपियाड या परीक्षेत पाचवा क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाली आहे.प्रशालेच्या प्राचार्या डॉ. पी. सौजन्या, शाखा विकास व्यवस्थापक रूपाली चौधरी व संचालक सहाय्यक सर व्यवस्थापक आदिनारायण पडाल यांनी प्रशालेतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## हिंगलाज माता देवीचा प्रकटदिन उत्साहात

### ४०० भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

भावसार क्षत्रिय समाज झोन क्रमांक ६ मध्ये मोठ्या उत्साहात भावसार समाजाची कुलस्वामिनी आपले आराध्य दैवत हिंगलाज म ाता देवीचा प्रकट दिनाचा कार्यक्रम जुळे सोलापूर भागातील द्वारकाधीश श्रीकृष्ण मंदिर, विजापूर रोड येथे सायंकाळी ६ पासून रात्री १० पर्यत संपन्न झाला.



झोन क्रमांक ६ च्या भावसार समाज भक्तगण महिला मंडळांनी हळदीकंकुम अर्चना, ओटी ५१ सुहासीनी महिला मंडळी याना श्रीफळ, खण, पान सुपारी देऊन ओटी भरण्यात आली. ब्राह्मणाने सर्वाना मंत्र पुष्पांजली देऊन अशिरर्वाद देऊन हिंगलाज मातेची अषटभूजा देवीच्या आरत्या म्हणण्यात आल्या. यानंतर देवीला महाप्रसादचा नैवेद्य अर्पण करण्यात आला, व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी ४०० भक्तांनी म हाप्रसादाचे लाभ घेतला. यावेळी मुख्य संयोजक प्रकाश पारेकर, सुधाकर कटारे, रवि खमितकर, नागराज हिरासकर, अनिल हिबारे, गोवीद पुकाळे, महेश हिरासकर, व्यंकटेश वैकुंठे उपस्थित होते. या हिंगलाज मातेच्या प्रगटदिनी देवीने ५१ आदिशक्ती महिला हिंगलाज मातेच्या रूपात सेवा करण्यास तत्पर हजर झाल्या. लता खमि तकर, रेखा पुकाळे,मिनिक्षी पुकाळे, क्षिरसागर, समीता जवळकर, पुष्प राशीनकर, महिंद्रकर आदी म हिलांनी सहकार्य केले.

बासुतकर यानी मोफत हिंगलाज मातेची संदर गाणी सादर केली. तसेच भावसार समाजाचे माजी अध्यक्ष श्री व सौ. डॉ. सुरेश खमितकर यांनी त्यांना साथ दिली.

## हिंगुलांबिका शाळेत बक्षीस वितरण

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

हिंगुलांबिका प्राथमिक शाळेम ध्ये वार्षिक बक्षीस वितरण समारंभ व सुपर सेमी वर्गाचे उद्घाटन सोहळा पार पडला. याप्रसंगी प्रस्तावनेत शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांनी सर्व बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळेमध्ये या शैक्षणिक वर्षात वर्षभरात विविध कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा घेण्यात आले होते. त्या विविध स्पर्धांमध्ये हिंगुलांबिका प्राथमिक शाळेतील जवळपास २०० विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळविले. त्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमांम ध्ये जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकाविलेल्या प्रतीक बासुतकर या विद्यार्थ्याचे सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. जिल्हास्तरीय नाट्य स्पर्धेम ध्ये शाळेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळालेले असल्याने त्या सर्व कलाकारांचे सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलसचिव तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी डॉ. शिवाजी शिंदे, श्रीमती स्मिता गोटे, संजीव जम्मा, माजी विद्यार्थी नागेश कलबुर्गी हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापू ढगे, सचिव विजय पुकाळे, विद्यानिकेतन प्रशालेचे मुख्याध्यापक गोपी नवले, पर्यवेक्षक शंकरगिरी गिरी, सतीश हंचाटे, नितीन मुसळे यांचीही उपस्थिती होती. सूत्रसंचलन बीना बुगले पाहुण्यांचा परिचय माधवी खमितकर यांनी तर आभार साधना लवटे यांनी मानले.



# पुनर्वसित गावांसाठी सर्व मदत केली जाईल



### बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची ग्वाही;

### मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांचीही उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.५ एप्रिल -**

तालुक्यातील चिंचणी या पुनर्वसित गावाने पर्यटनाच्या माध्यमातून चांगली प्रगती केली आहे. महिलांच्या पुढाकाराने गावातील पर्यटन केले. गावासाठी आवश्यक ती मदत करू. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, आम्ही मिळून पुनर्वसित गावांचे प्रश्न सोडवू अशी ग्वाही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली.

चिंचणी ( ता. पंढरपूर ) येथे शनिवारी बांधकाम मंत्री भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री पाटील, आमदार सुभाष देशमुख, सहकार शिरोमणी साखर कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे, सातारा जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे , मोहन अनपट यांच्यासह मान्यावर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बांधकाम मंत्री भोसले यांनी गावात फिरून पर्यटन विषयक कामाची पाहणी केली. तसेच पर्यटन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या गावातील महिलांना प्रमाणपत्र प्रदान केले. यावेळी पुढे बोलताना शिवेंद्रसिंहराजे म्हणाले की, चिंचणी हे सातारा तालुक्यातील गाव असून, चिंचणी गावाने भाऊसाहेब महाराज यांचा पुतळा बसवला, एवढे प्रेम गावाने केले. पुनर्वसित गाव म्हटले की अनेक अडचणी असतात, नवीन ठिकाणी जाऊन बसताना हाल होतात, कधी चांगले अधिकारी मि ळतात, कधी अडचणी वाढवणारे अधिकारी मिळतात, असे चांगले, वाईट अनुभव घेऊन ही गावे उभा राहतात. अशा परिस्थितीत चिंचणी गावाने मोठी प्रगती केली आहे. चिंचणी गावचे नाव महाराष्ट्रमध्ये झाले, देशात नाव व्हावे अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी आमदार सुभाष देशमुख म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील हे पुनर्वसीत गाव आहे. आज सातारा जिल्ह्यात बांधकाम, मदत पुनर्वसन, ग्राम विकास अशी महत्वाची खाती आहेत, त्यांनी या गावास मदत करावी. चिंचणी राज्यात पहिल्या क्रमांकाचे गाव कसे होईल यासाठी प्रयत्न करूयात. ३६५ दिवस येणारी फळे गावात मिळतील अशी फळझाडे लावावीत.

गावातील शेती विकसित केली तर गाव विकसित होईल आणि राज्यात पहिल्या क्रमांकाचे गाव होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहन अनपट यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा.समाधान काळे यांनी केले.

# डब्ल्यूआयटी : विद्यार्थ्यांना घडवणारे प्रेरणास्थान

### वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी मान्यवरांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल -**

कोणत्याही क्षेत्रात यशासाठी कल्पकता, निष्ठा आणि प्रामाणिक प्रयत्न आवश्यक असते. विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक बनवण्याचे काम वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी हे शिक्षणमंदिर निः स्वार्थपणे करत आहे. वार्षिक पारितोषिक समारंभात माजी विद्यार्थ्यांनी संस्थेबाबतचा अभिम ान व्यक्त केला.



डब्ल्यू.आय.टी.च्या ३९व्या वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्याच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये सीजीएसटी वडोदरा-१ चे प्रधान आयुक्त, आयआरएस सुरेंद्रकुमार मानकोसकर आणि बेटरकोड टेक्नॉलॉजीज प्रा. लि., पुणेचे संस्थापक अमोल परितकर यांचा समावेश होता. त्यांनी आपले अनुभव शेअर करताना डब्ल्यू. आय.टी. ही केवळ शिक्षणसंस्था नसून विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणास्थान असल्याचे नमूद केले. समारंभास डब्ल्यू.आय.टी. च्या विश्वस्त मंडळातील भूषण शहा, वैभव गांधी, प्राचार्य डॉ. विजय आठवले, विविध विद्यार्थी प्रतिनिधी, प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते. वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांनी विद्यार्थ्यांमध्ये बसून त्यांना उत्स्फ ूर्तपणे प्रोत्साहन दिले. मानकोसकर यांनी १९८८च्या बॅचचे विद्यार्थी म्हणून अनुभव सांगितले. परितकर यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स संधींबाबत विद्यार्थ्यांमध्ये आशावाद निर्माण केला. सुरुवात प्राचार्य डॉ. विजय आठवले यांच्या संस्थेच्या प्रगती आढाव्याने झाली. पाहुण्यांचा परिचय विद्यार्थिनी प्रियांका गंभिरे आणि रितेश पाटील यांनी करून दिला. पारितोषिक विजेत्यांची नावे प्रा. आर.पी. नगरकर, प्रा. मीनाक्षी श्रीगांधी आणि प्रा. एस.पी. स्वामी यांनी जाहीर केले. डॉ. आर. के. दीक्षित व डॉ. एम.ए. निरगुडे यांनी पुरस्काराचे वाचन केले. सूत्रसंचालन डॉ. विपुल कोंडेकर, साक्षी जाधव आणि पियुष गव्हाणे यांनी, तर आभार प्रदर्शन दर्शना मोरडे हिने केले.

#### या समारंभात उत्कृष्ट 'आऊटगोइंग स्टुडंट' व विशेष सन्मानीत विद्यार्थी

सर्वोत्तम वर्ग पुरस्कार - तृतीय वर्ष संगणक विज्ञान व अभियांत्रिकी, उत्तेजनार्थ पुरस्कार - द्वितीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स विभाग

व्यक्तिगत गुणवत्तेचे पुरस्कार - केतकी बिडकर (संगणक अभियांत्रिकी), राहुल चिलवेरी (ईलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन), सात्विक तोतड (ईलेक्ट्रॉनिक्स व संगणक अभियांत्रिकी), गौरी फटाटे (माहिती तंत्रज्ञान), नेहा देशमुख (मेकॅनिकल व ऑटोमेशन), मो. दानिश अनिसलाम खैरदी (स्थापत्य अभियांत्रिकी), बेस्ट स्पोर्ट्स मॅन अवॉर्ड श्रीकांत कोन्हारे व सिध्दी उपासे यांना प्राप्त झाला.


## Classifieds

### पाहिजेत

जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात सकाळी काम करण्यासाठी २५ ते ३० वयोगटातील मुलगा पाहिजे.
संपर्क: ९४२३५९००३६/ ९४२०८८५६०७

### घर भाड्याने देणे आहे

सुसज्ज आणि प्रशस्त 2 BHK 2 फ्लॅट शाकाहारी कुटुंबास भाड्याने देणे आहे. आयएमएस पासून जवळ श्री राम चौक, कासार सोसायटी, जुळे सोलापूर. २४ तास पाणी, शांत आणि सुसज्ज परिसर, सीसीटीव्ही आणि पार्किंगची सोय.
- संपर्क नंबर -
9860139889 / 9822162454

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



पुढील नेमलेली तारीख ०७/०५/२०२५
दि.कि.अ.नं. ४८/२०२५
नि.६

### जाहीरनामा

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर, यांचे न्यायालयात**
**(जी.एस. पाटील सो)**

१) **महमद सादिक सिकंदर हन्नुरे,** वय ४३ वर्षे, धंदा खा. नोकरी, रा. बार्शी, ता.बार्शी जि. सोलापूर, ह.पु. बी-४०४, सुयोग लेहर, तालाब चौक, कॉडवा (बु), पुणे शहर, ता.जि. पुणे.
२) **झीनत निझामोद्दीन इनामदार,** वय ४२ वर्षे, धंदा नोकरी, रा. इनामदार गल्ली, नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव.
३) **निकहत परदीन सिकंदर हन्नुरे,** वय ४० वर्षे, धंदा नौकरी, रा.घर नं.५, सिरत कॉलनी, परंडा रोड, इदगाह, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर. — **अर्जदार**

**विरुध्द**
**निरंक**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ हे सख्खे भाऊ-बहिण आहेत. अर्जदार नं. १ ते ३ यांची आई नामे-शहेनाज सिकंदर हन्नुरे, ह्या दि.०५/०३/२०१४ रोजी पुणे येथे मयत झाल्या असून, त्यांचे पश्चात अर्जदार नं. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांनी हेअरशिप/वारस प्रमाणपत्र या मे. न्यायालयाकडे मागणी केली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क, हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमलेली तारीख ७/५/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार अ‍ॅडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रगटन आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे.
तारीख ५/४/२०२५

सही/- क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी



पुढील नेमलेली ता. ९/०५/२०२५
दि. कि. अर्ज नं. २५/२०२५

### जाहीर प्रसिध्दीकरण

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन सा़ो. यांचे कोर्टात**

१) **श्रीमती सविता सुभाष सातपुते,** वय- ३० वर्षे, धंदा-घरकाम, रा. इंदिरा नगर, वैराग, ता. बार्शी जि. सोलापूर
२) **वनमाला अभिमान सातपुते,** वय- ४६ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर
३) **कु. साक्षी सुभाष सातपुते,** वय- १३ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. सदर अपाक जनक आई अर्जदार नं. १
४) **कु. मोनाली सुभाष सातपुते,** वय- ११ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. सदर अपाक जनक आई अर्जदार नं. १ — **अर्जदार**

**विरुध्द**
**कोणी नाही** - **सा.वाला**

ज्या अर्थी, सदर प्रकरणातील अर्जदार नं. १ चे पति व अर्जदार नं. २ यांचा मुलगा व अर्जदार नं. ३ व ४ यांचे वडिल सुभाष अभिमान सातपुते हे दि.२४/०४/२०२४ रोजी मौजे वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे हृदयविकाराने मयत झालेले असून अर्जदार नं. १ चे पती हे वैराग नगरपंचायत येथे क्लार्क म्हणून नोकरीस होते, त्यांच्या पश्चात त्यांच्या विधवांना राज्य शासनाची पेन्शन मंजुर करणेबाबत तसेच मयत सुभाष अभिमान सातपुते हे वैराग नगरपंचायत येथे शासकीय नोकरीस असल्याने त्यांचे जागी अनुकंपा तत्वाद्वारे त्यांचे वारसांना नोकरीत सामावून घेणेबाबत करण्याबाबत तरतुद आहे, त्याबाबत अर्जदार नं. १ यांनी वैराग नगरपंचायत येथे विचारणा केली असता तेथील अधिकारी यांनी वारस दाखला मागणी केलेला आहे तरी अर्जदारांना नमुद कारणाअन्वये वारस प्रमाणपत्र दाखला अर्जदार नं. १ ते ४ यांचे नावचा मिळणेकामी अर्जदाराने हल्लीचा अर्ज केलेला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दी करणाने कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधाना संबंधाने जर कोणाचेही आक्षेप असतील तसेच मयत सुभाष अभिमान सातपुते यांना अर्जदार नं. १ ते ४ यांचेशिवाय अन्य कोणी वारस असतील अगर तशी कोणाची खात्री असेल, तर संबंधीतांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेल्या ता. ९/५/२०२५ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विधीज्ञामार्फत हजर होवून आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे प्रसिध्दीकरण आमचे सही निशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे. ता. २८/०३/२०२५

सही/- कनिष्ठ लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश क. स्तर बार्शी



पुढील नेमली तारीख ८/०५/२०२५
दि.कि.अ.नं. ४६/२०२५
नि.५

### जाहीर प्रसिध्दीकरण

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात**

१) **कु. सिध्दी संदीप जाधव-पाटील,** उ.वय-१४, धंदा-शिक्षण, रा. कुंभारगांव, ता. करमाळा, जि. सोलापूर
२) **चि. विनायक संदीप जाधव-पाटील,** उ.व.-१३, धंदा-शिक्षण, रा. कुंभारगांव, ता. करमाळा जि. सोलापूर
अर्जदार नं. १ व २ चे अ.पा.क
**जनक वडील संदीप विजयसिंह जाधव-पाटील**
उ.वय-४२, धंदा-नोकरी व शेती, रा. कुंभारगांव, ता. करमाळा, जि. सोलापूर. — **अर्जदार**

**विरुध्द**
**महाराष्ट्र सरकार** - **सामनेवाले**

ज्याअर्थी डि.सोलापूर सब डि.व ता. करमाळा यापैकी मौजे कुंभारगांव येथील शेतजमीन (१अ) ग.नं. ८५/१ पैकी हे ०-७९ आर, आकार रु. ०-९० पैसे चतुः सिमा **पुर्वेस -** गट नं. ८९, **दक्षिणेस -** श्वेता संदीप जाधव-पाटील यांची जमीन, **पश्चिमेस -** अर्चना सतीश जाधव-पाटील यांची जमिन व **उत्तरेस -** संदीप विजयसिंह जाधव-पाटील यांची जमिन यांची जमिन, (१ब ग.नं. ८५/१ पैकी हे २-०० आर, आकार रु. २-४० पैसे चतुःसिमा **पुर्वेस** गट नं. ८९, **दक्षिणेस -** चंद्रकला जाधव पाटील यांची जमीन, **पश्चिमेस -** सतीश विजयसिंह जाधव पाटील यांची जमिन व **उत्तरेस-**श्वेता संदीप जाधव पाटील यांची जमिन येणेप्रमाणे बागायत शेतजमीन आतील तदंगभूत वस्तुसह,

वर नमूद केलेली मिळकत अज्ञान अर्जदार नं. १, २ यांचे मालकी कबजे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत असून सदर मिळकत अज्ञान अर्जदाराचे अ.पा.क. वडिलांनी अज्ञान अर्जदाराचे भविष्यातील शिक्षण व गरजा याचा विचार करुन सदर मिळकत विबा सोलर ईरा रिनेव्हेबल एल.एल.पी. या कंपनीस रजिष्टर भाडेकरारावर देणेचे ठरवले असलेने सदर भाडेकरार अज्ञानाचे हिताचा आहे. तथापी, सदर मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने सदर भाडेकरारास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, सदरची कृती योग्य व गरजेची असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करून अज्ञान अर्जदाराचे वतीने तिचे पालनकर्ते वडिल म्हणजेच संदीप विजयसिंह जाधव-पाटील या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकल भाडेतत्वावर देण्याची परवानगी मागणेचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी संबंधाने कोणाचे कांही हरकती असल्यास वा अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख ८/५/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. कोर्टाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीख : ५/०४/२०२५

कोर्टाचा शिक्का | सही/- अधिक्षक, अपर जिल्हा न्यायालय, बार्शी

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...





**चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया**

**भाग – ७**

## उन्हाळ्यातील रनिंग

उन्हाळ्यात धावणे आव्हानात्मक ठरू शकते. उष्णतेमुळे शरीरातील पाण्याची कमतरता, त्वचेवर घामोळ्या, उष्णताजन्य थकवा आणि उष्णाघाताचा धोका वाढतो. त्यामुळे रनर्सनी काही आवश्यक खबरदारी घ्यावी.

### १) डिहायड्रेशन आणि उष्णाघात:

● लक्षणे: तहान, कोरडा तोंड, चक्कर, अशक्तपणा

● उपाय: नियमित पाणी प्या, इलेक्ट्रोलाइट पाणी किंवा लिंबू-पाणी घ्या. सकाळी लवकर किंवा संध्याकाळी धावा.

### २) उष्णतेमुळे स्नायू आकडणे:

● लक्षणे: स्नायूंमध्ये वेदना, आकडणे

● उपाय: पोटॅशियमयुक्त पदार्थ (केळी, नारळपाणी) घ्या, स्ट्रेचिंग करा.

### ३) त्वचेवर चट्टे आणि घामोळ्या:

● लक्षणे: लालसर खाज, जळजळ

● उपाय: हलकी, सैलसर कपडे वापरा. घाम आल्यावर पुसा. अँटी-चार्फिंग क्रीम लावा.

### ४) उष्णतेमुळे कमी एनर्जी आणि थकवा:

● लक्षणे: रनिंग दरम्यान वेग कमी होणे, लवकर दम लागणे

● उपाय: रसाळ फळे (कलिंगड, संत्री), ताक, दही, नारळपाणी आहारात घ्या.

### ५) सनबर्न आणि त्वचेच्या समस्या:

● लक्षणे: त्वचा लालसर होणे, वेदना

● उपाय: ३०+ सनस्क्रीन लावा, टोपी आणि सनग्लासेस घाला.

### ६) रक्तदाब आणि हृदयावर परिणाम:

● लक्षणे: हृदयाचे ठोके वाढणे, रक्तदाब कमी होणे

● उपाय: पाणी, इलेक्ट्रोलाइट ड्रिंक्स प्या, गरम हवामानात सराव कमी करा.

### ७) मानसिक थकवा:

● लक्षणे: रनिंगसाठी कमी इच्छाशक्ती

● उपाय: सकाळी थंड हवामानात धावा, योग्य पोषण घ्या, विश्रांती घ्या.

### ८) योग्य वेषभूषा आणि उपकरणे:

हलकी, हवादार कपडे घाला.

टोपी आणि सनग्लासेस वापरा.

उन्हाळ्यात पाय सुजतात, त्यामुळे अर्धा नंबर मोठे शूज घ्या.

### निष्कर्ष

योग्य हायड्रेशन, आहार आणि विश्रांती घेतल्यास उन्हाळ्यातही रनिंग आनंददायक होते!

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो.९१७५८२८२०३




# दिल्ली कॅपिटल्सची हॅट्ट्रिक

### चेन्नई सुपर किंग्जवर २५ धावांनी मात

### सामनावीर के. एल. राहुलची ७७ धावांची आकर्षक खेळी

◆ **चेन्नई, ५ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शनिवारी येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्सने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात उत्कृष्ट प्रदर्शन करत ऋतुराज गायकवाडच्या चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या साखळी सामन्यात २५ धावांनी शानदार विजय नोंदविला. याबरोबरच दिल्ली कॅपिटल्सने विजयाची हॅट्ट्रिक साजरी केली व तीनपैकी तीनही सामने जिंकत सर्वाधिक ६ गुण मिळवत आयपीएलच्या गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले. चेन्नईचा चार सामन्यातील हा तिसरा पराभव ठरला, ते २ गुणांसह आठव्या स्थानावर राहिले. सलामीवीर के. एल. राहुलने संघाच्या विजयात ७७ धावांची शानदार अर्धशतकी खेळी केली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सने ६ बाद १८३ धावा केल्या. विजयासाठी १८४ धावांचा पाठलाग करताना सीएसकेला मर्यादित २० षटकांत ५ बाद १५८ धावांपर्यंतच मजल मारता आली.

डावाच्या सुरुवातीलाच दिल्लीचा सलामीवीर जॅक फ्रेझर-मॅकगर्क भोपळा न फोडताच तंबूत परतला, मात्र त्यानंतर के. एल. राहुलने लौकीकास साजेशी खेळी केली. राहुलने अभिषेक पोरेल (३३), कर्णधार अक्षर पटेल (२१) व समीर रिझवी (२०) यांच्यासोबत छोट्या-छोट्या भागीदारी करत संघाच्या धावसंख्येला आकार दिला. यादरम्यान राहुलने आपले अर्धशतकही साजरे केले. मथिशा पथिराणाने राहुलची घोडदौड थांबविली, तोपर्यंत दिल्ली कॅपिटल्सने १९.२ षटकांत ५ बाद १७९ धावांचा टप्पा गाठला. के. एल. राहुलने ५१ षटकांत ६ चौकार व ३ षट्कारांसह ७७ धावांची खेळी केली. पुढे ट्रिस्टन स्टब्सने नाबाद २४ धावांची खेळी करत दिल्ली कॅपिटल्सला ६ बाद १८३ धावांचा टप्पा गाठून दिला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना सीएसकेची दाणादाण उडाली. दिल्लीच्या गोलंदाजांनी विजय शंकर वगळता सीएसकेच्या महत्त्वपूर्ण पाच फलंदाजांना १०.४ षटकांत ७४ धावांत बाद केले. सलामीवीर रचिन रवींद्र (३), डेव्हॉन कॉनवे (१३), कर्णधार ऋतुराज गायकवाड (५), शिवम दुबे (१८) व रवींद्र जडेजा (२) हे भरवशाचे खेळाडू नियमित अंतराने तंबूत परतले. विजय शंकर व महेंद्र सिंह धोनीने उर्वरित चेंडूंमध्ये संघाला विजय मिळवून देण्यासाठी कसोशीने प्रयत्न केला, परंतु त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. सीएसकेला मर्यादित षटकांत ५ बाद १५८ धावांपर्यंतच मजल मारता आली. विजय शंकरने ५४ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारासह नाबाद ६९ धावांची, तर धोनीने २६ चेंडूंत प्रत्येकी एक चौकार व षट्कारसह नाबाद ३० धावांची खेळी केली. ◂(वृत्तसंस्था)

# सिफ्ट कौर समराचा सुवर्णभेद

### अर्जेंटिना नेमबाजी विश्वचषक

### भारताला मिळाले पहिले सुवर्ण

◆ **नवी दिल्ली, ५ एप्रिल**

भारतीय नेमबाज सिफ्ट कौर समराने पिछाडीवर राहिल्यानंतर अचूक नेमबाजी करत जोरदार मुसंडी मारून महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स (३पी) अंतिम फेरीत आपले वैयक्तिक आयएसएसएफ विश्वचषक सुवर्णपदक जिंकले.



फरीदकोटच्या २३ वर्षीय सिफ्ट कौरने टिरो फेडरल अर्जेंटिनो डी ब्यूनस आयर्स शूटिंग रेंजमध्ये हंगामाच्या पहिल्या चरणाच्या विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत भारताला पहिले सुवर्णपदक मिळवून दिले.

पहिल्या नीलिंग पोझिशनमध्ये १५ शॉट्स मारल्यानंतर सिफ्ट कौर जागतिक विक्रमवीर जर्मनीच्या अनिता मँगोल्डपेक्षा ७.२ गुणांनी मागे होती. तथापि, तिने दुसऱ्या प्रोन व शेवटच्या स्टॅण्डिंग पोझिशन्समध्ये जिंकण्यासाठी स्वप्नवत पुनरागमन केले.

४५ शॉट अंतिम फेरीच्या अखेर सिफ्ट कौरने ४५८.६ गुणांसह सांगता केली, तर मँगोल्डने ४५५.३ गुणांसह ३.३ गुणांनी मागे राहिली.

कनिष्ठ गट विश्व पदक विजेती कझाकस्तानची अरिना अल्तुखोव्हा तिसऱ्या स्थानावर राहिली. तिने ४४ व्या शॉटनंतर ४४५.९ गुणांसह माघार घेतली.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी पहिल्या अंतिम फेरीत पदक गमावल्यानंतर, भारताने आता स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी सुवर्ण आणि कांस्यपदकांसह दुसऱ्या स्थानावर राहून स्पर्धेचा शेवट केला आहे. पुरुषांच्या ३ पी मध्ये चेन सिंगने जिंकले होते. ◂(वृत्तसंस्था)

# लखनौच्या कर्णधाराला १२ लाखांचा, दिग्वेशला अर्धे सामना शुल्काचा दंड

◆ **लखनौ, ५ एप्रिल**

शनिवारी आयपीएल सामन्यात मुंबई इंडियन्सविरुद्धच्या १२ धावांनी विजय मिळवताना लखनौ सुपर जायण्ट्सचा कर्णधार ऋषभ पंतला संथ गतीने षटके टाकल्याबद्दल १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

गोलंदाजी संघाला २० षटके पूर्ण करण्यासाठी निर्धारित वेळ ९० मिनिटे आहे व पंतच्या लखनौ संघाला १९ व्या षटकानंतर थोडा आणखी वेळ लागत होता, त्यामुळे त्यांना ३० यार्ड वर्तुळाबाहेर एक क्षेत्ररक्षक कमी ठेवावा लागला.

संथ गतीने षटके टाकणे म्हणजे आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.२२ चे उल्लंघन आहे. लखनौ संघाचा हा हंगामातील हा पहिलाच गुन्हा असल्यमुळे ऋषभ पंतला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला, असे बीसीसीआयने म्हटले आहे.

दरम्यान, आयपीएलच्या लेव्हल-१ आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल लखनौचा हुकमी खेळाडू दिग्वेश राठीला आता सलग दुसऱ्यांदा त्याच्या सामना शुल्काच्या ५० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. पंजाब किंग्जविरुद्ध सर्वाधिक बळी टिपण्याचा आनंद साजरा केल्याबद्दल राठीलाहा सामना शुल्काच्या अर्ध्या रकमेचा दंड ठोठावण्यात आला. ◂(वृत्तसंस्था)

# नेहरूनगर शासकीय मैदानावर पालिकेतील विविध विभागाच्या क्रिकेट स्पर्धेस सुरुवात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

नेहरूनगर शासकीय मैदानावर पालिकेतील विविध विभागाच्या हौसी क्रिकेट स्पर्धेस सुरुवात झाली. याचे उद्घाटन पालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या हस्ते झाले.

सोलापूर महानगरपालिका कर्मचारी सर्वट सोशल फाउंडेशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व आरोग्य निरीक्षक संघटना यांच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या दोन दिवशी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाले. यावेळी उपस्थित सर्व खेळाडूंच्या वतीने रवी पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या क्रीडा स्पर्धेत पालिकेतील एक ते आठ विभागीय कार्यालय, नगर अभियंता विभाग, सामान्य प्रशासन विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग,पाणीपुरवठा विभाग, विद्युत विभाग, टॅक्स विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, यासह अनेक विभागातील बाराहून अधिक संघाने भाग घेतला आहे. यावेळी पालिकेचे उपायुक्त शशिकांत भोसले, मुख्य आरोग्य निरीक्षक सुधाकर नागटिळक, बाबासाहेब इंगळे, महाराष्ट्र राज्य आरोग्य निरीक्षक संघटना सोलापूर महापालिका सर्वाट सोशल फाउंडेशन, हौसी क्रिकेट स्पर्धाचे संस्थापक अध्यक्ष शेषराव शिरसट, क्रीडा समितीचे अध्यक्ष बाळासाहेब गोतसुर्वे, क्रीडा समिती सदस्य जनार्दन मोरे, सुनील भालेराव यांच्यासह महानगरपालिकेतील अधिकारी, क्रीडा समितीच्या सर्व सदस्य खेळाडू उपस्थित होते.

# आप्पा गणपती संघाचे दोन विजय

### मार्कंडेय प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा

**सोलापूर, दि.५ एप्रिल-**

मार्कंडेय प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आप्पा गणपती संघाने सलग दोन विजय नोंदविले. अन्य सामन्यात सत्यविजय स्टायकर्स व जेएमडी संघाने प्रतिस्पर्धी संघावर विजय मिळविले.

येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर सुरु असलेल्या या स्पर्धेत आप्पा गणपती संघाने फायटर संघास ७ गडी राखून हरविले. दुसऱ्या सामन्यात सत्यविजय स्टायकर्सने पूर्वा संघास नमविले. तिसऱ्या सामन्यात आप्पा गणपती संघाने श्री गणेश वल्लाकाठी संघावर ६ गडी राखून विजय मिळविला. चौथ्या सामन्यात जेएमडी संघाने सत्यविजय संघावर १४ धावांनी मात केली. स्वप्नील पुंजाल, नवीन



चिंता, निखिल दोरनाल व राजेश येमुल यांना सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले

**संक्षिप्त धावफलक**

**फायटर संघ :** ८ षटकात ६१ (चरण दिकोंडा ३३, श्रीकांत कुरापती १४/२) पराभूत विरुद्ध आप्पा गणपती : ७.३ षटकात ६२.

**पूर्वा संघ :** ८ षटकात ७६ ( सागर गडम ३५) पराभूत विरुद्ध सत्यविजय स्टायकर्स : ७.३ षटकात ७७(नवीन चिंता ३२ ).

**श्री गणेश संघ :** ८ षटकात ६१. पराभूत विरुद्ध आप्पा गणपती संघ : ६. ३ षटकात ६२ धावा केला

**जेएमडी संघ :** ८ षटकात १०७ धावा (राजेश येमुल ४३) विजयी विरुद्ध सत्यविजय संघ : ८ षटकात ९३ धावा (चेतन नराल ३३).

# विहान क्रिकेट ॲकॅडमीतर्फे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर १० एप्रिलपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

विहान क्रिकेट ॲकॅडमीच्या माध्यमातून इंदिरा गांधी पार्क स्टेडीयम पार्क चौक येथे क्रिकेट कोचिंग क्लासेस १० एप्रिल ते १० जून पर्यंत सकाळी ७ ते ९ आणि सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत सुरू करण्यात येत आहेत. क्रिकेट प्रशिक्षण ६ वर्षावरील मुलांसाठी व मुलींसाठी उपलब्ध आहे. सर्व खेळाडूंना योगेश कोंपल कोचिंग करतील. दोन वर्ष महाराष्ट्र राज्य रणजी ट्रॉफी कॅम्प व आठ वर्ष सोलापूर जिल्हा वरीष्ठ संघाकडून सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व श्री. कोंपल यांनी केलेले असून त्यांना प्रशिक्षणाचा १५ वर्षांचा अनुभव आहे. नोंदणीसाठी ९४२२६४९२७१ अथवा ९५११८३३९८७ या नंबरवर संपर्क साधावा.

# स्मॅशर्स थंडर व हैद्राबाद कर्नाटका क्रिकेट क्लबचे शानदार विजय

### रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्यूटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रेसिजन क्रिकेट स्पर्धेत शनिवारी स्मॅशर्स थंडर व हैद्राबाद कर्नाटका क्रिकेट क्लबने शानदार विजय मिळविले.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत स्मॅशर्स थंडरने युनायटेड क्रिकेट क्लबवर २ गडी राखून मात केली. इरफान पटेल सामनावीर ठरला. दुसऱ्या सामन्यात हैद्राबाद कर्नाटका क्रिकेट क्लबने (एचकेसीसी संघ) नॅशनल क्रिकेट अकॅडमी (अ) संघावर १० गडी राखून दणदणीत विजय मिळविला. मोहम्मद कादीर सामन्याचा मानकरी ठरला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत.

हा पुरस्कार इरफान पटेल यास इन्स्टिटयूट कमिटी मेंबर मनोज वाल्मिकी यांच्या हस्ते देण्यात आला. दुसऱ्या सामन्याचा सामनावीर पुरस्कार मोहम्मद कादिर यास अली मुल्ला यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी राजापटेल, लियाकत शेख, अंबादास तोरा, अतुल बांदीवाडीकर, अमजत पठाण व सचिन गायकवाड उपस्थित होते.





**सोलापूर : सामनावीर पुरस्कार इरफान पटेल यास इन्स्टिटयूट कमिटी मेंबर मनोज वाल्मिकी यांच्या हस्ते देण्यात आला. दुसऱ्या सामन्याचा सामनावीर पुरस्कार मोहम्मद कादिर यास अली मुल्ला यांच्या हस्ते देण्यात आला.**

पंच म्हणून मजहर मंगोली व किरण डीग्गे आणि सचिन गायकवाड व नवीन माने यांनी तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले.

**आजचे सामने**

**१) साऊथ सोलापूर ओल्ड विरुद्ध एमएससीबी**

**२) अभिसिद्ध (ब) विरुद्ध रेल्वे (ब)**

**संक्षिप्त धावफलक:** युनायटेड **क्रिकेट क्लब :** १८.१ षटकात सर्व बाद ११० ( निलेश बडूरवाले २७, शिव वाले २२, विवेक चव्हाण १३, इरफान पटेल, अर्सलान शेख, समर्थ बिराजदार प्रत्येकी २ बळी) पराभूत विरुद्ध स्मॅशर्स थंडर: १६.४ षटकात सर्व बाद १६० (इरफान पटेल २५, विशाल भोसले १९, अनिकेत माने १७, केशव देवकर ३ बळी, वरडसाई दुध्याळ व निलेश बडूरवाले प्रत्येकी २ बळी)

**नॅशनल क्रिकेट अकॅडमी (अ) :** १४.३ षटकात सर्व बाद ४१ (सैफन नदाफ १७, मोहम्मद कादिर व संतोष हट्टी ३ बळी, राहुल राठोड आणि रंगनाथ कुलकर्णी प्रत्येकी १ बळी) पराभूत विरुद्ध एच के सी सी : ४.२ षटकात बिन बाद ४२ ( सी. मारुती नाबाद १९, सन्मय रुद्रवाडी नाबाद १६).

# चेक अँड मेट चषक जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धा १० एप्रिलला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

ॲड. कोमल अजय साळुंखे-ढोबळे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री.बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री गिरिजाबाई ढोबळे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने गुरुवार १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता मातोश्री गिरीजाबाई ढोबळे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय जुळे सोलापूर येथे खुल्या तसेच ९ व ७ वर्षाखालील मुले व मुलींच्या जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले आहे.

ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या स्विस लीग नियमानुसार खेळाडूंच्या संख्येनुसार ५ ते ८ फेऱ्यात संपन्न होणार असुन खेळाडूंना प्रत्येकी १५ मिनिटे व प्रत्येक चालीला ५ सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. खुल्या गटातील प्रथम क्रमांकासाठी रु. २१००, रु, १५००, रु. १०००, रु. ८००, रु. ६००, रु. ५००, रु. ४००, रु. ३००, रु. २०० अशी पंधरा तसेच तसेच खुल्या गटात १६, १३, ११ व सर्वोत्तम मुली या विविध गटात प्रत्येकी दहा आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आलेले असून एकूण रोख पारितोषिकांसह १०० बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

७ व ९ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटातील प्रथम येणाऱ्या दोन खेळाडूंची निवड राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना प्रत्येकी रु. १००० राज्य स्पर्धा खेळून आल्यानंतर देण्यात येणार असून स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना एकूण रु. ४५००० पर्यंतची रोख बक्षिसे, आकर्षक 'चेक अँड मेट चषक' व मेडल्स देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे आधारस्तंभ डॉ. लक्ष्मणराव ढोबळे व प्राचार्य डॉ. वासंती पांढरे यांनी दिली. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे मो.क्र. ८८८८०४५३४४ अथवा प्रशांत पिसे मो.क्र. ९१५६८१५९६३ यांच्याकडे संपर्क साधावा, असे सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर व सचिव सुमुख गायकवाड यांनी कळविले आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

## महत्त्वाचे...

### रामनवमीनिमित्त पोलीस यंत्रणा सतर्क; ड्रोनद्वारे टेहळणीसह तगडा बंदोबस्त तैनात

**बार्शी, दि. ५ एप्रिल-**

आज रविवार दि. ६ एप्रिल रोजी रामनवमी उत्सव साजरा होत असून, त्याची तयारी सर्वत्र उत्साहात व जोमाने सुरु आहे. श्रीराम नवमी उत्सव समिती, बार्शी यांचेकडून सालाबादप्रमाणे श्रीराम नवमीनिमित्त शोभायात्रेचे आयोजन केले असल्याची माहिती विश्व हिंदू परिषदेचे प्रखंड मंत्री बापूसाहेब कदम यांनी दिली. शहरातील प्रमुख मार्गावरुन निघणाऱ्या या शोभायात्रेतील नऊ फूट उंचीची श्रीरामाची मूर्ती आणि सात फूट उंचीची श्री हनुमानाची मूर्ती हे प्रमुख आकर्षण असणार आहे. सर्वांनी मोठ्या संख्येने शोभायात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनही सतर्क झाले असून, सात अधिकारी, राज्य राखीव दलाच्या तुकडीसह शंभर पोलीस अंमलदार तसेच दंगा काबू पथक असा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून ड्रोन कॅमेऱ्याद्वारे सर्वत्र लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती बार्शी शहर पोलीस निरिक्षक बालाजी कुकडे यांनी दिली. रामनवमीनिमित्त आयोजित शोभायात्रा उत्साहामध्ये पार पाडण्यासाठी तसेच धार्मिक व जातीय सलोखा राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

### दत्तात्रय जाधवर हल्ला प्रकरणात मुख्याध्यापकांची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. ५ एप्रिल-**

दि. ४ एप्रिल रोजी मौजे कुसळंब येथे नागेश विठोबा जाधवर, रा. धोत्रे यांचेवर झालेल्या हल्लाप्रकरणी अॅड. प्रशांत शेटे यांचा युक्तीवाद ग्राह्य मानून मुख्याध्यापक नागेश कृष्णा जाधवर यांची निर्दोष मुक्तता करण्याचा निकाल फौजदारी न्यायालयाच्या न्यायदंडाधिकारी पी. व्ही. राऊत यांनी दिला आहे. या प्रकरणाची सविस्तर हकीकत अशी की, दत्तात्रय विठोबा जाधवर, (रा. मौजे धोत्रे) यांनी दि. २७ जुलै २०१० रोजी पांगरी पोलीस ठाण्यात अशी फिर्याद दिली होती की, ते मारुती ८०० गाडी नं. एम.एच. ०२ जे ६९५५ मधून सकाळी १० चे सुमारास त्यांचे शिक्षण स्पर्धेचा निकाल पाहणेसाठी बार्शीला गेले व तेथे त्यांचे वडील विठोबा महादेव जाधवर यांनी फोन करुन कळविले की, संजयचा मुलगा सुदर्शन आजारी असून त्यास दवाखान्यात घेवून जायचे आहे तु गाडी घेवून ये, त्यामुळे ते मनोजकुमार क्षीरसागर, (रा. जयशंकर चाळ, बार्शी व दिपक जीवा बोकेफोडे यांना गाडीत घेवून कुसळंब मार्गे धोत्रे गावी निघाले असातना गाडी भीमनगर, कुसळंब येथे स्पीड ब्रेकर जवळ आली असता धोत्रे गावचे नागेश जाधवर याने त्याची मोटारसायकल गाडीसमोर आडवी लावून, तु माझे भावाला का कट मारुन आलास असे म्हणून शिवीगाळ करुन त्याने त्याचे हातातील दगड डावे डोळ्याखाली मारला तेवढ्यात सुनिल जाधवर हा त्याचे मोटारसायकलवरुन तेथे आला, त्याने लाकडाने त्याचे उजव्या पंजावर मारले. सदर घटना सायं. ६.३० वा.ची होती. या प्रमाणे तक्रार दिल्यानंतर पांगरी पोलिसांनी संशयित आरोपी नागेश व सुनिल जाधवर यांचेवर भा.दं. वि. कलम ३२४, ३४१, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गु.र.नं. ८८/२०१० असा दाखल केला होता. सदर प्रकरणी फिर्यादीचे अंगठ्याचे हाड तुटले असल्याने सरकार पक्षाचे विनंतीवरुन कलम ३२६ वाढविणेत आले. दोषारोप निश्चितीनंतर अंतिम सुनावणीत सरकारतर्फे फिर्यादी दत्तात्रय, समाधान उकिरडे, मनोज क्षीरसागर, तपास अधिकारी शहाजी मुळे, डॉ. श्रीकांत वैद्य, पोलीस उपनिरीक्षक कमलाकर मुंडे यांच्या महत्वपुर्ण साक्षी नोंदविण्यात आल्या. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकुन संशयित आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्याचा निकाल न्यायाधिशांनी दिला. या प्रकरणी आरोपी तर्फे अॅड. प्रशांत शेटे, अॅड. संकेत लकशेट्टी, अॅड. रोहन स्वामी यांनी काम पाहिले.



### चपळगांव महालक्ष्मी प्रतिष्ठानच्या वतीने प्रथमेश इंगळेचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ५ एप्रिल-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांचे सुपुत्र प्रथमेश इंगळे यांचा चपळगाव महालक्ष्मी प्रतिष्ठानच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना प्रथमेश इंगळे यांनी चपळगाव येथील युवकांनी महालक्ष्मी प्रतिष्ठानतर्फे समाजाभिमुख उपक्रमाचे कौतुक केले.वाढदिवसानिमीत्त चपळगांवसियांनी व्यक्त केलेल्या प्रेमपूर्वक शुभेच्छांचा स्वीकार करून सर्वांचे आपल्यावरील प्रेम असेच कायम राहावे अशी सदिच्छा व्यक्त केली. यावेळी प्रतिष्ठानचे दिनेश म्हमाणे, मनोज इंगुले, स्वप्निल दुलंगे, स्वप्निल बणजगोळे, रत्न कोरे, धर्मेंद्र दुलंगे, लक्ष्मीकांत म्हमाणे, आकाश दुलंगे, गणेश दुलंगे, रमेश शिंदे उपस्थित होते.

## निधन वार्ता

### जयश्री कांबळे



**पिलीव, दि. ५ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जयश्री पांडुरंग कांबळे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्या ६४ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे, दीर, जावा, पुतण्या असा परिवार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त विभागीय अभियंता पांडुरंग हरीबा कांबळे यांच्या पत्नी तर डॉ. निलेश कांबळे यांच्या मातोश्री होत.

### कचरूलाल चौधरी



**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

विजापूर रोड सन्मतीनगर येथील कचरूलाल दिगंबर चौधरी (वय ७६) यांचे ४ एप्रिल रोजी निधन झाले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. पश्चश्चत दोन मुले, मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. महाराष्ट्र सेवा संघ संस्थेचे ते सचिव होते.

### मीना पवार



**सोलापूर,दि.५ एप्रिल -**

येथील मीना विजयसिंग पवार (वय ७४) यांचे शनिवार, ५ एप्रिल रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. अंत्रोळीकर नगर येथील त्यांच्या राहत्या घरातून त्यांची अंत्ययात्रा रविवारी सकाळी नऊ वाजता निघणार आहे. मोदी स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सोलापूर जि.प.चे तत्कालीन मुख्य वित्त व लेखा अधिकारी तथा म्हाडा मुंबईचे वित्त नियंत्रक अजयसिंह पवार यांच्या त्या मातोश्री होत.

# खडतर परिस्थितीतून गुणवत्ता संपादनाचा संस्कार विद्यामंदिरने रुजवला

## अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ एप्रिल-**

सांगोल्यासारख्या अवर्षणग्रस्त भागामध्ये गुणवत्तेचा दुष्काळ कधीच पडला नसून अतिशय खडतर परिस्थितीतील होतकरू विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता संपादन करण्याचा संस्कार आज विद्यामंदिर परिवारातील सांगोला विद्यामंदिर प्रशाला, नाझरा विद्यामंदिर प्रशाला आणि कोळा विद्यामंदिर हायस्कूल यासारख्या शाळांमुळे रुजला असल्याची भावना सोलापूर ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांनी व्यक्त केली.

येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृहामध्ये सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती व छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती संपादन करणाऱ्या १३४ विद्यार्थ्यांचा तसेच पालक व मार्गदर्शक शिक्षकांच्या सन्मान प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सां.ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रबुद्धचंद्र झपके, डॉ.अंबिका यावलकर, पोलीस उपअधीक्षक विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांच्यासह सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्या शीलाकाकी झपके, राजश्री झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, प्राचार्य श्रीकांत लांडगे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार समर्पित करत पूजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांचा पालकांसह प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन तसेच कोळा, नाझरा व सांगोला येथील शिक्षकवृंद व लिपिक, संस्था व प्रशालाबाह्य विभाग प्रमुख, प्रशासकीय विभाग नियंत्रक व प्राचार्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक मधुकर धायगुडे, सुरेश मस्तुद, मच्छिंद्र इंगोले, प्रदीप धुकटे, चारुदत्त जगताप यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव विभागाचे नरेंद्र होनराव यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आशितोष नष्टे, पारितोषिक वाचन वैभव कोठावळे यांनी केले.

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून आर्थिक दुर्बल घटकांसाठी असणारी भरघोस शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात मोलाचे योगदान देणारी असल्याचे ओळखून सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके यांनी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी संख्या 'शंभरी पार' करण्याचे दिलेले उद्दिष्ट सर्व शिक्षकांनी मोठ्या कष्टाने आणि प्रयत्नपूर्वक पूर्ण केल्याबद्दल शिक्षक आणि प्रशासनाचे यावेळी प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी कौतुक केले. महाराष्ट्र राज्य सेवा आयोगासारख्या स्पर्धा परीक्षेतून अधिकारीपदी विराजमान असणाऱ्या मान्यवरांच्या हस्ते आज प्रशालेतील स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या सन्मानाचा योग मनस्वी आनंद देणारा असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त करत विद्यार्थी व पालकांचेही अभिनंदन केले.




# जनसुरक्षा विधेयकाच्या नावाने सरकारचा दंडेलशाहीचा प्रयत्न : कॉ. तानाजी ठोंबरे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ एप्रिल-**

आयटक, भारतीय कम्युनिस्ट पक्ष व जन संघटना यांच्या संयुक्तवतीने दि. ३ एप्रिल रोजी संघटना व जनतेच्या विरोधामध्ये असणारा महाराष्ट्र सरकार मांडत असलेले जनसुरक्षा विधेयक रद्द करावे ही मागणी घेऊन यशवंतराव चव्हाण सभागृहा समोरील मुख्य रस्त्यावर जोरदार निदर्शने, आंदोलन कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

हे आंदोलन चालू असताना पावसाला सुरुवात झाली. तरीदेखील संपूर्ण आंदोलकांनी पावसामध्येच उभे राहून गेले. कॉम्रेड तानाजी ठोंबरे म्हणाले, इंग्रजांनी ज्याप्रमाणे सामान्य नागरिकांना अटक करण्यासाठी पब्लिक सेफ्टी बिल आणले होते त्याप्रमाणे भाजप सरकार जनतेच्या विरोधामध्ये असणारा जनसुरक्षा कायदा आणत आहे, सरकारच्या शेतकरी, कष्टकरी वर्गाच्या विरोधात आहे त्याला विरोध होऊ नये म्हणून अशा कायद्यांची निर्मिती केली जात आहे, कलाकार, साहित्यिक, विनोदक, लेखक यांना डांबण्यासाठी या कायद्याचा वापर केला जाईल, जनसुरक्षा विधेयकाच्या नावाने सरकारचा दंडेलशाही करण्याचा प्रयत्न आहे, सरकार पूर्णपणे हुकूमशाहीच्या दिशेने निघाले आहे. अशा हुकुमशाहांना यापूर्वीही जनतेने रोखले आहे व आता देखील नक्की जनता रोखेल. यावेळी कॉ. प्रा. तानाजी ठोंबरे, लहू आगलावे, ए.बी. कुलकर्णी, प्रवीण मस्तुद, भारत भोसले, आनंद गुरव, अनिरुद्ध नकाते, बालाजी शितोळे, शौकत शेख, श्रीकांत सोरेगावकर, तानाजी बागल, सुवर्ण कांबळे, सुनीता निकम, आकाश कदम, विजय खूणे, राजू ढेंबरे, संतोष बगाडे, अभिजीत चव्हाण, गणेश गायकवाड, विजय धावारे, किरण शेंडगे, सुवर्ण शिवपुरे आदी उपस्थित होते.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

नवी पेठ येथील मनपा प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक मनीष बांगर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, रजनी राऊळ, महेश वालावरकर, सारंग अंजीखाने, अविनाश शिंदे, अमोल गायकवाड, सनाबेर शेख, सचिन मेहता, सायली ढोले, भालचंद्र साखरे, नासिर खान, सचिन साखरे, गौस रिसलदार उपस्थित होते.

# कृषी प्रधान देशाचा शेतकरी पराधीन : शिवलिंगप्पा वंगे


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

भारत हा कृषी प्रधान देश आहे असा नारा सगळेच देतात,पण शेतक-याचे दु:खणे काय आहे .त्याला लागणारी वीज वेळेत मिळते का ?त्याला शेतीला लागणारे पाणी मिळते का? ब-याच शेतक-यांची मुले सत्तेत आहेत. ते शेतक-यांचा विचार करतात का?याचे उत्तर नकारात्मक मिळते.शेतक-यांच्या समस्या सोडवणूक करणारे राज्यकर्ते निर्माण होणे आवश्यक आहे. असे विचार निव्रुत विस्तार अधिकारी शिवलिंगप्पा वंगे यांनी रामलिंगेश्वर सार्वजनिक वाचनालय आयोजित व्याख्यानमालेत मांडले.



या प्रसंगी इंद्रजित भालेराव यांच्या गावाकडं चल माझ्या दोस्ता या कवितेचा सारांश सांगून शेतक-यांच्या जीवनाचे दर्शन घडविले. प्रारंभी श्री रामलिंगेश्वर प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना श्रीशैल धनशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन व आभार सुभाष फताटे यांनी केले. कार्यक्रमास विश्वनाथ पावले, प्रभुलिंग शेळगे, बसवराज कुर्ले, शरणप्पा कोळी, नागनाथ शेळगे,संगप्पा उदंडे, श्रीशैल चितले,अजित पट्टणशेट्टी, अक्कन बळग उपस्थित होते. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# रामकथेचे महत्व




जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृती ही सर्वश्रेष्ठ असून अनेक ग्रंथ हे देखील इतर देशातील वाङ्मयापेक्षा श्रेष्ठ आहे. त्यात प्रामुख्याने चार वेद, ज्ञानेश्वरी, रामायण, महाभारत असे एकापेक्षा एक असे महत्त्वाचे ग्रंथ भारतात आहेत. त्यात प्रामुख्याने सांगावयाचे झाल्यास रामायण ह्या ग्रंथाचा विचार केला तर त्या ग्रंथापासून सर्वांनाथ काहीतरी घेण्यासारखे आहे. इतकेच नव्हे तर बालपणापासून ते वृद्धापर्यंत, कुटूंबापासून राजकारणापर्यंत आणि सर्व भगिनींसाठी रामायण हे मार्गदर्शक असून तो जीवनाचा दीपस्तंभ आहे.

भगवान विष्णुंनी आयोध्यापती महाराज दशरथ यांच्या पोटी श्रीरामाचा अवतार धारण केला. महर्षी वाल्मिकीनी दशरथनंदन श्रीरामाची संस्कारक्षम रामकथा रामायणातून उलगडून कथन केली आहे. आजही रामकथा केवळ भारतातच नव्हे तर असंख्य देशात रामकथेचे कथन केले जात आहे. कारण त्यामध्ये सत्य, कर्तव्य, चिकाटी, साहस इत्यादी गुणांचे दर्शन राम कथेतील प्रसंग, व्यक्तीरेखा, पात्र इत्यादी माध्यमातून संस्कार घडवते. श्रीराम अवतांरात कर्तव्य पालन, आदर्श पुत्र, आदर्श बंधु, आदर्श पती, प्रजावत्सलता असे अनेक आदर्श निर्माण झाले असून ऐश्वर्य, बल, यश, ज्ञान, वैराग इत्यादी सद्गुणांनी राम अवतार परिपूर्ण आहे. कायिक, वाचिक, मानसिक संस्कार घडविण्याची ताकद रामकथेत आहे. माणसाच्या आयुष्याला वळण लावणारी आणि नशिबाला लागलेला भोग हे भोगून सोडावे लागणारे आणि ते कोणालाही चुकलेले नाही हे दाखविणारी कथा म्हणजे रामकथा होय. समाजाची विस्कटलेली पडी पुन्हा सावरण्याचे सामर्थ्य रामकथेत आहे, आदर्श पुत्र, आदर्श भाऊ, आदर्श पती, आदर्श मित्र, आदर्श राजा, अशी विविध रूपे ही राम कथेत पाहावयला व अनुभवाला मिळतात. उत्तम पुरुष होण्यासाठी मर्यादचे पालन आवश्यक आहे. रामजीवनाचा सखोल अभ्यास सर्व थराच्या लोकांनी करण्याची आज गरज आहे. रामायणात रामाचे लोकोत्तर सगुण पहावयास मिळतात त्याचे अष्टपैलू व्यक्तिमत्व रामकथेतून स्पष्ट होते. रामाच्या ठिकाणी मावनांचा ओलावा जरी असला तरी वेळ पडल्यावर सर्व भावनांना सोडून कर्तव्याला महत्त्व दिल्याने त्याला मर्यादा पुरुषोत्तम असे म्हटले आहे, रामाचे लोकांवर अपार प्रभुत्व होते. अगदी लहानपणापासून ते वृद्धापर्यंत सर्वांनाच रामाविषयी आदर, श्रद्धा व प्रेम आहे. रामाच्या सहवासात जे जे लोक आले त्यांच्यावर श्रीरामाचा प्रभाव पडला. अगदी शत्रू पक्षाचा म्हणजे रावणाचा पक्ष सोडून तो रामाश्रयाला आला. अनेकांनी या गोष्टीला विरोध केला असला तरी ती रामाचे वचन होते की, जो कोणी मला शरण येईल त्याला मी अभय देईन ह्यामुळे विभीषणाला अभय देऊन संरक्षण केले.




राम एक आदर्श पुत्र होता. कैकयीला दिलेल्या वचनाप्रमाणे राजत्याग करून चौदा वर्षाचा खडतर वनवास भोगला. वडिलांच्या म्हणजे राजा दशरथाच्या मनात व प्रजेला देखील राजाने वनवासात न जाता राजकारभार करावा असे जरी वाटत असले तरी त्यांनी मातृ आज्ञा सर्वश्रेष्ठ मानून सर्वांना विश्वासात घेऊन वनवास स्वीकारला. रामाचे बंधू प्रेम अपार होते. आपल्या भावाच्या सुखासाठी वाटेल ते करण्याची रामाची तयार होती. भरत राज्यावर बसणार म्हटल्यावर श्रीराम नाराज न होता त्यांना उलट आनंदच झाला. ही गोष्ट लक्ष्मणाला आवडली नव्हती, तेव्हा रामांनी त्याची समजूत घालत म्हटले आहे की, मित्र, भाऊ यांचा नाश करून जर संपत्ती मिळणार असेल तर मला ती कदापी नको आहे. उलट त्यांनी लक्ष्मणाला सांगितले की धर्म, अर्थ व काम ह्या तीन पुरुषार्थी माझी साधना आहे. त्याचप्रमाणे राम हा आदर्श पती होता.

त्याचे सीतेवर आत्यंतिक प्रेम होते. वनवासामध्ये सीतेची सर्व प्रकारे काळजी घेतली होती. वनवासात जेव्हा सीतेचा वियोग झाला, तेव्हा रामाला अपार दुःख झाले आणि सीतेच्या शोधासाठी देहभान विसरून व प्रयत्नांची पराकाष्टा करून सीतेचा शोध घेतला. ही रामाच्या सीतेवरील उत्कट प्रेमाचे दर्शन घडवते व ही प्रेमाची साक्ष देते. लोक अपवाद टाळण्यासाठी त्याने जरी रामाने सीतेचा त्याग केला तरी आपल्या मनातून हा त्याग नव्हता. त्याने स्वतः विरक्त जीवन स्वीकारले होते. इतकेच नव्हे यज्ञाचे यजमान पद स्वीकारते समयी रामानी सीतेची प्रतिकृती करून आपल्या शेजारी बसवली. सीता नाहीं म्हणून त्यांनी दुसरा विवाह केला नाही. यावरून रामाने स्वतःच्या हृदयात सीतेचे स्थान हे आढळ स्थान होते हे स्पष्ट होते. म्हणून रामाला एक पत्नी म्हणून आदर्श मानतात. रामाला आदर्श मित्र मानतात. रामायणात निषाधाधिपती गुहक आणि वानराचा सुग्रीव हे रामाचे मित्र होते. सुग्रीवाची पत्नीने अपहरण करणाऱ्या बालीला चांगलाच घडा शिकवला व सुग्रीवशी मैत्री केली. राम जेव्हा लंकेच्या प्रस्थानाला निघाले तेव्हा म्हणाले, मी स्वतःवर जेवढे प्रेम करतो तितकेच प्रेम दोन्ही मित्रावर करतो, तुमच्या विना मी देवलोकात व परधर्मात जाऊ शकत नाही. यावरून त्यांची मैत्री किती घट्ट होती हे लक्षात येत. रामाचे प्रजेवर व प्रजेचे रामावर अपार प्रेम होते. प्रजेसाठी ते बंधु, पत्नी आणि स्वतःच्या प्राणांचाही त्याग करायला तयार होते. शत्रू देखील रामाला आदर्श मानत. वास्तविक पाहता मारीच राक्षस हा रामाचा शत्रू होता. पण त्याचे देखील रामा विषयी चांगले मत होते. मारीत राक्षस म्हणतो राम हा मूर्तिमंत धर्म आहे तो सज्जन आणि पराक्रमी आहे. देवाचा राजा जसा इंद्र आहे. तसाच राम हा प्रजेचा राजा आहे. धर्म आणि सद्गुणी यांच्या रक्षणासाठी त्यांने स्वतः वनवास स्वीकारले. रामाचा आत्मप्रत्यक्ष देखील विलक्षण होता. युद्धाच्या वेळी थकलेल्या आणि प्राण संकटात सापडलेल्या रावणावर कोणतेही हत्यार न चालवता त्याला सोडून दिले. रावणाला ठार मारल्यावर त्याच्या देहाची विटंबना न करता त्याची अंतक्रिया देखील सन्मानपूर्वक केली. रावण हा रामाचा शत्रू असून मृत्यूनंतर शत्रुत्व संपुष्टात येते. इतका उदारमतवादी गुण रामाच्या ठिकाणी दिसून येतो. याउलट विभीषणाला रावणाचा राग होता. रामाचे कोणाशीही वैर नव्हते. याउलट पाप, अधर्म, अनिती, अत्याचार ह्या दुर्गुणांशी रामाचे वैर होते. वालीला मारल्यावर त्याचे राज्य ते सुग्रीवला देऊन टाकले. त्याचप्रमाणे लंकेवर विजय मिळाल्यावर लंकेचे राज्य विभीषणाला परत देऊन टाकले. स्वतःच्या राज्याची सीमा वाढवून जिंकलेली राज्ये स्वतःच्या रामाला जोडण्याचा मोह रामाच्या ठाई नव्हता हे स्पष्ट होते. अशा प्रकारे राम हा एकवचनी, एकबाणी, एकपत्नी, आज्ञाधारी, धर्मनिष्ठ, आदर्श पती, विश्वासू मित्र असा मर्यादा पुरुषोत्तम राम अनुकरणीय आहे. आदर्श विद्यार्थ्यांसाठी सारी लक्षणे ही रामकथेत पाहता येतात. गुरु मुखातुन आलेले ज्ञान मिळवताना तहानभूक विसरली पाहिजे. विश्वामित्राबरोबर वनातून जात असताना ऋषींनी वेद उपनिषदे इत्यादी शास्त्राचे सखोल ज्ञान राम व लक्ष्मण या दोघांनीही आत्मसात केले. रामकथा सत्य वचन व संयमाचा परिपाठ शिकवते. खोटे बोलण्याचे पाप घडू नये यासाठी पंचज्ञानेंद्रिय व पंचकर्मेंद्रिय यावर कसे नियंत्रण मिळवले पाहिजे याचा अभ्यास राम कथेतून मिळतो. स्वतःजवळ काय नाही यापेक्षा आपल्या हाती काय आहे आणि यातून कसा विजय प्राप्त करून घेता येईल हे शिकण्यासारखे आहे फक्त धनुष्यबाण व लक्ष्मणाची साथ, हनुमान व वानर सेना यांच्या मदतीवर रामानी बलाढ्य रावणावर विजय मिळवला हा एक आदर्शच म्हणावा लागेल. सैन्य, विविध हत्यारे, रथ याची त्याने अपेक्षाच केली नाही. राम कथेतून चारित्र्य संपन्नता शिकावी. वनवासात रामाने सौंदर्य संपन्न अशा शूर्पणखेला नाकारले तसेच मंदोदरी सारखी गुणवान पत्नी करून ही स्त्रीच्या मोहाने रावणाने सीतेचे अपहरण केले व विनाशाला आमंत्रण दिले. लक्ष्मणाने देखील वनवासात मर्यादा पालन करून मान वर करून कधीही सीतेचे मुख न पाहता, केवळ तिच्या चरणाशी लीन झाला होता. तसेच शरीर संपदा व व्यायामाची कोणत्याही कामात यशस्वी होण्यासाठी गरज असते हे मोठे तत्व आजच्या तरुणांसाठीच मांडले आहे त्याचप्रमाणे कुटुंबात एकी, परस्पराविषयी आधारभाव, सांमजस्य, सहकार्य ह। रामाच्या कुटुंबाचा आदर्श भाव आहे. यापलीकडे जाऊन जटायू, सुग्रीव, मारुती, गुह्य राजा, विभीषण यांच्याशी देखील बंधुभाव जोपासून आदर्श कुटुंब व्यवस्था कशी असते हे राम कथेतून पाहता येते.

माणसाने कसे असावे यापेक्षा माणसाने कसे नसावे हे राम कथेच्या विविध पात्रातून शिकता येते. सृष्टी बदलत नाही पण माणसांची दृष्टी बदलायला हवी हे राम कथेतून शिकता येते. आजच्या राज्यकर्त्यांनी आदर्श राज्यपद्धती कशी असावी याची शिकवण देखील रामकथेतूनच शिकता येते राम चौदा वर्षे वनवासात गेल्यावर सर्वात लहान असणाऱ्या भरताने रामाच्या पादुका ठेवून त्याच्याच नावाने राज्य कारभार करून घरातील सहा शोकमग्न राजस्त्रिया, सैन्य, प्रजेची सुरक्षितता, स्थैर्य, मंत्रिमंडळ, राज्यव्यवस्था हे सर्व समर्थपणे पेलून राज कर्तव्य पार पाडले. राम कथेत आदर्श स्त्रियांची ओळख देखील होते. उर्मिला, मांडवी, श्रृतकिर्ती, यांच्याकडून आदर्श स्त्रिया अशा असाव्यात याचे दर्शन घडते. राम कथेत सर्वच मानवी स्वभावाचे दर्शन घडवितात. श्रावण बाळाच्या आई-वडिलांनी दिलेला शाप हा दशरथांनी स्वीकारला, कैकीयीने रामाला वनवासात पाठविण्याचा हट्ट रमाने स्वीकारला, राजपुत्र असून देखील निषाद राजा गृहस्थ या नावाड्याशी मैत्री केली. रामकथा समाजातील सर्व स्तरातील स्त्री-पुरुष, लहान-मोठी मुले, गरीब-श्रीमंत सेवक या सर्वांनाच आपल्या कर्तव्याची जाणीव करून देत. राम कथा माणसाला तणावमुक्त करून प्रगती व शांततेची वाट दाखवते. रामकथा ही दीपस्तंभ प्रमाणे आहे. रामकथा हे केवळ वाङ्मय कलाकृती नसून संस्काराचा महामेरू आहे. रामाच्या नामस्मरणांनी वाल्याची वाल्मिकी होतो, हे राम कथेचे श्रेय नव्हे का ? राम नसेल तर जीवनात राम राहणार नाही, ही रामकथेची शिकवण आहे.

**- रामकृष्ण अघोर,**
सोलापूर.
भ्रमणध्वनी - ९९७०५९५२८५



सोलापूर : पूर्वभाग परिसरात रामजन्मोत्सवानिमित्त रथोत्सवाची तयारी करण्यात व्यस्त असेलेले सेवेकरी. (छायाचित्र केवल तिवारी)

# भीम प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय पुरस्कारांचे थाटात वितरण

- बुद्ध तत्वज्ञान अन् धम्माशिवाय तरणोपाय नाही
- राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष अॅड. धर्मपाल मेश्राम यांचे प्रतिपादन
- दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांचा झाला सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि.५ एप्रिल-**

आजच्या स्थितीत जगाला युद्धाची नव्हे तर शांतीचा संदेश देणाऱ्या बुद्धांची गरज आहे. बुद्ध तत्त्वज्ञान, विचार आणि धम्माशिवाय तरणोपाय नाही. हेच आज खरे ठरत आहे. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार खऱ्या अर्थाने तारणारे आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव हा प्रेरणादायी आणि कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष एड. धर्मपाल मेश्राम यांनी काढले.

भीम प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारी सायंकाळी हुतात्मा स्मृती मंदिरात राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष अॅड. धर्मपाल मेश्राम यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून जि.प. पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे, उद्योजक पदमचंद राका, डॉ. शिवाजीराव पवार, सुजीत कदम, प्रा. विक्रम कांबळे, दत्ता गायकवाड, देवेंद्र मोरे, जीएम संस्थेचे बाळासाहेब वाघमारे, धर्मेंद्र माने, राजा माने, संस्थापक बाबा बाबरे, अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, प्रा. विक्रम कांबळे, दत्ता गायकवाड आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

अॅड. मेश्राम पुढे म्हणाले, जगाला शांतीचा संदेश देणाऱ्या नागपूर दीक्षाभूमीतून मी आलो आहे. समाजासाठी आयुष्य वेचणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार सोहळा हा प्रेरणादायी आणि अभिमानास्पद असा आहे. सध्या जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धांची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कृतीतून समता रुजवली. सद्यस्थितीत जग युद्धाच्या उंबरठ्यावर आहे. अशा परिस्थितीत जगाला बुद्धांच्या तत्त्वज्ञान आणि विचारांची गरज आहे. शेवटच्या माणसाला विकासाच्या धारेत आणण्याचे काम करण्याची गरज आहे त्यासाठी विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार देशाला तारणारे आहेत. तोच विचार सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्य विविध उपक्रमातून भीम प्रतिष्ठान करीत आहे. हे भूषणावह आहे.

पश्चिम महाराष्ट्र हा भाग सुधारलेला आहे असं वाटत होतं मात्र तो भ्रम निरास आहे. पुणे जिल्ह्यात ट्रॉसिटीचे प्रमाण अधिक आहे. सोलापुरात २५८ केसेस आहेत. समाज म्हणून अधिक समन्वय आणि सुधारणेचे काम करणे गरजेचे आहे. यासाठी शासन, प्रशासनानेही पुढाकार घेतला पाहिजे. अन्यायाची मालिका आहे. देश प्रगतीच्या दिशेने पुढे जात आहे. अशा काळात डॉ. आंबेडकर यांचे विचारच देशाला तारणार आहेत, असेही एड. मेश्राम म्हणाले. यावेळी पदमचंद राका, धर्मेंद्र माने यांनी आपल्या भाषणात भीम प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले. अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे यांनी स्वागत केले. प्रास्ताविक भाषणात संस्थापक बाबा बाबरे यांनी प्रतिष्ठानच्या २५ वर्षातील कार्याचा आढावा मांडला. सूत्रसंचालन ऐश्वर्या हिबारे यांनी केले. अॅड. स्वाती मस्के यांनी आभार मानले.

यावेळी अकबर शेख, सिद्धांत बाबरे, प्रभाकर बाबरे, ऍड. विशाल मस्के, स्वाती मस्के, उषा चव्हाण, भीमराव माने, प्रेम अंकुश आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### यांचा झाला पुरस्काराने सन्मान

यावेळी दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने (आदर्श पत्रकारिता पुरस्कार), उद्योजक महादेव कोगनुरे (सामाजिक पुरस्कार), रवी बापटले (विशेष गौरव पुरस्कार), प्रा. नानासाहेब गव्हाणे (गौरव पुरस्कार), राखी देशमाने (शैक्षणिक), राहुल बनसोडे (कामगार पुरस्कार), उमाकांत गायकवाड (क्रीडा पुरस्कार), दिगंबर भगरे (सन्मानपत्र), विनोद माने (सन्मानपत्र) आदी मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

### समाजातील खऱ्या हिरोंचा गौरव प्रेरणादायी : अमोल शिंदे

कुठलाही स्वार्थ न ठेवता भीम प्रतिष्ठान गेली २५ वर्षापासून अखंड कार्य करीत आहेत. ही निश्चित सर्वांसाठी अभिमानास्पद बाब आहे समाजातील खऱ्या हिरोंचा गौरव हा प्रेरणादायी आहे. शिव - फुले - शाहू- आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे गरजेचे आहे. ते कार्य करणाऱ्या संस्थांच्या मागे शक्तीने उभारणे महत्त्वाचे आहे, असे आवाहन शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे यांनी केले.

### भीम प्रतिष्ठानचे कार्य आदर्शवत : धनशेट्टी

कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी म्हणाले, भीम प्रतिष्ठानचे गेल्या २५ वर्षातील कार्य प्रेरक आणि आदर्शवत असे आहे. पुरस्काराने कामाची जबाबदारी वाढते. समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो, हा उदात्त विचार ठेवून कार्य करणे गरजेचे आहे. अशा मान्यवरांचा इथे गौरव होत आहे. हे प्रेरणादायी आहे.

### भीम गीत कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली

दरम्यान, कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाहीर दीपक कांबळे यांचा भीम गीत कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.



## जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांचा ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल**

महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील हे सोलापूर विमानतळावर आले असता, आ.देवेंद्र कोठे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी विखे पाटील यांना शाल, गुलाब पुष्प, आणि महाराष्ट्र राज्याचे जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावरील पुस्तक भेट देऊन त्यांचा सत्कार केला.

आमदार देवेंद्र कोठे यांनी ही भेट घडवून आणली. याप्रसंगी भाजपाचे ज्येष्ठ नेते शहाजी पवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सोलापूर शहर उपाध्यक्ष उमेश जाधव, सरचिटणीस संतोष गायकवाड, माणिक कांबळे वसंत कांबळे, महादेव राठोड, आनंद गाडेकर यांची उपस्थिती होती. यावेळी राधाकृष्ण विख-पाटील हे सोलापूरचे तत्कालीन पालकमंत्री असताना सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासह प्रभाग २२ मधील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिल्या होत्या. त्यानिमित्त त्यांचा सत्कार करण्याचा योग आमदार देवेंद्र कोठे यांच्यामुळे लाभला. त्यानिमित्त त्यांचे आभार देखील यावेळी किसन जाधव यांनी मानले. महायुतीचा घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे अडचणी, निधी संदर्भात आपण नेहमी सहकार्याची भूमिका दर्शविल्याची यावेळी नामदार विखे-पाटील म्हणाले. या सत्कार सोहळ्याप्रसंगी इच्छा भगवंताची मित्रपरिवाराचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## श्रीगुरु बापूसाहेब महाराज देहुकर यांच्या 'काल्या'च्या किर्तनाने सप्ताहाची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे चैत्र शुद्ध १, गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर प्रारंभ झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची दि. ५ एप्रिल रोजी श्रीगुरु बापूसाहेब महाराज देहुकर यांच्या काल्याच्या संकीर्तनाने सांगता झाली.

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये चैत्र शुद्ध १ गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर या सप्ताहास प्रारंभ करण्यात आला होता. संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे विद्यमान वंशज वै.सद्गुरु सोपानकाका महाराज देहुकर, वै. श्रीगुरु ज्ञानेश्वर माऊली महाराज देहुकर यांच्या कृपाशीर्वादाने तसेच श्रीगुरु बापुसाहेब महाराज देहुकर यांच्या मार्गदर्शनाखाली, श्रीगुरु कान्होबा महाराज देहुकर यांच्या उपस्थितीत हा भक्तीमय सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गाथा पारायण, गाथा भजन, हरिपाठ, प्रवचन व संकीर्तनाच्या माध्यमातून सात दिवस तामलवाडीकर भक्तीरसात न्हाऊन निघाले होते. या अखंड हरिनाम सप्ताहाला ५१ वे वर्षे पूर्ण झाली.आज दि.५ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता दिंडी काढून नगरप्रदक्षिणा घालण्यात आली व श्रीगुरु बापुसाहेब महाराज देहुकर तथा अण्णा यांची काल्याची संकीर्तन सेवा होऊन यावर्षीच्या सप्ताहाची सांगता करण्यात आली. यावेळी सप्ताहामध्ये सहकार्य करणारे सर्व अन्नदाते, सेवेकरी, चोपदार, चहा, पाणी, मंडप डेकोरेटर तसेच सप्ताहामध्ये आपापल्या परीने सहकार्य करणारे सर्व नागरीक यांचा श्रीगुरु बापुसाहेब महाराज देहुकर व श्रीगुरु कान्होबा महाराज देहुकर, श्रीगुरू निलकंठ महाराज देहूकर यांच्या हस्ते श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच अखंड हरीनाम सप्ताहामध्ये सहकार्य केलेल्या सर्वांचे अखंड हरीनाम सप्ताह व यात्रा कमिटीच्या वतीने आभार मानण्यात आले.



### श्रावण महिन्यात मंदिरावरील कळसारोहण

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या शिखराचा लोकवर्गणीतून जिर्णोद्धार करण्यात आला असून, गेली दोन वर्षांपासून शिखर जिर्णोद्धाराचे काम चालू होते; ते सन २०२५ मध्ये पुर्ण झाले आहे. रंगरंगोटीचे काम तसेच कळसारोहणाचे काम बाकी आहे. श्रावण महिन्यात कळसारोहण करण्यात येणार असल्याचे यात्रा कमिटीच्या वतीने सांगण्यात आले.



'हवनकुंडीय यज्ञ'

सोलापूर : राम नवमीनिमित्त श्री रामजन्मोत्सव समिति मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने डॉ.हेडगेवार पटांगणात 'हवनकुंडीय यज्ञ' शनिवारी संपन्न झाला. (छायाचित्र केवल तिवारी)

## क्राईम न्युज...

### दारूच्या नशेत जादा गोळ्या खाल्याने एकजण अत्यवस्थ

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

दारूच्या नशेत फीटकरीता असलेल्या जादा गोळ्या खाल्यानो तरूण अत्यवस्थ झाला. राजन भिमराव बनसोडे (वय ४०, रा. न्यु बुधवार पेठ, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. ४ एप्रिल रोजी सायंकाळी राहत्या घरी राजन बनसोडे याने फिट करीता असलेल्या गोळ्या जास्त प्रमाणात एकाच वेळी खाल्याने बनसोडे यांस शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### चंद्रकला नगर येथील मशिदीजवळ तरूणाचा जखमी होऊन मृत्यू

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

एमआयडीसी परिसरातील चंद्रकला नगरातील अहलेरूना मशिदीजवळ २४ वर्षीय तरूण जखमी होऊन मरण पावला. नोमान निजाम शेख (वय २४, रा. महालक्ष्मी नगर, मजरेवाडी, सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. ४ एप्रिल रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास नोमान शेख हा चंद्रकला नगर येथील अहलेरूना मशिदीजवळ जखमी व बेशुध्दावस्थेत मिळून आला होता. त्यामुळे त्यास वडील निजाम यांनी उचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता नोमान याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. ध्रुव गायकवाड यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### कुत्रा आडवा आल्याने पडून दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

शहरातील एमआयडीसी पोलिस ठाण्यासमोर कुत्रा आडवा आल्याने पडून दुचाकीस्वार जखमी झाला. निजाम अ. समद खान (वय ६५, रा. शानदार चौक, शास्त्री नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. निजाम खान हे ५ एप्रिल रोजी पहाटे पावणे दोनच्या सुमारास एमआयडीसी येथून राहत्या घरी दुचाकीवरून जात होते. त्यावेळी एमआयडीसी पोलिस ठाण्यासमोर दुचाकीसमोर कुत्रा आडवा आल्याने त्यात दुचाकी स्लीप होऊन खाली पडून खान हे जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## तेलगाव येथे विजेचा धक्का लागून शेतकऱ्याचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील तेलगाव येथे नदीकाठी असलेल्या विद्युत मोटार चालू करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांचा वीजेचा धक्का बसून मृत्यू झाल्याची घटना सकाळी साडेदहा वाजता घडली.

शब्बीर सुलेमान मुल्ला वय ३२, रा. तेलगाव असे विजेचा धक्का बसून मृत्यू झालेल्या तरूण शेतकर्याचे नाव आहे. मुल्ला यांची तेलगाव येथे तीन एकर येथे शेती आहे. शेतातील ऊसाला पाणी देण्यासाठी तो नदीवर विद्युत मोटार चालू करण्यासाठी गेला. यावेळी मोटार चालू करताना अचानकपणे त्याला वीजेचा जोरदार धक्का बसला. यातच त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच मंद्रूप पोलीस ठाण्याचे हवालदार शहानूर मुलाणी यांच्यासह पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली. सदर मृतदेह शवविच्छेदनासाठी मंद्रूप ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मयत शब्बीर मुल्ला यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. शब्बीर मुल्ला यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.



# आरोग्य विभागाने तपासणीसाठी घेतले पाण्याचे नमुने

- आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी जाणून घेतल्या 'त्या' परिसरातील अडचणी; मयत मुलींच्या कुटुंबांचे केले सांत्वन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बाबू जगजीवनराम झोपडपट्टी येथे प्रत्येक्ष भेट देऊन त्याठिकाणी मृत पावलेल्या मुलींच्या कुटुंबाशी भेट घेतली. झालेल्या प्रकार दुर्देवी असून कुटुंबांचे सांत्वन केले. तसेच त्या परिसरातील पाण्यासंदर्भातील अडचणी जाणून घेतल्या व आरोग्य विभाग, पाणी पुरवठा विभाग, मलेरिया विभाग व विभागीय कार्यालय यांना तात्काळ कार्यवाही करण्याची आदेश दिले.

सोलापूरच्या मोदी परिसरातील बाबू जगजीवनराम झोपडपट्टी परिसरात दोन शाळकरी मुलींचा मृत्यू झाला असून एका मुलीची प्रकृती गंभीर आहे. या भागात येणाऱ्या दूषित पाण्यामुळे मुलीचे मृत्यू झाले आहे अशी तक्रार आल्या होत्या. त्या अनुषंगाने डॉ. व्ही.एम.जी.एम. महाविद्यालय यांच्याकडून प्राप्त झालेल्या वैद्यकीय अहवाल नुसार त्यांचा मृत्यू हा डेंगू सदृश आजार (मेंदूज्वर) या आजाराने मृत्यू झाला आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले. त्यानुषंगाने आरोग्य विभागाने पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले. वैद्यकीय पथक, जी.एन.एम., ए.एन.एम, एम.पी.डब्लू-एम., आशा स्वयंसेविका यांनी त्या परिसरातील मलेरिया व डेंगू या कीटकनाशक आजाराचे सर्वेक्षण सुरु केले. जिया महादेव म्हेत्रे १५ वर्षांची विद्यार्थी मोदीखाना सोलापूर येथील रहिवासी हिला दि. ४ एप्रिल २०२५ रोजी ॲडमिट करण्यात आले. तिला गेल्या तीन दिवसांपासून ताप, डोकेदुखी, अंग दुखी इत्यादी त्रास होत होता. शरीरावर पुरळ दिसून येत होते. तिला रुग्णालयात एक झटका आला होता. तिला अति दक्षता विभागात ॲडमिट करण्यात आले आणि त्यानंतर ती डेंगूसदृश ताप (मेंदूज्वर) मेंदूत गेल्याने उपचारास प्रतिसाद न दिल्याने दि. ५ एप्रिल २०२५ रोजी तिचा मृत्यू झाला आहे.ममता अशोक म्हेत्रे १४ वर्षांची विद्यार्थी मोदीखाना सोलापूर येथील रहिवासी हिला दि.२७ मार्च २०२५ रोजी ॲडमिट करण्यात आले. तिला गेल्या नऊ दिवसांपासून ताप, डोकेदुखी, अंग दुखी, एक दोन वेळा जुलाब व उलटी इत्यादी त्रास होत होता. शरीरावर पुरळ दिसून येत होते. तिला अति दक्षता विभागात ॲडमिट करण्यात आले आणि त्यानंतर ती डेंगूसदृश ताप (मेंदूज्वर) मेंदूत गेल्याने उपचारास प्रतिसाद न दिल्याने दि. ४ एप्रिल २०२५ रोजी तिचा मृत्यू झाला आहे. जयश्री महादेव म्हेत्रे १३ वर्षांची विद्यार्थी मोदीखाना सोलापूर येथील रहिवासी हिला अति दक्षता विभागात ॲडमिट करण्यात आले.

ती सद्य बेशुद्ध आवस्थेत असून तिची प्रकृती चिंताजनक आहे. आपल्या परिसरात कोणत्याही नागरिकांना ताप, उलटी, जुलाब, डोके दुखी, शरीरावर पुरळ इत्यादी लक्षणे दिसल्यास तात्काळ मुख्य आरोग्य विभाग सोलापूर महानगरपालिका व विभागीय कार्यालयाकडे संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.



### एक दिवस कोरडा दिवस पाळावा

शहरीतील खाजगी रुग्णालय यांच्याकडे डेंगू सदृश रुग्ण चिकण गुनिया, मलेरिया इत्यादी रुग्ण असल्यास मुख्य आरोग्य विभाग, सोलापूर महानगरपालिका कळवावे. तसेच शहरातील नागरिकांनी परिसर स्वच्छता ठेवावी व सर्वात महत्वाचे आठवड्यात एक दिवस कोरडा दिवस पाळावा. घरातील पिण्याचे भांडी धुऊन, स्वच्छ पुसून ठेवावी. तसेच घरात पाण्याची साठवण ठेवू नये. जर साठवण केल्यास पाण्याच्या टाकीचे झाकण घट बंद करावे, असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कवी माधव पवार यांच्या 'गरुडभरारी' काव्यसंग्रहाचे बुधवारी प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

येथील कविवर्य रा.ना. पवार प्रतिष्ठान आणि शिवप्रज्ञा प्रकाशन, सोलापूर यांच्या वतीने ज्येष्ठ कवी माधव पवार यांच्या 'गरुडभरारी' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ बुधवार दि.९ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृह (ॲम्फी थिएटर) येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती कविवर्य रा.ना. पवार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.




'गरुडभरारी' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन पिंपरी चिंचवड येथे संपन्न झालेल्या ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते होणार असून पद्मश्री नारायण सुर्वे कला व साहित्य अकादमी, पुणेचे अध्यक्ष कृषीभूषण सुदाम भोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहाणार आहेत. ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. सुहास पुजारी यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रकाशन सोहळा होणार आहे. या काव्यसंग्रहास प्रख्यात कवी फ.मुं. शिंदे यांनी पाठराखण केली आहे. शिवप्रज्ञा प्रकाशन, सोलापूर यांनी हा काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे.

या पत्रकार परिषदेला कवी माधव पवार, शिवप्रज्ञा प्रकाशनचे प्रकाशक व ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र भोसले, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी उपस्थित होते.

## ▶▶ महत्त्वाचे...

### रेल्वे स्टेशनमधून १४ हजारांचा मोबाईल लंपास

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

शहरातील रेल्वे स्टेशन येथून १४ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेल्याप्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत निलेश किसनसिंह बिजापूरवाले (रा. उत्तर सदर बझ, लोधी गल्ली, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ मार्च रोजी रात्री दहाच्या सुमारास निलेश बिजापूरवाले यांचा १४ हजार रुपये किंमतीचा मोबाईल रेल्वे स्टेशन येथे गर्दीचा फायदा घेत चोरून नेला. पोलिस हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

### एटीएम कार्ड बदलून ४० हजार काढले

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

हातचालाखी करीत अज्ञात चोरट्याने वृध्दाला दुसरेच एटीएम कार्ड देत ४० हजार रुपये काढून घेत फसवणुक केली. याबाबत राजाराम सिताराम ठाकूर (वय ६१, रा. युनिटी क्लासिक अपार्टमेंट, रेल्वे लाईन, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजाराम ठाकूर हे १९ मार्च रोजी डफरीन चौकातील एसबीआय बँकेच्या एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यावेळी शेजारी उभा असलेला अनोळखी व्यक्ती याने ठाकूर यांनी पैसे काढत असताना एटीएम पीन टाकताना पाहिले होते. ठाकूर हे पैसे काढून मोजत असताना त्या अनोळखी व्यक्तीने हातचालाखी करीत एटीएम मशीन मधून एटीएम कार्ड काढून घेऊन त्याच्याजवळील दुसरे एटीएम कार्ड ठाकूर यांना दिले. त्यानंतर त्या अनोळखी व्यक्तीने ठाकूर यांच्या एटीएमचा वापर करून ४० हजार रुपये परस्पर काढून ठाकूर यांची फसवणुक केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक व्हट्टे पुढील तपास करीत आहेत.

### जुना विडी घरकुलमध्ये वृध्दाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**



जुना विडी घरकुलमध्ये वृध्दाने गळफास घेऊन आत्महत्या केली. रमेश पुलय्या चिंता (वय ७०, रा. एच ग्रुप, जुना विडी घरकुल, सोलापूर) असे आत्महत्या करणाऱ्याचे नाव आहे. ४ एप्रिल रोजी दुपारी अडीचच्या सुमारास राहत्या घरी स्लॅबच्या हुकला लुंगीच्या सहय्याने रमेश चिंता यांनी गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर एमआयडीसी पोलिस ठाण्यातील हवालदार आर बी पाटील यांना चिंता यांस खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. अक्षय इमडे यांनी चिंता यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### विषारी रंग पिऊन तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

शहरातील बोळकोटे नगर येथील मोकळ्या मैदानात तरूणाने विषारी पिवळा रंगाचा रंग प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मनोहर मल्लेशम दोंतुल (वय ३०, रा. निलम नगर, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. ४ एप्रिल रोजी सायंकाळी बोळकोटे नगर येथील मोकळ्या मैदानात मनोहर दोंतुल याने अज्ञात कारणावरून सडा मारण्याचा पिवळ्या रंगाचा विषारी रंग प्राशन केला. त्यामुळे मनोहर यास त्रास होऊ लागल्याने मित्र अमर अंबट याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### स्पिड ब्रेकरवर दुचाकी आदळून पडल्याने महिला जखमी

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

स्पिड ब्रेकरवर दुचाकी आदळून पडल्याने महिला जखमी झाला. रेखा संदीप कळसे (वय ४२, रा. विनायक नगर, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. रेखा कळसे या ४ एप्रिल रोजी सायंकाळी दुचाकीवर मागे बसून डोणगाव-विनायक नगर दिशेने जात होत्या. त्यावेळी राजस्व नगर जवळील स्पीड ब्रेकरवर दुचाकी आदळल्याने रेखा या खाली पडल्या व त्यांच्या डोक्यास मार लागून जखमी झाल्या. रेखा यांना उपचारासाठी जावई अरूण कामले यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## शेतीसाठी आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब आवश्यक

### जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील; सांगोला महाविद्यालयात सिंचन परिषदेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

पूर्वी शेतीसाठीच सिंचन व्यवस्था होती. परंतु औद्योगीकरण आणि शहरीकरणामुळे शेतीसाठी उपलब्ध पाणी कमी होत असल्याने, पारंपरिक सिंचन पद्धतीत बदल करून आधुनिक तंत्रज्ञानाचा सिंचनासाठी शेतकऱ्यांनी वापर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.




सांगोला महाविद्यालयात आयोजित २१ व्या महाराष्ट्र सिंचन परिषदेत मंत्री विखे-पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या परिषदेत आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार शहाजी बापू पाटील, जलसंपदाचे सचिव डॉ. संजय बेलसरे आदींचा समावेश होता. या कार्यक्रमात विविध जिल्ह्यातून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, महाराष्ट्र सरकारचे धोरण आहे की राज्याला पूर्णपणे दुष्काळमुक्त करणे. पुराच्या अतिरिक्त पाणी वाया जाऊ नये म्हणून नदी जोड प्रकल्पांना चालना दिली जात आहे. राज्याची सिंचन क्षमता पूर्वी ३.८६ लाख हेक्टर होती, आता ती ५५ लाख हेक्टरवर पोहोचली आहे. यात आणखी वाढ करण्यासाठी आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब करण्यावर जोर देऊन पाण्याचे व्यवस्थापन आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा प्रभावी वापर करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

#### सिंचन प्रकल्पांना गती

जलसंपदाचे सचिव संजय बेलसरे यांनी सांगितले की, सांगोला तालुक्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी सिंचन प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. सिंचन व्यवस्थापनात आवश्यक बदल सुचवल्यास, त्या सूचना जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सोडविल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

#### स्वयंचलित हवामान केंद्राचे उद्घाटन

यावेळी भारतीय हवामान खात्याकडून स्थापित स्वयंचलित हवामान केंद्राचे उद्घाटन जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या यंत्राद्वारे हवेतील तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग, दिशा आणि पर्जन्यमानाची माहिती पुण्यातील हवामान विभागाला पाठविली जाते. ही माहिती व त्या अनुषंगाने आवश्यक सूचना स्थानिक शेतकऱ्यांना मोबाइलद्वारे पाठवण्याचे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

#### प्रदूषण आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा


मंत्री विखे पाटील यांनी नदीकाठच्या शहरांमधून प्रदूषणयुक्त पाण्याचा उत्सर्जनामुळे प्रभावित गावांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी एकत्रित पाणीसाठे करण्याबाबत विचार करण्याची आवश्यकता व्यक्त केली. अनेक धरणात गाळ साठल्याने पाणी क्षमता कमी झालेली असून धरणातील गाळ काढून पाण्याची साठवण क्षमता वाढवण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. ही सिंचन परिषदेच्या माध्यमातून सिंचन व्यवस्थापनाबाबत नागरिकांच्या सूचना आल्यास शासन त्यावर सकारात्मक विचार करून त्या अनुषंगाने धोरण तयार करेल, असे त्यांनी नमूद केले.

## पहिल्याच दिवशी तीन लाख ८८ हजार विद्यार्थ्यांना मिळणार पुस्तके

### 31 मेपर्यंत शाळा स्तरावर पुस्तक पुरवण्याचे नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्याची तयारी बालभारती व शालेय शिक्षण विभागाने केली आहे. जिल्ह्यातील ३ लाख ८८ हजार ९६८ विद्यार्थ्यांसाठी २३ लाख १८ हजार ७२३ पुस्तक संचांची मागणी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून करण्यात आली आहे. ३१ मे पर्यंत शाळा स्तरावर पुस्तक पुरवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



जिल्ह्यातील पहिली ते आठवीच्या सर्व सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी, अनुदानित अशा जिल्हा परिषदेच्या सर्वच शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके दिली जाणार आहेत.

| | |
|---|---|
| दक्षिण सोलापूर | - ३३३०७ |
| उत्तर सोलापूर | - ३८७३८ |
| अक्कलकोट | - ३५३४५ |
| बार्शी | - ३४४९३ |
| मोहोळ | - ३३६५९ |
| मंगळवेढा | - २५४०७ |
| पंढरपूर | - ४७६१४ |
| सांगोला | - ३४९५२ |
| माळशिरस | - ४७९१७ |
| माढा | - ३२८१४ |
| करमाळा | - २४७२२ |
| **एकूण** | **- ३०८९६८** |

जिल्ह्यातील मराठी, उर्दू व कन्नड माध्यमांच्या पाठ्यपुस्तकांचा समावेश आहे. त्यासाठी पुण्याच्या बालभारतीकडून पुस्तके मिळणार आहेत. तालुका व केंद्र स्तरावर उतरवून घेण्याचे व ती शाळांपर्यंत वेळेत पोचवण्याची तयारी शिक्षण विभागाने केली. पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन सुरू आहे.

#### बालभारतीकडून मे अखेरीस

जिल्ह्यासाठी पाठ्यपुस्तके मिळणार आहेत. तालुका, केंद्रस्तर व त्यानंतर शाळा स्तरावर पुस्तके पोचवण्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळतील.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी,**
जिल्हा परिषद, सोलापूर

## भाजपच्या वर्धापनदिनानिमित्त आज विविध कार्यक्रम

### मुख्यमंत्री फडणवीस करणार ऑनलाईन मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टीचा ४५ वा वर्धापनदिन उद्या दि. ६ एप्रिल रोजी साजरा होत असून, यानिमित्त सोलापूर शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी आज (दि.५) दिली. दरम्यान, या वर्धापनदिनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दुपारी १ ते ३ च्या दरम्यान, ऑनलाईनद्वारे सर्व भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

६ एप्रिल १९८० साली भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर शहर-जिल्ह्यात भाजपाला चांगले यश आले आहे. शहरातील तीनही जागांवर भाजपचे उमेदवार विजयी झाले. २ वर्षांपूर्वी झालेल्या महापालिका निवडणुकीत १०८ नगरसेवक निवडून आले. विदर्भासह राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयी पताका अधिक विस्तारत गेली. पक्षाचा वर्धापन दिन असल्याने सकाळी ८:३० वाजता पक्षाच्या संपर्क कार्यालयात ध्वजारोहण करण्यात येणार आहे. यानंतर दुपारी १ ते ३ च्या दरम्यान मुख्यमंत्री फडणवीस हे पदाधिकारी-कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. या वर्धापनदिनी भाजप पक्ष कार्यालयात पूजाही करण्यात येणार आहे. याचबरोबर इतरही उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती भाजपा शहराध्यक्ष काळे यांनी दिली.

## शेतकऱ्यांनी नैसर्गिक आपत्तीबाबत विमा कंपनीला ७२ तासांच्या आत कळवावे

### जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी भोसले यांचे आवाहन

### रब्बीसाठी ओरिएंटल इन्शुरन्स विमा कंपनीची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी २०२४ या हंगामाकरीता अधिसूचीत क्षेत्रातील अधिसूचीत पिकांसाठी जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यासाठी रब्बी २०२४ मध्ये ओरिएंटल इन्सुरन्स कंपनी लि. या विमा कंपनीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पिक विमा योजनेतर्गंत रब्बी २०२४ मध्ये जिल्ह्यातील शेतक-यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला आहे. दरम्यान, नैसर्गिक आपत्ती आल्यास शेतकरी बांधवांनी ७२ तासाच्या आत त्यांच्या नुकसानीबाबत थेट विमा कंपनीला कळवावे, असे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत सहभागी शेतक-यांना आवाहन करण्यात येते की, स्थानिक नैसर्गिक आपत्ती जसे की गारपीट, भूस्खलन विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास, ढगफुटी अथवा वीज कोसळल्यामुळे लागणारी नैसर्गिक आग या कारणामुळे तसेच काढणी पश्चात गारपीट, चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे आलेला पाऊस आणि बिगर मोसमी पावसामुळे अधिसूचीत पिकाचे नुकसान झालेले असल्यास संबंधित नुकसान झालेल्या शेतक-यांनी घटना घडल्यापासून ७२ तासाच्या आत त्यांच्या नुकसानीबाबतची सूचना पिक विमा कंपनीकडे नोंद करण्यासाठी पिक विमा मोबाईल ॲप अथवा कृषि रक्षक पोर्टल टोल फ्री क्रमांक १४४४७ किंवा PMFBY Whatsup Chatbox क्रमांक ७०६५५१४४४७ या क्रमांकाचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.



## नूमवि शाळेत रामायण स्पर्धेतील पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल -**

नू.म.वि.मराठी शाळेत संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान महाराष्ट्र आयोजित कथारूप रामायण स्पर्धेतील पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम झाला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माननीय महेश भंडारी उपस्थित होते. त्यांचा सत्कार माननीय मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा जेधे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक चन्नबसवेश्वर सोलापूरे यांनी केले. मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा जेधे यांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर कथारूप रामायण या स्पर्धेतील विजेते विद्यार्थ्यांना मेडल आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सर्व सहभागी विद्यार्थी मुख्याध्यापिका व वर्गशिक्षकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान महाराष्ट्राचे सदस्य चन्नबसवेश्वर सोलापुरे, भालचंद्र लुटे, श्रीकिशोर चांडोले, सिद्धेश्वर गोकावी, अमित सारोळकर उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार संगीता बिराजदार यांनी केले.

## नोकरी लावण्याचे आमिष दाखवून साडेबारा लाखांची फसवणूक

### सिंकदराबाद, हैद्राबाद येथील सहाजणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल -**

मोदी खाना येथील तरूणास नोकरी लावण्याचे आमिष दाखवून १२ लाख ६८ हजार ५०० रुपयांची फसवणुक करणाऱ्या सिंकदराबाद, हैद्राबाद येथील सहाजणांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत समी शाबोद्दीन जमादार (वय २९, रा. मोदी खाना, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन मो. अब्दुल अजहर इम्रान (रा. विजय नगर कॉलनी, आसिफ नगर, हैद्राबाद), फातिमा सईदा, विशाल श्रीकांत, किरणकुमार तरासी (सर्व रा. हैद्राबाद), जी आर बेनहूर (रा. सिकंदराबाद), जेनुकला नवनीत (रा. हैद्राबाद) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समी जमादार याच्या ओळखीच्या मो. अब्दुल इम्रान व त्याच्या साथीदारांनी ३० मे २०२४ ते १५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत समी यास नोकरी लावतो असे सांगून वेळोवेळी १२ लाख ६८ हजार ५०० रुपये घेतले.

पैसे देऊनही नोकरी लागत नसल्याचे पाहून समीने हैद्राबाद येथे जाऊन इम्रान व इतरांना पैसे परत मागितले. त्यावेळी तिथे गणेश (रा. हैद्राबाद) याने मध्यस्थी करून तुम्हांला यापुढे एक रूपयाही देण्याची गरज नाही, तुम्हांला नोकरी लावण्यात येईल अशी समजूत काढून पैसे न देता परत पाठवून दिले. म्हणून याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक साखरे पुढील तपास करीत आहेत.

## जबरी चोरी, घरफोडी, वाहन चोरी करणाऱ्या टोळीवर मोक्का

### पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांची पहिलीच कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

जबरी चोरी, घरफोडी, वाहन चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळीवर पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केली आहे. पोलिस आयुक्त एम राजकुमार यांची ही पहिलीच कारवाई असून शहरात संघटित गुन्हेगारी टोळ्या चालविणाऱ्यांवर यापुढेही अशीच कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

बसण्णा सत्तु शिंदे (वय ३०, रा. शिवाजी नगर, गोंधळे वस्ती, सोलापूर), अक्षय सिताराम कांबळे (वय २४, रा. भारतरत्न इंदिरा गांधी नगर, गेंट्याल टॉकीजच्या पाठीमागे, सोलापर) आणि सुरज उर्फ भैय्या गुंडप्पा सुरवसे (वय ३१, रा. सरवदे नगर, विडी घरकुल, सोलापूर) अशी मोक्का कायद्यांतर्गत कारवाई झालेल्या गुन्हेगारांची नावे आहेत.

२५ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री अर्जुन मल्लप्पा मुजगोंड (रा. लच्याण, ता. इंडी, जि. विजापूर, कर्नाटक) हा ४० पोती कांदा व १० पोती उडीद असा शेतमाल घेऊन पिकअप वाहनातून रात्री सोलापूर मार्केट यार्डमध्ये आला होता. यार्डातील रायचूरकर यांच्या दुकानाजवळ वाहन उभे करून तो वाहनातच झोपला होता. २६ नोव्हेंबर रोजी पहाटे तीनच्या सुमारास वाहनामध्ये पाठीमागून कोणीतरी आल्याचा आवाज आल्याने मुजगोंड हा झोपेतून उठून पाहण्यासाठी आला असता पिकअपच्या मागे दोन दुचाकी लावल्या होत्या आणि तीनजण पिकअप वाहनाच्या पाठीमागील बाजूस असलेली उडीदाची पोती खाली उतरवत असल्याचे दिसून आले. त्या अनोळखी व्यक्तींनी मुजगोंड यास चाकू काढून धमकावित त्याच्याकडील मोबाईल फोन व रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली होती. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी तपास करून वरील आरोपींना अटक करून त्यांच्याकडून पाच गुन्हे उघडकीस आणले.

अटक केलेले आरोपी हे टोळी करून गुन्हे दाखल करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी त्यांचे रेकॉर्ड तपासले. त्यावेळी बसण्णा शिंदे याच्याविरुध्द सन २००८ ते २०२४ या कालावधीत वाहन चोरी, घरफोडी, जबरी चोरी, दरोड्याची तयारी, खुनाचा प्रयत्न असे ५७ गुन्हे, अक्षय कांबळे याच्याविरुध्द चोरी, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न यासारखे ८ गुन्हे आणि सुरज सुरवसे याच्याविरुध्द ८ गुहे दाखल असल्याचे आढळून आले. या तिन्ही आरोपींनी मागील १० वर्षात गुन्हेगारी टोळी करून जबरी चोरीचे ८ गुन्हे केल्याचेही निष्पन्न झाले. त्यामुळे या तिघांविरूध्द जेलरोड पोलिसांनी मोक्का कायद्यांतर्गत कारवाईचा प्रस्ताव तयार करून पोलिस आयुक्तांकडे पाठविला. त्यास मंजुरी देत पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी तिन्ही गुन्हेगारांवर मोक्का कायद्यांर्गत कारवाईस मान्यता दिली. सहायक पोलिस आयुक्त प्रताप पोमण पुढील तपास करीत आहेत.

ही कारवाई पोलिस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, शिवाजी राऊत, सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, पोलिस उपनिरीक्षक अमोल डेरे, पोलिस हवालदार सिध्दाराम देशमुख, महेश शिंदे यांनी केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०७८

**मुक्ताई चिंतनें मुक्त पैं जाली ।**
**चरणी समरसली हरिपाठे ।।**

बरेच लोक चिंतन करण्या ऐवजी चिंता करीत असतात. चिंता ही शारीरिक, मानसिक तसेच भावनिक नुकसान करु शकते. चिंता केल्याने विशेष काही सुखदायी साध्य होत नाही. उलट चिंतेमुळे आजार वाढू शकतात. शरीर, मन खचू शकते. हे विपरीत परीणाम सर्वांना कळतात, तरीही बरेच लोक अकारण चिंता करीत असतात. चिंतेऐवजी जर संबंधित विषयाचे, घडलेल्या घटनेच्या कारणांचे, गाठावयाच्या उदिष्टाचे, पार पाडावयाच्या कर्तव्य, जबाबदारीचे, चांगल्या बाबीचे चिंतन केले तर कांही तरी चांगले पदरात पडू शकते. सकारात्मकतेने पाहिले तर चिंतेपेक्षा चिंतन सोपे असते. तरीही भिन्न स्वभाव, स्वार्थी वृत्ती, अज्ञान, भावनिकता इत्यादीमुळे माणूस चिंता करीत असतो. मुक्ताई म्हणतात, अशा सांसारिक चिंतेपेक्षा भगवंताचे चिंतन केले तर जीवन सुखकर होते. मी भगवंताचे चिंतन केल्याने सांसारिक मायाजाळातून मुक्त झाले. हे सांगताना ती म्हणते,



**मुक्ताई चिंतनें मुक्त पैं जाली ।**
**चरणी समरसली हरिपाठें ।।**

हरिचिंतन, हरिपाठ केल्याने अर्थात, हरीला जाणून घेण्याचा प्रयत्न केल्याने माणसाला त्याचा खरा परिचय होऊ लागतो. या खऱ्या परिचयात आपला देह पराधीन असून एके दिवशी संपणारच आहे, एवढे कळले तरीही माणूस संसारात असूनही एकप्रकारे त्यातून मुक्त होऊ शकतो. मुक्ताईच्या म्हणण्याप्रमाणे हरिपाठामुळे, हरिचिंतनामुळे हरिच्या चरणी भावात्मक दृष्ट्या समरस होता येते. त्याच्या चरणी स्वतःला समरस करणारा व्यक्ती चुकीचे काहीच करीत नाही. त्यामुळे तो आत्मानंदी असतो. जो आत्मानंदी असतो, तो नाशवंत बाबीत गुंतत नाही. हरिपाठाने, हरिचिंतनाने चिंता नष्ट होते, जीवाला मुक्त होता येते, या मुक्ताईच्या विचाराला त्यांचे बंधू श्रीज्ञानदेवांनी दुजोरा देताना ज्ञानदेवा चित्ती हरिपाठ नेमा । मागीलिया जन्मा मुक्त झालो ।। असे म्हटले आहे. शांतीब्रम्ह एकनाथ महाराजांनीही मुक्ताईच्या म्हणण्याला साथ दिल्याचे त्यांच्या, हरि मुखी गातां हरपली चिंता । त्या नाही मागुता जन्म घेणे ।। या वचनांवरुन दिसून येते. मुक्ताईच्या म्हणण्याप्रमाणे निःस्वार्थ भावाने हरिचे चिंतन केले तर त्याच्या समचरणाच्या वलयाची अनुभूती कठीण नसते. आपला धरसोडपणा आपणास चरणी समरस होऊ देत नाही. अकारण चिंता, नकारात्मक वृत्ती, स्वार्थीपणा, जिद्दीचा अभाव यामुळे चिंतन होत नाही. चिंतनाच्या अभावामुळे यशापासून दूर राहावे लागते, हार पत्करावी लागते. जबरदस्त चिंतन करणारे लोक कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होत असतात. असे लोक शारीरिक, भावनिक, आर्थिक परिस्थितीवर मात करुन यशस्वी होतात.

**जय जय रामकृष्ण हरि ।।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - चांगला दिवस, श्रीरामनवमी |
| दि. ६ एप्रिल २०२५ | रामदास स्वामी जयंती |
| विक्रम संवत् २०८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४७ | |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. नवमी (१९.२२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पुष्य (३०.२४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सुकर्मा (१८.५४) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (०७.१९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. आत्मविश्वासाने संकटाला सामोरे गेल्याने जीवनातील संकट टळेल.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. जिवनात यश मिळेल. आज आनंदी दिवस जाईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. आर्थिक आवक वाढेल.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. मुलांना आनंद मिळेल. खर्चाचे योग आहेत.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. जीवनात नवीन संधी मिळाल्याने यश प्राप्त होईल.

# चैत्र पंढरपूर व शिंगणापूर यात्रेनिमित्त सोलापूर विभागातून धावणार ९० बसेस

### विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

एसटी महामंडळाच्या वतीने चैत्री पंढरपूर - शिंगणापूर यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर व शिंगणापूर येथे यात्रेला जाण्यासाठी भाविकांची गर्दी लक्षात घेता प्रवाशांच्या सोयीसाठी पंढरपूर व शिंगणापूर मार्गावर जादा ९० बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, भारतातील दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र श्री पंढरपूर विठू माऊलीच्या दर्शनासाठी असंख्य वारकरी आणि भाविक पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. त्याचप्रमाणे शिखर शिंगणापूर येथे देखील प्रभू महादेवाच्या दर्शनासाठी असंख्य भाविक भक्त शिंगणापूरला जातात. भाविकांना तसेच प्रवाशांना प्रवासामध्ये कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी ज्यादा बसेसची नियोजन केले आहे. सोलापूर विभागातील नऊ आजारांमधून सुमारे ९० जादा एसटी बसेस या मार्गावर धावणार आहेत. यासाठी ज्यादा चालक वाहक यांचे सुद्धा नेमणूक करण्यात आली आहे. चैत्री पंढरपूर - शिंगणापूर यात्रेसाठी सोलापूर विभागामार्फत प्रवाशी भाविकांच्या सोयीसाठी खालीलप्रमाणे बसेस सोडण्यात येणार आहेत.

#### ज्यादा बसेसचा प्रवाशांनी लाभ घ्यावा

सदरील यात्रा काळात सोलापूर विभागातील सर्व आगारातून बसेस धावणार आहे. या बसेस महामंडळाच्या सर्व सवलती लागू राहतील , जसे महिला सन्मान योजना, अमृत जेष्ठ नागरीक योजना लागू राहतील. सर्व भाविकांनी व प्रवाशांनी महामंडळाच्या बसेस ने प्रवास करावा.

**- अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक सोलापूर एसटी विभाग**

| आगार | बसेस संख्या |
|---|---|
| सोलापूर - | ५ |
| बार्शी - | १९ |
| पंढरपूर - | ११ |
| अक्कलकोट - | ४ |
| करमाळा - | १३ |
| अकलूज - | १३ |
| सांगोला - | १३ |
| कुर्डूवाडी - | ५ |
| मंगळवेढा - | ७ |
| **एकूण-** | ९० |

# धर्मादाय रुग्णालयांनी सवलतीच्या दरात उपचार करावेत

### अन्यथा शिवसेना स्टाईलने कारवाई करु : मनिष काळजे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

सोलापूर शहर व जिल्ह्यातील रुग्णालयांनी धर्मादाय कायद्या अंतर्गत नोंदणी केलेली आहे. अशा रुग्णालयांनी रुग्णांसाठी सवलतीच्या दरात किंवा मोफत उपचार देणे हे बंधनकारक आहे. धर्मादाय कायद्याअतर्गत शासनाने ठरवून दिलेला कोटा हा रुग्णांसाठी राखीव ठेवणे अनिवार्य आहे. परंतु सोलापूर शहर व जिल्ह्यातील अनेक रुग्णालये यांचे पालन करत नाहीत रुग्णांना उपचार देण्यास टाळाटाळ करतात. रुग्णसेवा ही ईश्वरसेवा असे ब्रीद आहे. परंतु अनेक रुग्णालये ही वैद्यकीय सेवेचा धंदा उघडून बसली आहेत. रुणांकडून वारे माप व बेसुमार पैशांची लूट करणे, असे प्रकार निदर्शनास येत आहेत. नुकत्याच पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये उपचारा विना एका

#### रुग्णांना सवलतीच्या दरात उपचार न दिल्यास शिवसेना स्टाईलने कारवाई करू

धर्मदाय कायद्यांतर्गत नोंदणी असलेल्या रुग्णालयांनी रुग्णांना उदरजेदार सेवा द्यावी. रुग्णालय मोठ्या प्रमाणात पैशांची मागणी करत असेल तर रुग्णांनी किंवा त्यांचे नातेवाईकांनी शिवसेना भवन येथे संपर्क साधावा. अशा रुग्णालयांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. **- मनिष काळजे,** जिल्हा प्रमुख शिवसेना



निष्पाप महिलेचा जीव गेला आहे. असे भविष्यात सोलापूर शहर व जिल्ह्यात घडू नये यासाठी धर्मादाय कायद्या अंतर्गत नोंदणी असलेल्या प्रत्येक रुग्णालयाने मेन प्रवेशद्वारावर वैद्यकीय उपचाराच्या दराचे डिजिटल फलक किंवा डॅशबोर्ड लावणे बंधनकारक आहे. जी रुग्णालये याचे पालन करणार नाहीत त्यांना शिवसेना स्टाईलने सरळ करण्यात येईल व सोलापूर शहर व जिल्ह्यातील ज्या रुग्णांना धर्मादाय कायद्या अंतर्गत उपचार मिळत नाहीत त्यांनी सात रस्ता परिसरातील शिवसेना भवन येथील कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मनिष काळजे यांनी केले आहे.

# बहुजन शिक्षक महासंघाच्यावतीने आनंदोत्सव मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

बहुजन शिक्षक महासंघाने महिला शिक्षिकाना शालार्थ आयडी मिळवून दिल्याबद्दल बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने आनंदोत्सव मेळावा आयोजित करण्यात आला होता.



महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाच्या मोहोळ तालुक्यातील सभासद व महात्मा गांधी विद्यालय, पेनुर (ता. मोहोळ) या प्रशालेतील सहशिक्षिका स्वप्नजा कसबे यांना महासंघाचे प्रदेशाध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर व राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रलंबित शालार्थ आयडी शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे यांच्याकडून मिळवून दिला आहे. पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक तथा राज्याचे शिक्षण सहसंचालक हारूण आतार, शिक्षण अधिकारी सचिन जगताप, संस्थाचालक प्रकाशचंद्र कस्तुरे, मुख्याध्यापक कृष्णा चवरे, संस्थाचालक सुप्रिया देशमुख यांचे सहकार्य लाभले. यानिमित्ताने नव्या पेठेतील बौद्ध साहित्य संमेलन संपर्क कार्यालयात महासंघाच्या पदाधिकारी यांच्या समवेत कसबे कुटुंबीयांनी आनंदोत्सव साजरा केला.

यावेळी जिल्हा सचिव रवी देवकर, जिल्हा संघटक सिद्धेश्वर भुरले, शहराध्यक्ष संजयकुमार शिवशरण, निर्मला मोळे, प्रिया कदम, कविता कदम, महानंदा शिंदे, शिवानंद चौगुले, आगतराव बनसोडे, रत्नदीप कांबळे, एकोराम चौगुले, डॉ, श्रुतिका उडानशिव, प्रा. अभिजीत भंडारे, इन्नूस बाळगी, नागेश सातपुते तसेच कसबे आणि उडानशिव कुटुंबीय आदींची उपस्थिती होती.

प्रारंभी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर व बौद्ध साहित्य संमेलनाचे कोषाध्यक्ष तथा पत्रकार किरण बनसोडे यांच्या हस्ते स्वप्नजा कसबे यांना शालार्थ आदेश देऊन शुभेच्छा दिल्या. तद्नंतर बौद्ध साहित्य संमेलनाचे कार्यवाह भालचंद्र साखरे यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल महासंघाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ कविवर्य देवेंद्र औटी व प्रा. अभिजीत भंडारे यांच्या स्वरचित कवितेच्या सादरीकरणाने हा आनंदोत्सव मेळाव्याचे समारोप करण्यात आला.



# राज्यस्तरीय व्हिडिओ निर्मितीत पूनम पाटील जिल्ह्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

एस.सी.ई.आर.टी आयोजित राज्यस्तरीय व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये श्रीमती निर्मला ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असणारे सह शिक्षिका पूनम लक्ष्मण पाटील यांनी ९ वी व १० वी समाजशास्त्र व्हिडिओ निर्मिती या विषयामध्ये ज़िल्ह्यात प्रथम क्रमांक पटकवाला. व तसेच तालुका स्तरावर समाजशात्र या गटातून अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवून १६,५०० रुपयांचे बक्षीस प्राप्त केले. स्पर्धेसाठी प्राचार्य डी. डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा निर्मला ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ, प्राचार्य डी. डी. गाजरे यांनी अभिनंदन केले.

# १०० शाळांना भेटीचा शिक्षण विभागाचा उपक्रम

### गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न, सुविधांचीही तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

शालेय शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या '१०० शाळांना भेटी' या उपक्रमांतर्गत शाळेच्या पहिल्या दिवशी त्या-त्या क्षेत्रातील आमदार शाळेला भेट देणार असून, विद्यार्थ्यांसोबत संवाद साधणार आहेत. आमदारांसह, अधिकारीही शाळांना भेट देणार आहेत. आमदार प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, शुभेच्छा संदेश आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले जाणार आहे. या शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीलाच शाळांना भेट देण्याचा उपक्रम शासनाने सुरू केला आहे. शाळेतील मुलांची उपस्थिती व शाळेची गुणवत्ता तपासणीसाठी हा उपक्रम आहे. या उपक्रमातून उपस्थित लोकप्रतिनिधी, अधिकारी शाळेतील गुणवत्तेचा आढावा घेणार आहेत. दरम्यान, शाळांतील भौतिक सुविधा, पोषण आहार, स्वच्छता, खेळ यासंदर्भात ते मार्गदर्शनही करणार आहेत.

या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी, तहसीलदार, मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांच्या अधिनस्थ विविध विभागप्रमुख, गटविकास अधिकारी, केंद्रप्रमुख, जिल्हास्तरावरील अन्य शासकीय यंत्रणेत कार्यरत वर्ग १ व. वर्ग २ च्या अधिकाऱ्यांना वर्षभरात जिल्ह्यातील १०० शाळांना भेट देण्याचे नियोजन करावे लागणार आहे.

# कलबुर्गी-बंगळूर उन्हाळी रेल्वेच्या ६० फेऱ्या सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी प्रवाशांच्या मागणीनुसार भारतीय रेल्वेच्या वतीने कलबुर्गी -बंगळूर दरम्यान उन्हाळी विशेष गाडीच्या ६० फेऱ्या चालविण्यात येणार आहेत.

या विशेष गाड्या मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील कलबुर्गी आणि शाहाबाद या दोन स्थानकांवर थांबतील. कलबुर्गी-एसएमव्हीटी बंगळूर त्रिसाप्ताहिक उन्हाळी विशेष ६० फेऱ्या आहेत. यामध्ये गाडी क्रमांक ०६५१९ ही ४ एप्रिल ते १५ जूनपर्यंत दर शुक्रवार, शनिवार आणि रविवारी रात्री ९.१५ वाजता बंगळूर येथून निघेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ७.४० वाजता कलबुर्गी येथे पोचेल. गाडी क्रमांक ०६५२० ही विशेष ट्रेन ५ एप्रिल ते १६ जून (३१ मे, १ आणि २ जून सोडून) पर्यंत दर शनिवार, रविवार आणि सोमवारी ९.३५ वाजता कलबुर्गी येथून निघेल आणि त्याच दिवशी रात्री ८ वाजता बंगळूर येथे पोहचेल. या गाडीला शहाबाद, यादगीर, कृष्णा, रायचूर, मंत्रालयम रोड, आदोनि, गुंतकल, अनंतपूर, धर्मवरम आणि यलहंका हे थांबे असतील.

# नीलकंठ बँकेस ४ कोटींचा नफा

### लवकरच जुळे सोलापूरकरांसाठी शाखा

#### व्हा चेअरमन धनराज नोगजा यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

सोलापूर येथील नीलकंठ सह बँकेस मार्च २०२५ अखेर ४ कोटी ढोबळ नफा झाला आहे. सर्व तरतुदी वजा जाता बँकेस १००.५५ लाख निव्वळ नफा झाला आहे, अशी माहिती बँकेचे व्हा. चेअरमन सी.ए. धनराज नोगजा यांनी दिली. तसेच बँकेस जुळे सोलापूर येथे नवीन शाखा उघडण्यास आरबी आयची परवानगी मिळाली असून लवकरच ती ग्राहकांच्या सेवेसाठी कार्यरत होईल, त्यासाठी बँकेने स्वमालकीची जागाही खरेदी केली आहे.



बँकेने मागील तीन वर्षात खूपच चांगली प्रगती करून ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. बँकेच्या प्रधान कार्यालयासह सर्व शाखा स्वमालकीच्या जागेत आहेत. बँक सध्या रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार बँक आहे.

**बँकेची मार्च २०२५ अखेर सांपत्तिक स्थिती (रक्कम लाखात)**

| | |
|---|---|
| वसूल भागभांडव | ५०२.० |
| राखीव निधी व तरतूद | २८३१.०० |
| ठेवी | १९१४७.७६ |
| कर्जे | १२४६७.९३ |
| गुंतवणूक | ७६९०.८२ |
| निव्वळ नफा | १००.५५ |
| सीआरएआर | १५.९६ टक्के |
| निव्वळ एन.पी.ए | ०.०० टक्के |

# अध्यक्षपदी प्रमोद गडगी यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**



जुना विडी घरकूल सागर चौक येथील श्री शिवम ारुती देवस्थानच्या श्रीराम नवमी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रमोद गडगी यांची निवड करण्यात आली आहे. अंबाजी गरदास, दत्तात्रय गडगी, प्रभाकर सग्गम, तानाजी पुला, पांडुरंग येमूल, पुंडलिक जक्का, प्रशांत गड्डम, दिनेश मादगुंडी, सागर लखपती, योगेश बंडी, बालाजी म्हैसूर, नागेंद्र कनकट्टी, सागर जक्का, उदय गड्डम, अंबरीश गाजूल, शाम जक्का, सुनील शर्मा, हरिप्रसाद जक्का, प्रेम नामा, सोहम जक्का, सागर सोमा, प्रथमेश अंदे, विजय सोमा, महेश पासकंटी, प्रमोद जक्का, श्रीपाद सग्गम, विनोद दासरी, बिपीन वग्गु, नागेश सोमा, रवी सोमा, दत्तात्रय गुंडला, आदित्य चिलवरी, शिवप्रसाद जक्का, बालाजी अंबट, आकाश दोंतुल, श्रीकांत सोमा, राजू गुंडला, बिपीन आकेन, नवीन कामुन, प्रशांत पुंढेकर, आशिष बाबानगरे, सागर सोमा यांचा समितीमध्ये समावेश आहे.

# मनरेगांतर्गत वर्षभरात ४४० विहिरी लाभार्थींना मिळणार पाच लाख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

जिल्ह्यातील जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणण्यासाठी सरकार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मनरेगातून विहीर खोदाईसाठी प्रोत्साहन देत आहे. सरकारच्या अटीनुसार अर्जदार पात्र ठरल्यावर विहिरीच्या कामाच्या टप्प्यानुसार अनुदानाचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग केले जातात.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मनरेगाअंतर्गत जिल्ह्यात वर्षभरात ४४० विहिरी खोदल्या आहेत. लाभार्थी शेतकऱ्यांना १ कोटी ९१ लाख २६ हजारांचे अनुदानही मिळाले आहे. सरकारने विहिरींच्या अनुदानात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता नवीन लाभार्थ्यांना पाच लाखांपर्यंत अनुदान मिळणार आहे.

#### वर्षभरात खोदलेल्या विहिरी तालुकानिहाय

* अक्कलकोट - २८
* बार्शी - १३७
* करमाळा - १७
* माढा - ३८
* माळशिरस - १५
* मंगळवेढा - ४२

#### अल्पभूधारक शेतकरी

* मोहोळ - १७
* पंढरपूर - ५९
* सांगोला - ५८
* उत्तर सोलापूर - १९
* दक्षिण सोलापूर - १०

**एकूण... ४४०**

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (९९) विवेकानंद शिला स्मारक

सुरुवातीला या शिलेवर विवेकानंद शिला नावाची पाटी लावली. परंतु या पाटीला तमिळनाडूच्या मसीहा चर्चने विरोध केला. जवळपास सगळ्याच तटवर्ती (मछुआरे) कोळी समुदायाचे धर्मांतरण करून त्यांना ख्रिश्चन बनवले होते. चर्चने अनेक त-हेने बल-कपट चा प्रयोग केला होता. सर्वप्रथम चर्चने शिलेवर लावलेल्या विवेकानंद शिला स्मारकाची पाटी उडवली व तिथे काँक्रीटचा विशाल क्रॉस उभा केला. आणि त्या ठिकाणी सेंट झेवियरचे स्मारक उभे करण्याचे घोषित केले. जेवियर हा धर्मांतरण करणारा पोर्तुगीज मिशनरी होता. परंतु नंतर काही

संघकार्यकर्त्यांनी पोहत जाऊन त्या क्रॉस ची तोडफोड केली. परत एक छोटी पाटी तिथे लावली. आणि यावेळी तमिळनाडू सरकारने शिला स्थानाच्या चारी बाजूने १४४ कलम जारी केले. स्मारक प्रमुख एकनाथजी रानडे यांनी राष्ट्रीय स्मारक समितीचे गठन केले. त्या समितीचे अध्यक्ष होते श्री मन्मथ पद्मनाभन आणि संपूर्ण देशातील अनेक एकनिष्ठ स्वयंसेवक त्याचे पदाधिकारी झाले. श्री एकनाथजींच्या मार्गदर्शनाखाली ही समिती कार्यरत होती. साऱ्या देशभरातून प्रत्येक नागरिकाकडून कमीत कमी फक्त एक रुपया घ्यावा त्याहून जास्त निधी तुमच्या मर्जीप्रमाणे द्यावा असे ठरले. स्वामी विवेकानंदांच्या छोट्या-मोठ्या गोष्टी शाळा-कॉलेजातून सांगणे सुरू झाले. थोडक्यात करोडो देशवासीयांच्या हृदयात स्वामीजींना आपुलकीचे स्थान मिळाले धनसंग्रहाचा प्रश्न चुटकीसरशी सुटला. आणि चार सप्टेंबर १९७१ ला कन्याकुमारीला स्वामी विवेकानंद शिला स्मारकाचे उद् घाटन तेव्हाचे राष्ट्रपती वराहगिरी व्यंकट गिरी यांच्या हस्ते झाले. प्रकृती अस्वास्थ्य मुळे श्री गुरुजी जाऊ शकले नव्हते. पण नंतर त्यांनी आवर्जून भेट दिली व स्मारक पाहून श्री. गुरुजींच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहिले

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# दुष्काळामुळे पाण्याबाबत तयारीला लागा

## मंगळवेढा पंचायत समितीच्या आढावा बैठकीत आ. समाधान आवताडेंच्या अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ५ एप्रिल-**

मंगळवेढा तालुक्यामध्ये सुरू असलेल्या सर्व पाणीपुरवठा योजना व्यवस्थित चालवून येऊ घातलेल्या दुष्काळी परिस्थितीमध्ये लोकांचे व जनावराचे पाण्यावाचून हाल होता कामा नये याची जबाबदारी अधिकारी वर्गाची असून प्रत्येकाने आपले काम प्रामाणिकपणे करावे. ज्या ठिकाणी अडचण येत असेल त्या ठिकाणी थेट माझ्याशी संपर्क साधून मार्ग काढावा, जनतेस वेठीस धरू नये. टंचाई काळात कोणी काम केले नाही तर मी ते खपवून घेणार नाही असा इशारा आमदार समाधान आवताडे यांनी अधिकाऱ्यांना दिला.

ते मंगळवेढा तालुक्यातील जलजीवन मिशन योजना, भोसे प्रादेशिक योजना, आंधळगाव प्रादेशिक योजना, घरकुल आणि विहीर योजनांचे लाभार्थी या विषयांच्या आढावा बैठकीत बोलत होते. मंगळवेढा पंचायत समितीच्या



सभागृहामध्ये ही आढावा बैठक झाली. यावेळी प्रांत अधिकारी बी आर माळी, तहसीलदार मदन जाधव, गटविकास अधिकारी योगेश कदम, ग्रामीण पाणीपुरवठाचे संजय धनशेट्टी, प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे सुनील देशपांडे, भोसे प्रादेशिकचे काटकर, महावितरण, बांधकाम, कृषी या सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेताना पाणीपुरवठा अधिकारी काटकर यांनी सांगितले की भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमध्ये चाळीस गावे असून त्यातील २० गावांना सध्या पाणीपुरवठा सुरू आहे. सात गावांनी मागणी केली असून इतर गावांनी पाण्याची मागणी केली नसल्यामुळे त्या गावांना अद्याप पाणी सुरू नाही. यावेळी टंचाई काळात दुरुस्तीसाठी एक कोटीचे अंदाजपत्रक तयार केले असून मंजुरीसाठी पाठवले आहे. सौरऊर्जेवरती ही योजना सुरू करण्यासाठी सोलरचेही काम सुरू असून जुनोनी येथील काम पूर्ण झाले आहे. तर उजेठाण येथील काम अद्याप सुरू झालेले नाही असा भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचा आढावा देण्यात आला. यावेळी अनेक गावांना उच्च दाबाने पाणी मिळत नसल्याची तक्रार केल्यानंतर आमदार आवताडे यांनी सांगितले की ही भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊन ७ वर्ष झाले तरीही लेंडवेचिंचाळे सारख्या गावांना अद्याप टाकीत पाणी मिळाले नाही. त्यामुळे चुकीचे डिझाइन करून काम केलेल्या त्या ठेकेदाराकडून रक्कम वसूल करण्याचा प्रस्ताव तयार करून पाठवा. त्याचे जिथे कुठे काम सुरू असेल तिथून ती रक्कम वसूल करण्याचे संबंधित खात्याला पत्र द्या. अशा सूचना आ. अवताडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना शिखर समिती चालवत असून शिखर समितीकडून पुन्हा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेकडे ही योजना वर्ग करण्याचा ठराव करण्यात आला.

जलजीवन योजनेतून हर घर नलसे जल अंतर्गत ७७ कामे सुरू असून ८० कोटी रुपये शासन मंगळवेढा तालुक्यासाठी खर्च करत आहे. मात्र अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे अनेक ठिकाणी जलजीवनच्या ठेकेदारांनी पीडब्ल्यूडी असो किंवा जिल्हा परिषदचे रस्ते असो त्या रस्त्याच्या साईड पट्टीवरून पाईपलाईन केली असल्याच्या तक्रारी लोकांनी निदर्शनास आणून दिल्या. काही ठिकाणी कामे निकृष्ट होत असल्याच्या तक्रारी असून आमदार आवताडे यांनी या कामावर नाराजी व्यक्त केली. ज्यांनी ही कामे सुरू केली नाहीत अथवा ज्या कामावर तक्रारी आहेत अशा ठेकेदारांना नोटीसा काढा व त्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून दुसऱ्या ठेकेदाराकडून काम करून घ्या. अशा सूचनाही देण्यात आल्या. त्याचबरोबर जलजीवन योजनेमध्ये अनेक वाड्यावस्त्या वगळल्या असून त्या वस्त्यांचाही या योजनेमध्ये समावेश करण्यासाठी फेर अंदाजपत्रक सादर करण्याच्या सूचना दिल्या.यावेळी आमदार आवताडे यांनी पंचायत समिती अंतर्गत सुरू असलेल्या रोजगार हमी विहिरी, घरकुल या योजनांचाही आढावा घेत गोरगरीब जनतेला कोणत्याही प्रकारचा अडथळा अधिकाऱ्यांनी करू नये अशा सूचना देत आढावा बैठकीची सांगता केली.

## महत्त्वाचे...



### प्रियांका क्षिरसागर यांच्या सुरेल अविष्काराने करकंबकर मंत्रमुग्ध

**करकंब, दि. ५ एप्रिल-**

प्रतिवर्षाप्रमाणे श्री. नादब्रह्म कला फाऊंडेशन व श्रीराम प्रतिष्ठान करकंब यांचेवतीने आयोजित करण्यात आलेल्या १४ व्या श्रीराम संगीत महोत्सवाची सुरुवात प्रियांका क्षीरसागर यांच्या सुरेल अविष्काराने संपन्न झाली.सुरुवातीला रामदास नाना रोंगे, रामहरी सुतार, साखरे, उपसरपंच ज्योती शिंगटे, सारिका पुरवत, कल्पना देशमुख, आयोजक ज्ञानेश्वर दुधाणे व कलाकार यांचे हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रियांका क्षीरसागर हिने सुरुवातीला राग मारुबिहाग जागू मैं सारी रेन बरमा सादर करत अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताची उत्तम तयारी दाखवली. त्यानंतर रामरंगी रंगीले, अवघे गरजे पंढरपूर, बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल, सावळा नंदाचा नंदन, मी राधिका या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली.त्यांना संगीत साथसंगत तबला धनंजय रोंगे, पखवाज ज्ञानेर दुधाणे, हार्मोनियम सुदर्शन कुंभार, टाळ माऊली पिसे यांनी केली. प्रास्ताविक नादब्रह्म कला फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर दुधाणे यांनी केले.



### वखारिया विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश

**बार्शी, दि. ५ एप्रिल-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयाने एन.एम.एम.एस राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक परीक्षेत घवघवीत यश संपादन करुन यशाची परंपरा कायम राखली आहे. सन २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या (NMMS) परीक्षेत विद्यालयाच्या चि.आर्यन सचिन बुरगुटे हा विद्यार्थी (११६) गुण मिळवून शिष्यवृतीधारक झाला आहे. सहा विद्यार्थी दिपाली अरविंद बुरगुटे (९२), निर्भय तंडे (९०), साईराज बुरगुटे (८८), अर्पिता तांबारे (८५), वैभवी ठोंगे (८०), प्रमिला गलांडे (७४) गुण मिळवून सारथी शिष्यवृतीधारक झाले आहेत. विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी यशस्वी विद्यार्थी यांचे गुलाब पुष्प देवून अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना अनिल वैद्य, विलास शिंदे, मकरंद जगदाळे, श्रीमती रोहिणी डोईफोडे (बुरगुटे), एन.एन महाले यांनी मार्गदर्शन केले. शिष्यवृत्तीधारक यांना रुपये १२००० प्रमाणे चार वर्षे (४८००० रु.) तर सारथी शिष्यवृतीधारकांना रुपये ९५०० प्रमाणे चार वर्षे (३८००० रु.) अनुक्रमे केंद्र आणि राज्य सरकारकडून देण्यात येतात. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती तवले यांनी केले होते.



### कोळेगांव येथे एक दिवस दाखला शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद

**पिलीव, दि. ५ एप्रिल-**

महाराष्ट्र शासनाच्या शंभर दिवसाच्या कृती आराखडा कार्यक्रम ाअंतर्गत माळशिरस तालुक्यातील कोळेगांव येथे एका दिवसात दाखले देण्याचे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरास पिलीव मंडलातील नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. अकलूज विभागाच्यावतीने प्रांताधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ, मंडलाधिकारी विजय एकतपुरे, ग्राममहसूल अधिकारी अमोल कांबळे, सुशिल तपासे, महेश रणखांब, संकेत खाडे, जोत्सना लोखंडे, दिलीप नाईकनवरे, धनराज साळवे, कोतवाल भारत काटे, भिमराव सावंत, स्वप्नील पाटील, महाईसेवा केंद्राचे लक्ष्मण करे,ब्रम्हदेव दुपडे, विजय सावंत,पंकज दुपडे,भारत काटे, अण्णासाहेब कोपनर यांच्या उपस्थितीत पार पडले. शिबिरात ३४१ अर्ज प्राप्त झाले. यामध्ये उत्पन्न दाखले १९२, नॉनक्रिमीलेअर ३, जातीचे दाखले ८७, डोमासाईल ५९ असे अर्ज प्राप्त झाले.

### आठवडी बाजारपेठांमध्ये चिल्लर पैशाची टंचाई

**करमाळा दि.५ एप्रिल -**

बाजारपेठांमध्ये तसेच आठवडा बाजारामध्ये रोखीने व्यवहार करताना सुट्ट्या पैशांची टंचाईने नागरिक त्रस्त झाले आहेत. अगोदरच वाढत्या उष्णतेमुळे बाजारपेठेत मंदीचे सावट सहन करीत असताना बाजारात , प्रवासात, किंवा दुकानात किरकोळ व्यवहार करताना सुट्टे पैसे नसल्याने अडचणी निर्माण होऊ लागले आहेत. मध्यंतरी नोटबंदीनंतर ५००, २००, १००, ५० रुपयांच्या नोटांची संख्या बाजारात वाढली असली तरीही २०, १० रुपयांच्या नोटा मात्र अतिशय कमी प्रमाणात चलनात आणल्या गेल्या आहेत.(सध्या ५ रुपयाच्या नोटा तर गायब झालेल्या आहेत) त्यामुळे किरकोळ साहित्य खरेदी अथवा कोणताही व्यवहार करताना व्यापारी सुरुवातीला ग्राहकाकडे सुट्टे पैसे आहेत का ? अशी विचारणा व्यापारी करीत असल्याचे दिसून येत आहे. सुट्टे पैसे करण्यासाठी व्यापारी व ग्राहक इतरत्र फिरताना दिसत असून, नोटांना पर्याय म्हणून एक, दोन, पाच, दहा तसेच वीस रुपयांची नाणी वापरात आहेत परंतु येथेही टंचाई आहे. बँकेकडे सुट्ट्या पैशासाठी गेले असता तेथेही सुट्टे पैसे मिळत नाहीत ही शोकांतिका आहे. सध्या व्यवहारात दहा वीस रुपयांच्या फाटक्या, जीर्ण झालेल्या नोटा चलणात असल्या तरी, या नोटा कोणीही घेत नाहीत त्यातच राष्ट्रीयकृत बँकाही जीर्ण झालेल्या व फाटक्या नोटा स्वीकारत नाहीत त्यामुळे वादावादी होत आहे. रिझर्व बँकेने फाटक्या व जीर्ण झालेल्या नोटा बँकांना सूचना कराव्यात व सर्वसामान्य नागरिकांची फरपट थांबवावी, अशी मागणी होत आहे.

## अखेर राज्य शासनाकडून तृतीयपंथी कल्याण मंडळाची पुनर्रचना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.५ एप्रिल-**

राज्यातील तृतीयपंथी समुदायाच्या उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेले राज्य तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाची राज्य शासनाकडून पुनर्रचना करण्यात आली आहे. १ एप्रिल रोजी राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने परिपत्रक काढले.

राज्यातील तृतीयपंथी समुदायाच्या उन्नतीसाठी तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाची राज्य शासनाकडून पुनर्रचना करण्यात यावी यासाठी पुण्यात तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्ता डॉ. सान्वी जेठवानी (अध्यक्ष, सप्तारंग सेवाभावी संस्था, नांदेड), मयुरी आळवेकर (अध्यक्ष, मैत्री फाऊंडेशन, कोल्हापूर) आणि बार्शीचे सामाजिक कार्यकर्ता सचिन वायकुळे यांनी

राज्याच्या सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची भेट घेऊन त्यांना तसे निवेदन दिले होते. तथापी राज्य शासनाने तृतीयपंथी धोरण २०२४ जाहीर केले होते. या धोरणात नमूद केल्यानुसार १३ डिसेंबर २०१८ च्या शासन निर्णयामधील विहित राज्यस्तरीय संरचनेमध्ये बदल करुन सुधारित सरंचनेनुसार राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळावर नव्याने अशासकीय सदस्यांचा समावेश करुन सदर समितीचे पुनर्गठन करणे आवश्यक असल्याने या कल्याण मंडळाची पुनर्रचना करण्यात आली. यामध्ये तृतीयपंथी डॉ. सान्वी जेठवानी यांना सह उपाध्यक्ष करण्यात आले तर तृतीयपंथी मयुरी आळवेकर यांचेसह इतर तृतीयपंथी यांना अशासकीय सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी या समुदायाच्या कल्याणासाठी हे स्वागतार्ह पाऊल उचलले आहे. तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाची राज्य शासनाकडून पुनर्रचना करण्यात आल्याने आता या समुदायाच्या प्रगतीच्या वाटा आणखी विस्तारण्यास मदत होणार आहे.

## हनुमान विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश

**माळशिरस, दि. ५ एप्रिल-**

शिंदेवाडी (ता.माळशिरस) येथे रयत शिक्षण संस्थेचे, हनुमान विद्यालय हे गुणवत्ता चांगली असलेले विद्यालय म्हणून माळशिरस तालुक्यात प्रसिद्ध आहे. NMMS या परीक्षेसाठी विद्यालयातील ४७ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते.

त्यापैकी २० विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत. त्या पैकी केंद्रीय शिष्यवृत्तीस ५ विद्यार्थी पात्र झाले. त्यांना प्रत्येकी रु ४८०००/- शिष्यवृत्ती तसेच १० विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीस पात्र झाले. त्यांना प्रत्येकी रु ३८४००/- शिष्यवृत्ती मिळणार आहे.इतिहासात प्रथमच विद्यालयाने स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादित केले आहे. NMMS परीक्षेमध्ये उत्तम यश संपादन करणारे विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक



शिक्षक यांचा सत्कार शिंदेवाडी ग्रामस्थ व आर्ट ऑफ लिव्हिंग टीम शिंदेवाडी यांचे वतीने करण्यात आला. या विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख फिरोज मुलाणी(गणित), परमेश्वर सूर्यवंशी (बुद्धिमत्ता), शरद पाटोळे (विज्ञान), विजय पोटरे (सा. शास्त्रे), बाळासाहेब क्षीरसागर (सा. शास्त्रे) यांचे मार्गदर्शन लाभले. परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पर्यवेक्षिक मिताली देठे, प्राचार्य दादासाहेब आकाडे, शिंदेवाडी चे केंद्रप्रमुख भरते, माळशिरस तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी करडे, रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी दाभाडे तसेच आर्ट ऑफ लिविंग टीम, शिंदेवाडी व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले. प्रास्ताविक भुजबळ, शिक्षक मनोगत मुलाणी तसेच पालक मनोगत नंदकुमार शिंदे, सुषमा शिंदे यांनी व्यक्त केले तसेच आभार कलूबर्मे व सूत्रसंचालन बालाजी बोंबडे यांनी केले.

## ‘शिवयोगी सिध्दरामेश्वरांचे कार्य समाज परिवर्तनासाठीच होते’

**दक्षिण सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

सोलापूरवर कोणत्याही प्रकारचे नैसर्गिक आपत्ती येऊ नये म्हणून आठ ही दिशांना श्री गणेश व काळ भैरवांची स्थापना केली. प्रामाणिक काम करणाऱ्या लोकांना या नगरीत कधी काही कमी पडणार नाही असा आशीर्वाद दिला.



त्यांच्या तलाव निर्मितीच्याकार्यातून समाजाविषयीचा कळवळा दिसून येतो. नेमून दिलेले काम करा, माझा आशीर्वाद तुमच्या सोबत राहील, असा विश्वास लोकांमध्ये निर्माण करून समाजात चेतना जागवण्याचे कार्य श्री शिवयोगी सिध्दरामेश्वरांनी केल्याचे भक्तिमय प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी श्री रामलिंगेश्वर सार्वजनिक वाचनालय आयोजित व्याख्यानमालेत केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री रामलिंगेश्वर प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अजित पट्टणशेट्टी यांनी केले. कार्यक्रमास विश्वनाथ पावले, प्रभुलिंग शेळगे, बसवराज कुर्ले, सुभाष फताटे, शरणप्पा कोळी, मल्लिनाथ पावले, विठ्ठल चितले, सोमनाथ पाटील, नागनाथ शेळगे, आंदप्पा चितले उपस्थित होते. श्री सिध्देश्वरांच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

## इंग्रजी भाषेबाबत राज्यस्तरीय परिसंवाद घेणार : प्रा. करे-पाटील

### करमाळा येथे सोलापूर जिल्हा इंग्रजी भाषा विषय कार्यकारिणी सभा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.५ एप्रिल-**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना करिअरच्या संधीसाठी शालेय वयापासून इंग्रजी भाषा कौशल्य विकास व्हावा. यासाठी आगामी शैक्षणिक वर्षात शिक्षण विभागाशी समन्वय साधून राष्ट्रीय पातळीवरील तज्ञ मार्गदर्शकांद्वारे इंग्रजी शिक्षकांसाठी विशेष परिसंवादासह तज्ञ इंग्रजी शिक्षकांचा यशकल्याणी संस्थेच्या वतीने गुणगौरव करण्यात येईल असे जिल्हा असोसिएशनचे मुख्य सल्लागार प्रा.गणेश करे पाटील यांनी जाहीर केले.

येथील यशकल्याणी सेवा भवनमध्ये सोलापूर जिल्हा इंग्रजी



भाषा विषयक कार्यकारिणी सभा घेण्यात आली. प्रा. गुरुनाथ मुचंडे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. जिल्हाध्यक्ष प्रा.बाळकृष्ण लावंड यांनी प्रास्ताविक केले, ब्रिटिश कौंसिल इंडियाचे मेंटॉर प्रा. अशपाक काझी यांनी शिक्षक सक्षमीकरणासाठी एस.सी. आर.टी. ई. शी समन्वय साधत विशेषज्ञांची मदत घेतली जाईल असे सांगितले. या बैठकीसाठी जिल्हा संघटनेचे सचिव धनाजी राऊत, जिल्हा उपाध्यक्ष आगतराव भोसले, आबासाहेब दाढे, शशीकांत चंदनशिवे, सर्व तालुका अध्यक्ष, सचिव व महत्वाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष प्रा.बाळकृष्ण लावंड, प्रा. गुरुनाथ मुचंडे, प्रा. भिष्मा चांदणे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी धनाजी राऊत, आगतराव भोसले, शशीकांत चंदनशिवे, आबा दाढे, किशोर शिंदे, गणेश यादव, प्रा.गोपाळकर, श्रीकांत सावंत , प्रमिला वाघमारे, महादेव पवार, असिफ तांबोळी, श्रीमंत राजेभोसले, नेताजी भोसले, प्रा. दांडगे, रेवनाथ आदलिंग, प्रा. जयेश पवार, प्रा. काकडे, प्रा.विष्णू शिंदे, अभियंता अतुल दाभाडे, प्रा. रोडगे, शरद शिंदे,दत्ता मोहोळकर, प्रसिद्धी प्रमुख सुखदेव गिलविले, सचिव गोपाळराव पाटील, मारूती जाधव, श्रीराम शिंगटे, सुहास गलांडे, विजय गरड, आप्पासाहेब वाघमोडे , प्रा.डोके, प्रा. कुंभार, तेलंग उपस्थित होते. करमाळा तालुकाध्यक्ष प्रा.कल्याणराव साळुंके यांनी आभार मानले.

## टिनवाला परिवारातर्फे मान्यवरांचा सत्कार

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ एप्रिल-**

येथील प्रसिद्ध क्रिडा मार्गदर्शक इक्बाल टिनवाला यांची कन्या अॅड.फारिया टिनवाला अॅन्ड असोसिएटस् या नूतन कार्यालयाचे उदघाटन व विधिज्ञ सन्मान सोहळा नुकताच झाला.

माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. आमदार सचिन कल्याणशेट्टी, महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचे चेअरमन अॅड. राजेंद्र उमाप, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेंजयराजे भोसले, वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सुरेश सूर्यवंशी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिलीप सिध्दे, जिल्हा परिषद सदस्य मल्लिकार्जुन पाटील, आरपीआय अध्यक्ष अविनाश मडिखांबे, पंचायत समितीचे



माजी सदस्य बाळासाहेब मोरे, काँग्रेसचे शहराध्यक्ष रईस टिनवाला उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार जन्मेंजयराजे भोसले व सिध्दाराम म्हेत्रे यांच्या हस्ते करण्यात आला. तर अॅड. फारिया टिनवाला हिचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते शाल व स्वामींची प्रतिमा देऊन करण्यात आला. उदय सोनकांबळे यांनी अॅड. फारिया टिनवाला हिला संविधानाचे पुस्तक भेट दिले.

विशेष सन्मान म्हणून म.इक्बाल टिनवाला यांची दुसरी कन्या अर्फिया टिनवाला हीची अक्कलकोट तालुक्यातील पहिली महिला राष्ट्रीय प्रशिक्षक व राष्ट्रीय खेळाडू म्हणून संस्थापक अध्यक्ष जन्मेंजयराजे भोसले यांच्या हस्ते शाल व स्वामी समर्थांची प्रतिमा देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. संतोष मेहता, माजी मुख्याध्यापक सायबण्णा जाधव, रजाक सय्यद, नुरअहमद बागवान, सलीम बाग, अरुण जाधव, नन्नूभाई कोरबू, प्रकाश सोनटक्के, इंगळे, रफिक नालबंद, गुलाब नालबंद विजयपुर, दत्ता कटारे, आबा सुरवसे, पाटील, रमेश जाधव, नविद डांगे, मुजाहिद टिनवाला, मजहर टिनवाला, इरफान टिनवाला प्रकाश सुरवसे, स्मिता देशमुख उपस्थित होते.

## पिलीव परिसरात उन्हाच्या तडाख्याने जनजीवन विस्कळीत

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ५ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात सध्या सूर्य आग ओकत आहे. यामुळे प्रचंड उन्हाचा तडाखा जाणवत आहे.

यापासुन बचाव करण्यासाठी नागरिक अक्षरशः हतबल झाले आहेत. सकाळी दहा-अकरा पासुन पिलीव भागातील सर्वच रस्ते अक्षरशः ओसाड पडत आहेत .संध्याकाळी पाच-सहा नंतरच बाजारपेठेत थोडाफार गोंगाट सुरू होत आहे. दुपारी उन्हापासून बचाव करणयासाठी नागरिक झाडाच्या सावलीचा आधार घेत आहेत. तसेच बरेचजण निरा उजवा कालवा किंवा विहीरीत पोहणयाचा आनंद घेत आहेत. सध्या प्रचंड उन्हाचा तडाखा असुन सुद्धा दहावी व बारावी सोडून इतर कोणत्याही वर्गाची अदयापही परीक्षा झालेली नाही. त्यामुळे सकाळी लवकर शाळेत येऊन नंतर ऐन उन्हाच्या तडाख्यात म्हणजे साडेअकरा - बाराच्या दरम्यान विद्यार्थ्यांना घरी जावे लागत आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार यंदा विदयार्थीना एप्रिल पुर्ण महीना शाळेत यावेच लागणार आहे. तेही परीक्षांचे दिवस असल्याने शाळा बुडवुन चालणार नाही. गेल्या आठवडाभरापासून अवकाळी पावसाचे सावट असल्याने तर तापमानात प्रचंड मोठी वाढ झाली आहे. यामुळे तर अक्षरशः उकाड्याने जिवाची काहीली होत आहे. रात्रंदिवस उकाडयाचा प्रचंड त्रास होत आहे. त्यातच विजेचा लपंडाव यामुळे उकाडयापासुन सुटका करणे प्रचंड अवघड झाले आहे. पण सध्या उन्हाच्या तडाख्याने जनजिवन पुर्णपणे विस्कळीत झाले आहे. मोठा पाऊस पडल्यावरच यापासुन सुटका होईल अशी परिस्थिती सध्या आहे.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बिले पब्लिक स्कूलच्या चिमुकल्यांनी जिंकली मने

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ५ एप्रिल-**

करमाळा तालुक्यातील झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सिनियर के. जी. पूर्ण केलेल्या विद्यार्थांचा पदवी प्रदान समारंभ आयोजित केला गेला.



या कार्यक्रमात सर्वच विद्यार्थांनी इंग्रजीमधून अतिशय सूंदर मनोगते व्यक्त करुन प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. या कार्यक्रमासाठी पालक वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता. पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे टाळयांच्या गजरात कौतुक केले व सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या वतीने पुढील वर्षी इ. पाहिलीमध्ये जाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र व शालेय साहित्य देऊन अभिनंदन केले. या कार्यक्रमासाठीअध्यक्षा म्हणून प्रसिद्ध लेखिका व अनेक पुरस्कार सन्मानित अंजली श्रीवास्तव व कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून झरे गावच्या नूतन सरपंच तसेच कमलाई स्किल डेव्हलोपमेंट करमाळा च्या संस्थापिका मंजुश्री मुसळे उपस्थित होत्या. सूत्रसंचालन संचालक कादगे व आभार प्रदर्शन वर्गशिक्षिका रजनी परदेशी यांनी केले.



## महत्त्वाचे...

### बोरीउमरगेत आज खासदार प्रणिती शिंदेच्या हस्ते श्रीराम पूजा

**अक्कलकोट, दि.५ एप्रिल-**

आज रविवार ६ एप्रिल रोजी तालुक्यातील बोरी उमरगे येथील दक्षिणमुखी जागृती हनुमान देवस्थान येथे खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते सकाळी साडेअकरा वाजता प्रभू श्रीराम महापूजा आयोजित करण्यात आल्याची माहिती पुराण समिती अध्यक्ष मल्लिनाथ पाटील यांनी दिली. प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही श्री हवा मल्लिनाथ बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेच्यावतीने जय भारत माता सेवा समिति राष्ट्रीय अध्यक्ष श्री हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात श्री रामनवमी ते श्री हनुमान जयंतीपर्यंत भाग्यवंती देवी यांच्या जीवनचरित्रावर सात दिवस महापुरण आयोजित केले आहे. श्री जय हनुमान मंदिर पटांगणात दररोज संध्याकाळी ७ ते रात्री १० पर्यंत प्रवचन होणार आहे. रविवार सकाळी साडे अकरा वाजता श्री राम नवमी महापूजा कार्यक्रम खासदार प्रणिती शिंदे यांच्या शुभ हस्ते होणार असून यानंतर महापुराणास सुरवात होणार आहे. या महापूराण कार्यक्रमानिमित्त सलग सात दिवस दररोज महाप्रसाद वाटप करण्यात येणार असून कल्लाप्पवाडीचे मारूती सोनकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. सलग सात दिवस महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. तरी सर्व सद्भक्तांनी श्रींचा दर्शन आणि महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन समितीचे सदस्य शिवनिंग बिराजदार यांनी केले आहे.




### सांगोला विद्यामंदिरमध्ये रमजान ईद निमित्त शिरखुर्मा पार्टीचे आयोजन

**सांगोला, दि.५ एप्रिल-**

सध्याच्या काळात समाजात ऐक्य, सहिष्णुता आणि बंधुत्व वृद्धिंगत होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हा विचार प्रमाण मानत सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज मधील मुस्लिम शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आपले सहकारी शिक्षक बंधू भगिनीसाठी प्रेम, आपुलकीची भावना ठेवत रमजान ईद सणानिमित्त शिरखुर्मा पार्टीचे आयोजन केले. शिरखुर्मा पार्टीसाठी सां.ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सदस्या शीलाकाकी झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहत पार्टीचा आस्वाद घेतला. हा उपक्रम राबविल्याबद्दल उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, प्रा.इसाक मुल्ला, सहशिक्षक अशपाक काझी, अन्सार इनामदार, मुस्तफा नदाफ सहशिक्षिका मेहजबिन मुलाणी, परी मुलाणी शिक्षकेतर कर्मचारी मोहसीन मुजावर यांचा संस्थेतर्फे सन्मान करण्यात आला.



### गौडगावच्या मल्टिपर्पजचे २८ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**बार्शी, दि.५ एप्रिल-**

मल्टिपर्पज हायस्कूल, गौडगावमध्ये आर्थिक मागास दुर्बल घटकांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये दहा विद्यार्थी राष्ट्रीय शिष्यवृत्तीस पात्र झाले व १८ सारथी शिष्यवृत्तीस पात्र झाले. त्यापैकी दहा विद्यार्थ्यांना प्रत्येकी ४८ हजार तर अठरा विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३८ हजार दोनशे रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेत प्रतीक लाटे, सोफिया शेख, सायली घुगे, यशराज पाटील, सार्थक वडणे, दिव्या सोनवणे, तुषार दराडे, शुभम शिंदे, हर्षद वडवे व श्रुतिका सांगळे यशस्वी झाले. त्यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांच्या भावी जीवनासाठी स्पर्धा परीक्षेचा या परीक्षेतून पाया भक्कम होण्यासाठी मदत होणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, सेवक पोपट सोनवणे, गोवर्धन भड, भास्कर काकडे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन संजय भड, प्रास्ताविक जीवराज गरड, आभार हरी राठी यांनी मानले.



### ध्येयप्राप्तीचा प्रवास संयमाच्या खिंडीतून जात असतो : डॉ. पालके

**बार्शी, दि.५ एप्रिल-**

जग ही रंगभूमी आहे. प्रत्येकाला स्वतःची भूमिका बजावयाची असते. हा शेक्सपिअरचा विचार जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावरील ध्येय प्रस्तुत करतो. ध्येयाचा पाठलाग करताना संयमाच्या खिंडीतून जावे लागते, असा विचार डॉ. राहुल पालके यांनी त्यांच्या 'ध्येयाच्या मार्गावर' या कवितेद्वारे विद्यार्थ्यांसमोर मांडला. येथील श्री शिवाजी महाविद्यालयात कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत 'करिअर गाईडन्स' याविषयी ते बारावी व बी. एस्सी. मधील विद्यार्थ्यांशी बोलत होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी मनसोक्त उत्तरे देत करिअरचा मंत्र समजून घेतला. या कार्यक्रमास प्रा.मारुती मस्के, डॉ. राजश्री गव्हाणे, कुणाल गव्हाणे व बहुसंख्यने विद्यार्थी उपस्थित होते.

## बोगस जात प्रमाणपत्र प्रकरणी कुर्डूवाडीतील प्राचार्या अटकेत

### २५ वर्षानंतर घटना उघड; शिक्षण क्षेत्रात खळबळ, तीन दिवसांची पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ५ एप्रिल-**

येथील के. एन. भिसे महाविद्यालयाच्या प्राचार्या अनुपमा प्रकाश पोळ यांनी हिंदू सुतार असताना हिंदू महार बनावट प्रमाणपत्र आणून याच महाविद्यालयात प्राध्यापकाची नोकरी मिळवली होती. म्हणून त्यांच्या विरोधात कुर्डूवाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांना शुक्रवारी पोलिसांनी अटक करून माढा न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने तीन दिवस पोलीस कोठडी सुनावली.

सदरील घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. प्राचार्य पोळ यांच्या विरोधात माजी आमदार विनायकराव पाटील यांनी २८ मार्च रोजी कुर्डूवाडी पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दाखल केली होती. सदरचा गुन्हा माढा तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार विनायकराव पाटील यांनी कुर्डूवाडी पोलिसात दाखल केलेला आहे. दाखल गुन्ह्यानुसार १३ सप्टेंबर १९९९ साली वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन के. एन. भिसे महाविद्यालयात इंग्रजी विषयाची जागा भरायची होती. त्यासाठी अनुपमा पोळ यांनी मुलाखत दिली. मुलाखती दरम्यान प्राचार्य पोळ यांनी कागदपत्र देताना स्वतःची जात हिंदू महार असल्याचे प्रमाणपत्र जोडलेले आहे . के. एन. भिसे महाविद्यालयाचे प्राचार्य आर. आर. पाटील यांच्या निवृत्तीनंतर प्राध्यापक अनुपमा पोळ यांची हंगामी प्राचार्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. काही काळानंतर संस्थेच्या लक्षात आले की अनुपमा पोळ यांनी हिंदू सुतार असताना सुद्धा हिंदू महार म्हणून खोटे बनावट प्रमाणपत्र जोडून नोकरी मिळवलेली आहे. त्यानंतर संस्थेच्यावतीने प्राचार्य अनुपमा पोळ यांचा महात्मा गांधी विद्यालय करमाळा येथील त्यांचा इयत्ता दहावी मधील दाखला मागवण्यात आला. सदरच्या शाळा सोडलेल्या दाखल्यावर त्यांचे वडील कै. सुमेरसिंह गणपतसिंह रजपूत जात हिंदू सुतार असे नमूद आहे. परंतु मुलाखतीवेळी अनुपमा रजपूत यांनी हिंदू महार अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र जोडून दिले होते. यानंतर संस्थेच्या वतीने जात पडताळणी विभाग सोलापूर यांना सदरच्या १२०९८ या क्रमांकाचे जात वैधता प्रमाण पत्र कोणाला देण्यात आलेले आहे याची १८ नोव्हेंबर २०२४ साली मागणी केली होती. त्यानुसार संशोधन अधिकारी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी कमिटी यांनी सदरचे १२०९८ चे पत्र शीतल पोपट शिंदे यांना हिंदू माळी इतर मागास प्रवर्ग अंतर्गत दिलेले आहे, असे पत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे.




अनुपमा सुमेरसिंह परदेशी यांना हिंदू महार अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र दिलेले नाही हेच यावरून सिद्ध होते. सदरचा अहवाल जात पडताळणी अधिकारी यांनी दिला आहे. या बोगस प्रमाणपत्रा नुसार अनुपमा पोळ १९९९ पासून नोकरीत रुजू असून सरकारला फसवून विश्वासघात केलेला आहे व गलेलठ्ठ पगारही उचललेला आहे म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार विनायकराव पाटील यांनी केली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन शिंदे यांनी प्राचार्य अनुपमा पोळ यांना अटक केली असून ते पुढील तपास करत आहेत.

## कासेगावात 'सेवावर्धिनी' च्या जलसंधारण कामास सुरुवात

**सेवावर्धिनी आणि प्रिसिजन फाउंडेशनचे समृद्ध ग्रामविकास अभियान; ग्रामस्थांचा प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव, दि. ५ एप्रिल-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे सेवावर्धिनी आणि प्रिसिजन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंधारण आणि ग्रामविकास उपक्रम राबवला जात आहे. त्याअंतर्गत बांध बंधिस्ती (कंपार्टमेंट बंडीग) करण्याचा उपक्रम राबवण्यात येत आहे.

या कार्यासाठी गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमामुळे मृद व जलसंधारणास चालना मिळणार असून शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे. या कामाची सुरवात नुकतीच यंत्रपूजनाने झाली. यावेळी विलास वाडकर, प्रकाश हेडे, संभाजी गाजरे, मोहन जाधव, श्रीशैल्य देवमाने, देविदास कुंभार, प्रवीण मुंगसे, सेवावर्धिनी प्रकल्प अधिकारी चन्नवीर बंकुर, पार्थ तेरकर, राजकुमार देवमाने, सुदर्शन पांगरकर, प्रदीप माने, प्रवीण गरड, नागनाथ शिंदे, इंद्रजीत देवमाने आदी उपस्थित होते.



ग्रामस्थांच्या सहकार्याने अशा उपक्रमांमुळे गावाच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागणार असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

## ४ हजार ९२९ घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत : पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.५ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील ६ हजार ६२६ घरकुल मंजूर असून यापैकी ४ हजार ९२९ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आला असून ४४४ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता वितरीत करण्यात आला असून ज्या लाभार्थ्यांनी पहिला हप्त घेतला आहे.

त्यांनी घरकुलाचे काम सुरु करून दुसऱ्या हप्याची मागणी करावी असे आवाहन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांनी केले आहे.

**गाव स्तरावर बैठका घेण्याच्या सूचना**

तालुक्यातील ज्या लाभार्थ्यांनी घरकुल मंजूर होऊन पहिला हप्ता घेतला नाही त्यांनी कागदपात्रांची तात्काळ पूर्तता करावी .ज्या लाभार्थ्यांनी पहिला हप्ता घेतला आहे त्यांनी तातडीने घरकुलांचे काम सुरु करून पंचायत समिती कडे दुसऱ्या हप्त्याची मागणी करावी .घरकुला संदर्भात लाभार्थ्यांना येणाऱ्या आदि अडचणी सोडविण्यासाठी गावस्तरावर बैठका घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.लाभार्थ्या पहिला हप्ता १५ हजार, दुसरा ७० हजार, तिसरा ३० हजार व चौथा हप्ता ५ हजार दिला जातो.

**अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ**

मजूर घरकुल लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिश्यातून ५० हजार अतिरिक्त वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. या ५० हजार रु मधून ३५ हजार अनुदान हे घरकुल बांधकामासाठी तर १५ हजार रु अनुदान हे प्रधानमंत्री सुर्यघर योजनेतून छतावर १ ज्ञु मर्यादे पर्यंत सौर उर्जा यंत्रणा उभारणी करिता केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदान व्यतिरिक्त अनुदान देण्यात येणार आहे.जे सौर उर्जा यंत्रणा उभारणी करणार नाहीत त्यांना १५ हजार अनुदान मिळणार नाही .

## टेंभुर्णीत शांतता भंग प्रकरणी ३० ते ३५ जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ५ एप्रिल-**

झालेल्या भांडणाची फिर्याद का घेत नाही असे म्हणुन बेकायदेशीर रित्या पोलीस ठाण्यात जमाव बंदी आदेश झुगारून, मोठ मोठयाने आरडाओरडा करून शांततेचा भंग करणाऱ्या ३० ते ३५ महिला पुरूषांवर टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


मंगळवारी दि.१ रोजी ऋषीकेश आनंदराव देशमुख व गौरव देशमुख यांनी व दिपक पवारसह पाच ते सहा जणांचे मध्ये झालेल्या वादातून टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. विशाल पवार व राहुल धोत्रे यांची देशमुख यांचे सोबत झालेल्या भांडणाची फिर्याद का घेत नाही असे म्हणून संशयित आरोपी राम पवार, दीपक पवार, विशाल पवार, विशाल पवार, बाबा पवार, विशाल धोत्रे, सचिन पवार, दिलीप पवार, विकास धोत्रे, जॅकी सुर्वे, अमोल धोत्रे, विकास सुर्वे, राहुल धोत्रे, रोहन जाधव, सनी पवार, आकाश धोत्रे, सनी पवार, कालिदास भारत पवार व इतर दहा ते पंधरा पुरुष व त्यांचे सोबत २५ ते ३० महिला (सर्व रा. टेंभुर्णी ता. माढा) यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात बेकायदेशिररित्या मोठमोठयाने आरडाओरडा करून शांततेचा भंग केला व जमाव बंदी आदेश असताना देखील वरील लोकांनी एकत्र जमुन बेकायदेशिर कृत्य केल्याचा आरोप ठेवून सपोनि गिरीश जोग यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वरील सर्व संशयित आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोसई कुलदिप सोनटक्के करीत आहेत.

> टेंभुर्णी पोलिसांनी एकतर्फी गुन्हा दाखल करून दुसऱ्यांच्या विरोधात फिर्याद दाखल करण्यास नकार दिल्याने आमच्या वडार समाजाने न्याय मागण्यासाठी पोलीस स्टेशन समोर जायचं नाही तर काय कलेक्टर ऑफिस पुढे जायचं का ? तीस ते पस्तीस वडार समाजावर गुन्हा दाखल करणे म्हणजेच अन्याय आहे.
>
> **- राजकुमार बाबा धोत्रे,**
> वडार समाज जिल्हाध्यक्ष

## विद्यार्थ्यांनी केली परंडा किल्ल्यात स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ एप्रिल-**

जे.एस.पी.एम.पुणे संचलित बार्शी येथील भगवंत अभियांत्रिकी महाविद्यालय (बीआयटी कॉलेज) यांच्याकडून विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना विविध प्रकारचे अभ्यासपूरक उपक्रम सातत्याने राबविले जातात. त्यामध्ये रक्तदान शिबिरे ,विविध धार्मिक स्थळांना भेटी , विविध कारखान्यामध्ये भेटी देऊन तेथील परिस्थितीची प्रत्यक्ष माहिती व अनुभव दिले जातात. तसेच शालेय अभ्यासक्रमात असणाऱ्या विविध विषयांचे प्रत्यक्ष ज्ञान आणि अनुभव जास्तीत जास्त मिळावेत तसेच व्यवहार उपयोगी माहिती मिळावी यासाठी संकुल संचालक श्री. ऋतुराज शिवाजीराव सावंत हे नेहमीच आग्रही असतात. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात असणाऱ्या सामाजिक जीवन कौशल या विषयाचे प्रत्यक्ष अनुभव येण्यासाठी प्रथम वर्षात शिकणाऱ्या सिव्हील इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग व इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन या शाखांमधील विद्यार्थ्यांनी परांडा येथे असणाऱ्या ऐतिहासिक किल्लयाला भेट दिली. यावेळी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी तेथील असणाऱ्या मार्गदर्शकाकडून संपूर्ण किल्लयाची माहिती जाणून घेतली इतिहासातील विविध ऐतिहासिक घटनांशी असलेले ऐतिहासिक प्रसंग व त्याच्याशी असलेले संबंध इत्यादी माहितीच्या नोंदी ठेवल्या तसेच त्या ठिकाणी स्वछता मोहीम देखील त्यांच्यातर्फे राबविण्यात आली.



यावेळी विद्यार्थ्यांनी या स्वच्छता मोहिमेत खूप काही शिकण्यास मिळाल्याचे सांगितले व संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल महाविद्यालय व्यवस्थापन, प्राचार्य डॉ. शिराळ सर, संबंधित विभागप्रमुख व प्रवासासाठी बसेस उपलब्ध करुन दिल्याबद्धल श्री. आकाश नागटिळक सर यांचेही आभार व्यक्त केले.

स्वछता मोहीम यशस्वी होण्यासाठी प्रा. रोहन मोठे, प्रा. जगताप, प्रा. स्वप्नील कुरमुडे, प्रा.सौ. मोनिका व्होळे इत्यादींनी विध्यार्थ्याना मार्गदर्शन केले.

## मोडनिंब येथे राम नवमीनिमित्त रामफेरीचे उत्साही आयोजन

**दररोज एक तास ग्राम प्रदक्षिणा; श्रीराम जय राम जय जय राम चा जयघोष**

**तभा वृत्तसेवा**
**मोडनिंब, दि.५ एप्रिल-**

मोडनिंब (ता. माढा) येथे श्रीराम मंदिर समिती आणि भक्त परिवाराच्या वतीने रामनवमीच्या पूर्वसंध्येला शहरातील विविध भागांमध्ये राम फेरीचे आयोजन करण्यात आले. श्रीराम जय राम जय जय राम, जय श्रीराम, राम लक्ष्मण जानकी जय बोलो हनुमान की असा जयघोष करत रामभक्तांनी प्रभातफेरीमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवला.

दररोज सकाळी सात वाजता तीस ते पस्तीस जणांच्या उपस्थितीत ही प्रभात फेरी पार पडते. श्रीराम मंदिरापासून प्रभातफेरीला सुरुवात होते. त्यानंतर श्रीराम चौक, हनुमान मंदिर, महालिंगेश्वर मंदिर, जय भवानी चौक या प्रमुख भागातून फेरीने प्रस्थान केले. आरतीनंतर प्रभातफेरीचा प्रारंभ झाला, तर समारोप श्रीराम मंदिरात करण्यात आला.



> रामनवमीच्या निमित्ताने सकाळी राम फेरी निघते. संत नामदेवांचे अभंग, जनाबाईंची गौळण, जगद्गुरु तुकाराम महाराजांचे अभंग, संत ज्ञानेश्वर अभंग, राम राज्य अभंग, प्रभू महादेव, श्री विठ्ठल, श्री हनुमान, देवी, गुरुदेव दत्त, संत सावता माळी, संतपर अभंग राम फेरीत गायले जातात. ग्रामप्रदक्षिणा साधारण एक तासात पूर्ण होते. हरिपाठ आणि महाआरतीने कार्यक्रमाची सांगता होते. त्यानंतर सांगता करताना दररोज भाविकांतर्फे प्रसाद वाटप केला जातो.
>
> **- विष्णुपंत माळी, रामभक्त**

> मोडनिंब (ता. माढा) श्रीराम मंदिरास सुमारे १०० वर्षापासूनचा इतिहास आहे. सदरचे श्रीराम मंदिर खुप जुने असुन ते निमसुडकर कुटुंबियाचे मालकीचे असुन त्यांनी स्वखर्चाने साधारण दहा वर्षापूर्वी या मंदिराचा जीर्णोध्दार केला आहे.रामनवमीला सर्व निमसुडकर कुटुंब उपस्थित राहुन उत्सव साजरा करतात.
>
> **- जयवंत समुद्र, मोडनिंब**

प्रभातफेरी दरम्यान रामभक्त भजन, भक्तिगीते गात, श्रीरामाच्या जयघोषात सहभागी झाले. काही ठिकाणी श्रीरामकथेचे सादरीकरण करून राम जन्मोत्सव सोहळ्याची माहितीही भाविकांपर्यंत पोहोचवण्यात आली. पहाटेपासूनच भाविक मोठ्या संख्येने घराबाहेर पडून प्रभातफेरीत सहभागी होतात. शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या राम फेरीमुळे संपूर्ण शहर राममय झाले होते. या प्रभात फेरीत लहान मुले पारंपरिक वेशात सहभागी झाले होते. रामनवमी निमित्त अनेक समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवामुळे संपूर्ण गावात भक्तीमय आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. संपुर्ण सप्ताह पार पाडण्यासाठी विष्णुपंत माळी, ज्ञानु माळी, अशोक भालेराव, पोपट माळी, राजेंद्र महामुनी, धनंजय दिक्षित, विजय पवार, चंदु कोळी, रमेश दिक्षित, भारत घोलप, अनिल कुलकर्णी, विजय आपटे, पोपट जाधव यासह वारकरी बंधु सामील होते.